CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित








लातूर | शनिवार, ५ सप्टेंबर २०२६ | वर्ष ४ थे अंक १७६ | पाने १२ | किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



आम्हाला समाजाला सचेत करण्याचे काम करावयाचे आहे. समाजातील सर्व क्षेत्रांत आपला प्रवेश झाला पाहिजे. जर व्यवस्थित रीतीने प्रयत्न झाले तर आम्ही हिंदू समाजाला जागृत करू शकू. अधिक सक्षम बनवू शकू. आपण जे कार्य करीत आहोत, ते राष्ट्रजीवनासाठी अत्यंत महत्त्वाचे आणि महान असे कार्य आहे.

**- स्व. कुप्प. सी. सुदर्शनजी**
रा. स्व. संघाचे
पाचवे सरसंघचालक

## विनम्र अभिवादन



**शिक्षक असलेले भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांची आज जयंती. हा दिवस देशभर शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो.**

# सीमांवर 'नजर'

- पृथ्वी निरीक्षण उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण
- अंतराळ क्षेत्रात भारताची ऐतिहासिक कामगिरी
- ३६ हजार किमीवरून नैसर्गिक आपत्ती, शत्रूच्या हालचालींवर लक्ष ठेवणे शक्य



ईओएस-०५ उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण अंतराळ क्षेत्राच्या वाढत्या क्षमतांचे प्रतीक आहे. देशवासीयांसाठी हा अभिमानाचा क्षण आहे. इस्त्रो आणि भारतीय उद्योग यांच्यातील वाढती भागीदारी देशाच्या अंतराळ कार्यक्रमाला नवीन बळ आणि व्याप्ती देत आहे आणि भारताच्या क्षमतांचा विस्तार करत आहे.

**- नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

**श्रीहरिकोटा, ४ सप्टेंबर**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात् इस्त्रोने शुक्रवारी पहाटे २.५५ वाजता ऐतिहासिक कामगिरी करीत आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्राच्या प्रक्षेपण तळावरून २३६७ किलो वजनाचा आणि ५१.७ मीटर उंचीचा ईओएस-०५ या पृथ्वी निरीक्षण उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण केले. जीएसएलव्ही-एफ १७ या रॉकेटच्या मदतीने पृथ्वीपासून सुमारे ३६ हजार किलोमीटर उंचीवर प्रक्षेपणाच्या अवघ्या १८ मिनिटांत स्थापित केले. भारताच्या भूभागाचे जवळपास प्रत्यक्ष वेळेत निरीक्षण करण्याची क्षमता या उपग्रहामुळे वाढणार असून, यामुळे देशाच्या सीमा तसेच संवेदनशील भागांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि नैसर्गिक आपत्तीची तत्काळ माहिती मिळणे शक्य होणार आहे.

सुमारे ३६ हजार किलोमीटर उंचीवरून भारताच्या भूभागावर आणि शत्रूच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी ईओएस-०५ उपग्रहाची रचना करण्यात आली. हा उपग्रह पाकिस्तान आणि चीनच्या सीमांसह मोक्याच्या ठिकाणांवर सतत लक्ष ठेवेल. याव्यतिरिक्त, तो आपत्तींवर लक्ष ठेवण्यास आणि वेळेवर इशारे देण्यासही मदत करेल. प्रक्षेपणाची माहिती देताना इस्त्रोचे प्रमुख व्ही. नारायणन् यांनी सांगितले की, हा उपग्रह भारत आणि त्याच्या आसपासच्या परिसरातील क्षेत्रावर सतत लक्ष ठेवू शकतो. त्यातून मिळणाऱ्या प्रतिमा आणि माहितीमुळे चक्रीवादळे, मुसळधार पाऊस, पूर आणि वणवा यांसारख्या धोक्यांची त्वरित ओळख पटवणे, त्यांच्यावर लक्ष ठेवणे आणि त्यामुळे होणाऱ्या नुकसानीचा अंदाज घेणे शक्य होईल. यावर्षी आणखी सहा मोहिमा राबवण्याचे उद्दिष्ट आहे. आठ महिन्यांनंतर इस्त्रोची ही पहिलीच मोहीम आहे. ◂ (वृत्तसंस्था)



**श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अवकाश केंद्रातून प्रक्षेपित करण्यात आलेला अत्याधुनिक पृथ्वी निरीक्षण ईओएस-०५ उपग्रह अवकाशात झेपावताना**

### दोन विशेष कॅमेऱ्यांद्वारे डोळा

उपग्रहामध्ये दोन 'मल्टीस्पेक्ट्रल इमेजर' (बहु-वर्णपट प्रतिमा घेणारे कॅमेरे) बसवण्यात आले. हे कॅमेरे प्रकाशाच्या विविध तरंगलांबींवर पृथ्वीच्या प्रतिमा टिपण्यास सक्षम आहेत. यामुळे जमीन, वनस्पती, जलाशय आणि पर्यावरणामधील बदलांची माहिती गोळा करणे आणि लहान वस्तूंच्या अत्यंत तपशीलवार प्रतिमा टिपणे तसेच मोठ्या क्षेत्रांचे वारंवार छायाचित्रण करणे शक्य होईल. ■

### ईओएस-०५ उपग्रह महत्त्वाचा का?

- हा उपग्रह ३६,००० किलोमीटर उंचीवरून छायाचित्रे घेणारा पहिला उपग्रह
- पाकिस्तान व चीनच्या हालचालींवर लक्ष ठेवणे सोपे होईल
- नैसर्गिक आपत्ती आल्यास वेळेवर सूचना मिळेल
- सूर्यप्रकाशाच्या वेळेनुसार पृथ्वीभोवती फिरेल आणि पृथ्वीची स्पष्ट छायाचित्रे पाठवेल
- शहरी विकास, बांधकाम प्रकल्प आणि किनारपट्टीवर लक्ष ठेवणे सोपे होईल
- पिकाखालील क्षेत्र आणि उत्पन्नाचा अचूक अंदाज घेणेही सोपे होईल ■

# जगाशी सांस्कृतिक संवाद दृढ करण्याची संघाची इच्छा : सुनील आंबेकर

## सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यूके दौऱ्यावर

**लंडन, ४ सप्टेंबर**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या सध्याच्या यूके दौऱ्याचा उद्देश सभ्यताविषयक आणि सांस्कृतिक संवाद अधिक दृढ करणे, लोका-लोकांमधील संबंध बळकट करणे आणि संघाचा शतकभराचा अनुभव जगासमोर मांडणे हा आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी केले. ते शुक्रवारी लंडनमध्ये पत्रकारांशी बोलत होते. सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या 'समुदाय प्रमुखांशी संवाद' या कार्यक्रमापूर्वी प्रसारमाध्यमांना माहिती देताना, सुनील आंबेकर यांनी सरसंघचालकांच्या या दौऱ्याचे महत्त्व, उद्दिष्टे आणि नियोजित प्रमुख कार्यक्रमांची रूपरेषा स्पष्ट केली.



या दौऱ्यामुळे ब्रिटिश हिंदू समाजात मोठा उत्साह निर्माण झाला असून, अनेक सामाजिक आणि समुदाय-आधारित संस्था सरसंघचालकांचे स्वागत करण्यासाठी आणि त्यांच्या वास्तव्यादरम्यान आयोजित कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी एकत्र आल्या आहेत.

डॉ. मोहनजी भागवत २ सप्टेंबर रोजी यूकेमध्ये दाखल झाले असून, त्यांचा हा दौरा ७ सप्टेंबरपर्यंत चालणार आहे. अमेरिका, कॅनडा आणि यूके या देशांच्या १५ दिवसांच्या दौऱ्यातील यूकेमधील टप्पा पूर्ण करून ते दिल्लीला परततील, अशी माहिती सुनील आंबेकर यांनी दिली.

रा. स्व. संघाच्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने हा दौरा होत असल्याचे त्यांनी सांगितले. शताब्दी वर्षाचे महत्त्व स्पष्ट करताना आंबेकर म्हणाले की, रा. स्व. संघ ही भारतातील सर्वांत मोठी स्वयंसेवी संघटना असून तिची स्थापना १९२५ मध्ये डॉ. हेडगेवार यांनी केली होती. संघाने गेल्या वर्षी १०० वर्षे पूर्ण केली असून २०२५-२६ हे वर्ष शताब्दी वर्ष म्हणून साजरे केले जात आहे.

**व्यापक संपर्क मोहीम**

शताब्दी वर्षादरम्यान संपूर्ण भारतभर व्यापक संपर्क मोहीम राबवण्यात आल्याचे नमूद करत सुनील आंबेकर म्हणाले की, संघ समाजातील विविध घटक, विविध क्षेत्रे आणि व्यवसायांमधील लोकांपर्यंत पोहोचला असून, समाज आणि विविध समुदायांमध्ये व्यापक संवाद साधला गेला आहे.

गेल्या शंभर वर्षांत, विशेषतः स्वातंत्र्यानंतर भारतात झालेले विकास आणि सकारात्मक बदल जगापर्यंत पोहोचवण्यासाठी शताब्दी वर्षात जागतिक स्तरावर संपर्क साधण्याचा निर्णय संघाने घेतला होता. या उपक्रमाचा उद्देश राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ध्येय, कार्यपद्धती आणि उपक्रम, गेल्या १०० वर्षांतील त्याचा प्रवास आणि त्याच्या अनुभवातून मानवजाती व जगासाठी मिळणारा संदेश पोहोचवणे हा आहे. हा संवाद थेट जगाशी साधला जात आहे. शताब्दी वर्षात जागतिक शांतता आणि संवादासाठी संघ महत्त्वाच्या सार्वजनिक व्यक्ती, संस्था आणि संघटनांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत असल्याचे त्यांनी सांगितले.

सुनील आंबेकर म्हणाले की, संघाचा असा विश्वास आहे की सरकारी पातळीवरील राजनैतिक संवादाव्यतिरिक्त, लोकांमध्ये थेट संवाद तसेच सभ्यताविषयक आणि सांस्कृतिक संबंधांचीही गरज आहे. संस्कृती आणि सभ्यतेवर आधारित सर्वांत मोठी स्वयंसेवी संघटना म्हणून, संघ जागतिक स्तरावर महत्त्वाची भूमिका बजावू शकते.

यूके दौऱ्यादरम्यान डॉ. मोहनजी भागवत सार्वजनिक जीवनातील महत्त्वाच्या व्यक्तींची भेट घेतील आणि विविध संस्थांशी संवाद साधतील. त्यांनी यापूर्वीच लंडनमधील स्वामीनारायण मंदिर आणि खालसा जथा ब्रिटिश गुरुद्वाराला भेट दिली आहे.

### ब्रिटिश हिंदू समुदायाकडून सरसंघचालकांचे स्वागत

डॉ. मोहनजी भागवत यांच्या तीन देशांच्या दौऱ्याचा अंतिम टप्पा म्हणून ते लंडनला पोहोचले असता, गुरुवारी १०० हून अधिक ब्रिटिश हिंदू आणि समुदाय संघटनांनी त्यांचे स्वागत केले. ■

### बडगाममध्ये दहशतवाद्याचा खात्मा

**श्रीनगर, ४ सप्टेंबर**

बडगाम जिल्ह्यातील घनदाट जंगलात लष्कर आणि जम्मू-काश्मीर पोलिसांनी संयुक्त कारवाई करीत शुक्रवारी एका दहशतवाद्याचा खात्मा केला. घटनास्थळावरून एके रायफल जप्त करण्यात आली. परिसरात आणखी एक दहशतवादी असल्याने अद्याप शोधमोहीम सुरूच आहे.

पुलवामा जिल्ह्यातील पाखेरपोरा येथून बडगाममधील युसमार्गच्या दिशेने संशयित दहशतवादी गटाच्या हालचालींची माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई सुरू करण्यात आली. विशिष्ट गुप्त माहितीच्या आधारे, भारतीय लष्कर, जम्मू-काश्मीर पोलिस आणि सीआरपीएफने बडगामच्या अशदर गल्लीत संयुक्त शोधमोहीम सुरू केली. सतर्क जवानांना संशयास्पद हालचाली दिसल्या. ◂ (वृत्तसंस्था)



**अहमदाबाद येथे शुक्रवारी झालेल्या एका कार्यक्रमात मंचावर सादरीकरण करताना भगवान श्रीकृष्ण आणि राधा यांच्या वेशभूषेतील कलावंत**

## महत्त्वाचे

### चार दिवसांच्या घसरणीला 'ब्रेक'

**मुंबई :** भारतीय शेअर बाजारातील चार दिवसांच्या घसरणीच्या सत्राला ब्रेक मिळाला. शुक्रवारी मेटल, ऑइल अँण्ड गॅस आणि प्रायव्हेट बँकिंग समभागांमध्ये झालेल्या जोरदार खरेदीमुळे निफ्टी निर्देशांक २३,९०० च्या पातळीजवळ बंद झाला. जागतिक बाजारातील सकारात्मक संकेत आणि अमेरिकन फेडरल रिझर्व्हकडून आगामी पतधोरणात व्याजदर वाढ न होण्याच्या शक्यतेमुळे बाजाराची सुरुवात मजबूत झाली. व्यवहारादरम्यान निफ्टीने २४,००० ची पातळी ओलांडली होती. परंतु, शेवटच्या टप्प्यात नफा वसुलीचा दबाव आल्यामुळे निफ्टी २४,००० च्या काहीसा खाली येत २३,९०० च्या जवळ स्थिरावला.

### भारत-पाकिस्तान सामना आज

**दुबई :** आशिया चषक महिला टी-२० क्रिकेट स्पर्धेत शनिवारी भारत आणि पाकिस्तानदरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. पुरुषांच्या क्रिकेट सामन्याप्रमाणे महिलांच्या या सामन्याकडे क्रिकेट रसिकांचे लक्ष लागले आहे. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय महिला संघाने आधीच उपांत्य फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे, त्यामुळे संघ आपल्या अखेरच्या साखळी फेरीच्या सामन्यात पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानविरुद्ध अधिक आक्रमकतेने खेळेल अशी अपेक्षा आहे. पाकिस्तानने थायलंडविरुद्धचा आपला पहिला सामना जिंकला आहे. ■


**ताज्या घडामोडी** क्षणाक्षणाला मिळविण्यासाठी **तरुण भारत पोर्टलला भेट द्या** किंवा ९८८१०११६६२ व्हॉट्सॲप क्रमांकावर संपर्क साधा. सोबत असलेला क्यूआर कोड स्कॅन करा आणि रहा **क्षणाक्षणाला अपडेट!**


# ट्रस्टच्या रणनीतीचे परिणाम लवकरच : जितेंद्र मिश्रा

**अयोध्या, ४ सप्टेंबर**

श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे पहिले नवनियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) निवृत्त एअर मार्शल जितेंद्र मिश्रा यांनी शुक्रवारी मंदिर प्रशासनाच्या कारभाराची माहिती घेतली. ट्रस्टच्या सदस्यांसोबत भेट घेतल्यानंतर त्यांनी मंदिर परिसराची पाहणी केली. ट्रस्टच्या रणनीतीचे परिणाम लवकरच प्रत्यक्षात दिसतील. श्रीराम भक्तांचा पाठिंबा आणि आशीर्वाद आमच्यासाठी खूप महत्त्वाचे आहे.



भाविकांच्या आशीर्वादाने आणि श्रद्धेने आम्ही पुढे वाटचाल करू असे त्यांनी वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले.

सध्या संपूर्ण यंत्रणा समजून घेण्याचा प्रयत्न करत आहेत आणि ट्रस्टच्या सदस्यांना भेटून व राम मंदिराचा दौरा करून पुढील योजनांची अंमलबजावणी केली जाईल. ◂ (वृत्तसंस्था)

# महाराष्ट्रासह सात राज्यांमध्ये न्यायाधीशांचे सेवानिवृत्तीचे वय वाढले

### सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय

**नवी दिल्ली, ४ सप्टेंबर**

जिल्हा न्यायपालिकेच्या अधिकाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय वाढवण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने एक मोठा निर्देश जारी केला आहे. न्यायालयाने महाराष्ट्रासह सात राज्यांना सेवानिवृत्तीचे वय ६० वरून ६२ वर्षे करण्याचा आदेश दिला आहे. सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. व्ही. मोहना यांच्या न्यायासनाने हा निर्देश जारी केला. अनुभवी न्यायिक अधिकाऱ्यांना व्यवस्थेत टिकवून ठेवणे आवश्यक आहे, असेही न्यायालयाने नमूद केले.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, छत्तीसगड, कर्नाटक आणि मध्यप्रदेशला त्यांच्या सेवा नियमांमध्ये सुधारणा करावी लागेल. महाराष्ट्र, सिक्कीम, तामिळनाडू आणि पश्चिम बंगाललाही सेवानिवृत्तीचे वय ६२ वर्षे करावे लागेल. सर्वोच्च न्यायालयाने या राज्यांना शक्य तितक्या लवकर, शक्यतो दोन महिन्यांच्या आत, त्यांच्या सेवा नियमांमध्ये सुधारणा करण्याचा निर्देश दिला आहे.

या सात राज्यांमधील जे न्यायिक अधिकारी नियमांमध्ये सुधारणा होईपर्यंत सेवानिवृत्त होणार नाहीत. त्यांना वयाच्या ६२ व्या वर्षापर्यंत सेवेत राहण्याची संधी दिली जाईल. ◂ (वृत्तसंस्था)

### स्कूल बसच्या धडकेने सिध्देश्वर साखर कारखान्याचा कर्मचारी जागीच ठार

**सोलापूर, दि. ४ सप्टेंबर -**

स्कूलबस च्या धडकेत एक ४२ वर्षीय दुचाकी स्वार जागीच ठार झाल्याची घटना होटगी रोडवरील होटगी तलाव सांडपाणी नालाजवळ आज शुक्रवारी सकाळी साडेदहा वाजता घडली. पीरप्पा भीमाशंकर व्हनचेंजे ,(वय ४२ वर्षे, रा. होटगी, दक्षिण सोलापूर) असे मयत दुचाकी स्वाराचे नाव आहे. ते सिद्धेश्वर साखर कारखान्यात काम करत होते. ते आपली नाईट ड्यूटी संपवून होटगीच्या दिशेने दुचाकी ( १३ ९४२८) वरून जात असताना साई ढाब्यासमोर त्यांच्या दुचाकीला सिद्धेश्वर शाळेच्या स्कूल बसने (क्रमांक १३ ५०९७)



जोरदार धडक दिली. या धडकेत ते गंभीर जखमी होऊन जागीच मृत्युमुखी पडले. दरम्यान ही माहिती समजताच वळसंग पोलीस ठाण्याचे पोलीस हवलदार कुंवर यांनी घटनास्थळी पोचून सदरचा मृतदेह विच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केला.

मयत पीरप्पा व्हनचेंजे यांच्या पश्चात पत्नी आणि तीन मुले असा परिवार आहे.

# एल निनोचा प्रभाव फेब्रुवारी २०२७ पर्यंत राहणार

## जागतिक हवामान संघटनेची माहिती

**नवी दिल्ली, ४ सप्टेंबर**

विषुववृत्तीय पॅसिफिकवर सध्या अस्तित्वात असलेली एल निनोची परिस्थिती येत्या काही महिन्यांत अधिक तीव्र होऊन तो अतिशय प्रबळ होण्याची शक्यता आहे आणि याचा प्रभाव फेब्रुवारी २०२७ पर्यंत राहण्याची शक्यता जागतिक हवामान संघटनेने (डब्ल्यूएमओ) व्यक्त केली.

यामुळे पर्जन्यमान व तापमानाच्या स्वरूपावर तसेच पूर, दुष्काळ आणि तीव्र उष्णतेच्या संबंधित धोक्यांवर मोठा परिणाम होऊ शकतो, असेही संघटनेने म्हटले आहे. आपण आधीच दुष्काळ आणि पुरामुळे होणारे व्यत्यय व विध्वंस पाहत आहोत आणि एल निनो अधिक तीव्र झाल्यामुळे हे परिणाम आणखी वाढतील अशी आम्हाला अपेक्षा




आहे, असेही त्या म्हणाल्या.

भारतीय हवामान विभागाने सप्टेंबर महिन्याच्या अंदाजात, एल निनोची परिस्थिती पुढील वर्षी फेब्रुवारीपर्यंत टिकू शकते असे सांगितल्यानंतर काही दिवसांनीच डब्ल्यूएमओने हा अंदाज वर्तवला आहे. एल निनो हा एल निनो सदर्न ऑसिलेशनच्या तीन टप्प्यांपैकी एक आहे. ही एक हवामानविषयक घटना आहे, जी मध्य आणि पूर्व उष्णकटिबंधीय पॅसिफिक महासागराच्या किनाऱ्यावरील समुद्राच्या तापमानातील बदलांमुळे आणि त्यासोबतच डोक्यावरील वातावरणातील चढ-उतारांमुळे घडते. एल निनोमुळे पृथ्वीवर तापमानवाढीचा परिणाम होतो हे ज्ञात असले तरी, त्याच्या विरुद्ध टप्प्याला, ज्याला ला निना म्हणतात, त्यामुळे सामान्यतः तापमान घटते. सप्टेंबर महिन्यासाठी, भारतीय हवामान विभागाने दीर्घकालीन सरासरीच्या (एलपीए) ९१ टक्क्यांपेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तविला आहे. एलपीए म्हणजे एखाद्या विशिष्ट प्रदेशात, महिना किंवा हंगामासारख्या ठराविक कालावधीत नोंदवलेल्या पावसाची, साधारणपणे ३० ते ५० वर्षांच्या दीर्घ कालावधीत काढलेली सरासरी होय.

### गव्हाच्या उत्पादनावर परिणाम

'क्लायमेट ट्रेंड्स'नुसार, फेब्रुवारीमध्ये सर्वांत वेगाने तापमानवाढ नोंदवली गेली असून, दर दशकात तापमान ०.६९ अंश सेल्सिअसने वाढले आहे. मार्च आणि एप्रिलमध्येही अनुक्रमे ०.५८ अंश सेल्सिअस आणि ०.६६ अंश सेल्सिअसने लक्षणीय वाढ दिसून येते. यामुळे गव्हासारख्या रब्बी पिकांवर अंतिम टप्प्यातील उष्णतेच्या ताणाचा धोका वाढत आहे. हे तापमानातील बदल गव्हाच्या पुनरुत्पादन आणि दाणे भरण्याच्या टप्प्यांशी जुळतात आणि प्रमुख गहू उत्पादक प्रदेशांमधील उत्पादनावर त्याचा परिणाम आधीच दिसून येत आहे, असे या अभ्यासात म्हटले आहे. ■

हवामान विभागाने अद्याप मान्सूनोत्तर हंगामाचा अंदाज वर्तवलेला नसला तरी, तीव्र होत असलेल्या एल निनोमुळे हिवाळ्यात तापमान वाढणार आहे, ज्यामुळे परिस्थिती आणखी बिकट होऊ शकते, कारण भारतात हिवाळ्यापूर्वीच अधिक उष्ण होत आहेत. दिल्लीस्थित 'क्लायमेट ट्रेंड्स'च्या एका अलिकडील अभ्यासानुसार, उत्तर भारतातील हिवाळे लहान होत असून फेब्रुवारी-मार्चमध्ये तापमानवाढ होणे सामान्य झाले आहे. ◂ (वृत्तसंस्था)




CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### ज्येष्ठ नागरिकाची ४ लाखांची फसवणूक

**सोलापूर, दि.४ सप्टेंबर-**

बँक खात्याचे केवायसी अपडेट करण्याचे आमिष दाखवत एका ज्येष्ठ नागरिकाची ३ लाख ८५ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली. सोलापूर महानगरपालिकेचे सेवानिवृत्त लिपीक सिद्राम सायबण्णा साखरे (वय-६८, रा.अभिषेक नगर, पुना रोड, सोलापूर) असे त्या ज्येष्ठ नागरिकाचे नाव आहे. बँक खात्याचे केवायसी करणे गरजेचे आहे, असे भासवून आरोपीने साखरे यांच्याकडून त्यांच्या एटीएम कार्डचा क्रमांक, कार्डच्या पाठीमागील ३ अंकी सीव्हीव्ही क्रमांक आणि मोबाईलवर आलेला ओटीपी मिळवला. दोन दिवसांत केवायसी अपडेट होईल असे सांगितले. फिर्यादीला त्यांच्या मोबाईलवर बँक खात्यातून पैसे कपात झाल्याचा संदेश आला. तेव्हा फिर्यादी हे आपल्या मुलासह बँकेत जाऊन चौकशी केली असता, त्यांच्या खात्यातून चार आयएम पीएस व्यवहारांद्वारे एकूण ३ लाख ८५ हजार रुपये भामट्याने परस्पर लांबवल्याचे समोर आले.

### भाजीसाठी घराबाहेर जाताच सोने चोरीस

**सोलापूर, दि.४ सप्टेंबर-**

भाजी आणण्यासाठी महिला घराबाहेर पडल्याची संधी साधून चोरट्याने उघड्या घरातील कपाटात ठेवलेला ३ लाख ५० हजार रुपयांचा सोन्याचा चपलाहार चोरून नेल्याची घटना जुना विडी घरकुल परिसरातील क्षिरालिंग नगर येथे घडली. स्वप्निल पुंडलिक सिंदम (वय-३०) यांच्या पत्नी लावण्या ह्या भाजी आणण्यासाठी गेल्या असता चोरट्याने सुमारे साडेतीन तोळे वजनाचे सोन्याचे चपलाहार चोरुन नेले.

### १.५ लाखांचे सोन्याचे मंगळसूत्र लंपास

**सोलापूर, दि.४ सप्टेंबर-**

अक्कलकोट रोडवरील विठ्ठल नगर परिसरात एका बंद घरामधून चोरट्याने १ लाख ५० हजार रुपये किमतीचे दीड तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र चोरून नेल्याची घटना घडली आहे. वासंती मल्लिनाथ नेलुरे (वय-४८) ह्या घरातील खोल्यांना लॉक लावून कामावर गेल्या होत्या. त्यांनी बेडरुममधील टेबलवर बेन्टेक्स ज्वेलरीच्या बॉक्सजवळ आपले दीड तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र ठेवले होते. दरम्यान, सकाळी १०:४५ च्या सुमारास त्यांच्या सासूबाई देखील पहिल्या मजल्यावरील खोलीला व मुख्य गेटला कुलूप लावून शेताकडे गेल्या. त्या घरी आल्यावर पाहिले असता सोन्याचे मंगळसूत्र गायब असल्याचे निदर्शनास आले.

### लहान मुलांचे कारण; दोन कुटुंबांत हाणामारी

**बार्शी, दि. ४ सप्टेंबर-**

बार्शी तालुक्यातील अरणगाव येथे लहान मुलांच्या कारणावरुन दोन कुटुंबांमध्ये वाद होऊन हाणामारी झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणात दोन्ही बाजूंनी एकमेकांविरुद्ध दिलेल्या फिर्यादीवरुन दोन्ही गटातील लोकांवर बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.प्रतिभा लक्ष्मण डोलारे (वय ३०, रा. अरणगाव) यांच्या फिर्यादीवरुन इंदू वाल्मीक डोलारे, उमेश वाल्मिक डोलारे, अमोल वाल्मीक डोलारे आणि सोनम वाल्मीक डोलारे (सर्वजण रा.आरणगाव) यांच्यावर गुन्हा दाखल झाला तर फिर्यादीनुसार, त्यांची मुलगी प्रणीता बाहेरुन घरी आल्यानंतर शेजारी राहणाऱ्या इंदू डोलारे यांनी मुलीकडे पाहून दृष्ट लागली असे म्हणत वाद घातला. यावरुन वाद वाढल्यानंतर आरोपींनी फिर्यादी व त्यांच्या मुलीला व सासू सुशीला यांना मारहाण केले आहे. दुसऱ्या बाजूच्या वाल्मीक गणपत डोलारे (वय ५६, रा. अरणगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन लक्ष्मण पांडुरंग डोलारे, अंकुश पांडुरंग डोलारे, प्रतिभा लक्ष्मण डोलारे आणि सुशीला पांडुरंग डोलारे (सर्व रा. आरणगाव) यांच्यावर गुन्हा दाखल झाला. फिर्यादीनुसार, त्यांची मुलगी सोनम ही आपल्या लहान मुलीसह घराच्या अंगणात बसली असताना शेजारी राहणाऱ्या पायल डोलारे हिने सोनमला आमच्याकडे डोळे वटारुन का बघतेस? असे विचारल्याने वादाला सुरुवात झाली.

### पत्नीला उसाने मारहाण; पतीवर गुन्हा दाखल

**मंगळवेढा, ४ सप्टेंबर-**

''माझ्या प्रेयसीला फोनवरून काय बोलली? मी तिचा नाद सोडणार नाही,'' असे म्हणत उसाने बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना मंगळवेढा तालुक्यातील रड्डे येथे मंगळवारी (दि. १ सप्टेंबर) सकाळच्या सुमारास घडली. या मारहाणीत २२ वर्षीय विवाहिता गंभीर जखमी झाली. या प्रकरणी मंगळवेढा पोलिसांनी जखमी विवाहितेचा पती सागर शिवाजी देवकते (रा. रड्डे) यांच्यावर मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे. जखमी झालेल्या विवाहितेचे नाव सोनाली सागर देवकते (वय २२) असे आहे. सोनाली आपल्या घरासमोर काम करत होत्या. त्यावेळी पती सागर देवकते याने ''तू रूपालीला फोनवरून काय बोलली? मी तिचा नाद सोडणार नाही. तुला काय करायचे ते कर,'' असे म्हणत उसाने बेदम मारहाण केली, असे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी मंगळवेढा पोलिसांनी सागर शिवाजी देवकते यांच्यावर मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास हवालदार शिंदे करत आहेत.

### मांगी-वडगाव रस्त्यालगचे झाड काढा

**जेऊर, दि.४ सप्टेंबर -**

करमाळा तालुक्यातील मांगी ते उत्तर वडगाव रस्त्यावरील वटलेले धोकादायक झाड रस्त्यावरून जाणाऱ्या लोकांच्या किंवा एखाद्या वाहनावर पडून अपघात होण्याची शक्यता असून हे झाड तोडण्याची मागणी या परिसरातील लोक केली जात आहे. तालुक्यातील वडगाव उत्तर पुनवरसह अनेक गावच्या लोकांचा हा दैनंदिन जाण्या येण्याचा रस्ता असून मांगी येथील प्राथमिक व माध्यमिक शाळेत या रस्त्यावरून येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या संख्या मोठी आहे. हे विद्यार्थी चालत सायकलीवर या रस्त्याने येत असतात अचानक वाऱ्याने या झाडाची फांदी पडून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे मांगी येथील ग्रामस्थ संकेत बागल यांनी सांगितले.

### श्री महालक्ष्मी म्हसोबा देवालय सार्वजनिक गणेशोत्सव अध्यक्षपदी कडवेरी

**सोलापूर, दि. ४ सप्टेंबर-**

स्वामी समर्थ पाटील नगर येथील श्री महालक्ष्मी म्हसोबा देवालय ट्रस्टच्या अध्यक्षपदी श्रीनिवास कडवेरी यांची निवड करण्यात आली. संस्थापक अध्यक्ष रमेश गुत्तीकोंडा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत निवडण्यात आलेले अन्य पदाधिकारी असे; उपाध्यक्ष-पापय्या दिकोंडा, खजिनदार-महेश गुंडेटी, सचिव -राजू येमुल, कार्याध्यक्ष-श्रीकांत गाजूल, मिरवणुक प्रमुख-नरसिंग कन्ना.





# 'त्या' खुनातील आरोपीने व्यक्त केले इच्छामरण; न्यायालयाकडे केला अर्ज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ सप्टेंबर-**

सासऱ्याच्या खुनाच्या आरोपावरुन सोळा महिने कारागृहात बंदीवासात असलेला आरोपी मंगेश देवीदास सलगर (रा.कोळेगांव, ता.मोहोळ) याने इच्छामरण व अवयव दान करण्याबाबत न्यायालयाकडे अर्ज सादर केला. मंगेश सलगर व त्याची पत्नी यांनी मोहोळ व सोलापूर येथील कौटुंबिक न्यायालयात एकमेकांविरुध्द दिवाणी व फौजदारी खटले दाखल केले आहेत. या वादामुळे आरोपीची पत्नी माहेरी आईवडिलांबरोबर राहत होती.

तो रामहिंगणी (ता.मोहोळ) येथे गेला. त्यावेळी सासरे बापुराव माशाळ, सासु आशा माशाळ ही पोर्चमध्ये, त्याची पत्नी निशा ही घरामध्ये तर मेव्हणा अभिषेक घरालगत असलेल्या खोलीत झोपलेले असताना त्याने सासऱ्याचा चाकुने वार करुन खून केला.

सासु व मेव्हण्यास गंभीर जखमी केले. याप्रकरणी मोहोळ पोलिसांनी मंगेश सलगर यास अटक करुन न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सोलापूर सत्र न्यायालयात सुरु या खटल्याची सुनावणी सुरु आहे.

आरोपीने न्यायाधिशांकडे लेखी अर्ज दिला. 'गेली सोळा महिने मी कारागृहात सजा भोगत आहे. परंतु आता कारागृहात सजा भोगण्याची अथवा दिवस काढण्याची माझी शारिरीक व मानसिक स्थिती राहिली नाही. मी पुर्णपणे खचलो आहे. उलट काहीतरी चांगले काम माझ्याकडून होण्याची माझी आशा आहे. मला इच्छा मृत्यु घ्यावा व माझे सर्व अवयव दान करण्यात यावे जेणे करुन अनेकांना जिवदान मिळेल, नवसंजीवनी मिळेल, जोपर्यंत माझी न्याय मागणी मान्य होत नाही तोपर्यंत मला आमरण उपोषणाची परवानगी मिळावी व माझ्या उपोषणादरम्यान अन्य कैद्याकडून मानसिक त्रास, शिवीगाळ अथवा मारहाण होऊ नये यासाठी सुरक्षा द्यावी ही विनंती' असे त्यात म्हटले आहे.

सदर अर्जावर न्यायाधिशांनी सरकारी वकील व कारागृह अधिकाऱ्यांचे म्हणणे मागवले. सदर अर्जाच्या सुनावणीदरम्यान आरोपीचे वकील व सरकारी वकील यांचे म्हणणे ऐकले. सदरच्या अर्जातील आरोपीची विनंती व सदरचा खुन खटला या वेगवेगळया गोष्टी आहेत असे मत व्यक्त करुन आरोपीचा अर्ज दप्तरी दाखल करुन जेल अधिक्षक यांना आरोपीचे समुपदेशन करावे व गरज पडल्यास आरोपीला वैद्यकीय मदत द्यावी असे आदेश दिले. यात आरोपीतर्फे ॲड.धनंजय माने, ॲड. जयदीप माने तर सरकारपक्षातर्फे ॲड. पी.ए. जन्नु यांनी काम पाहिले.

**न्यायालयीन इतिहासातील पहिलीच घटना**

खुनाच्या आरोपावरुन जेलमध्ये असलेल्या आरोपीने देह दानाची व अवयव दानाची परवागनी मिळणेचा न्यायालयाकडे अर्ज करण्याची ही न्यायालयीन इतिहासातील पहिलीच घटना असल्याचे सांगण्यात येते.



## शिक्षक मतदार संघासाठी मंगेश चिवटे यांना उमेदवारी द्यावी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ सप्टेंबर-**

पुणे विभागीय शिक्षक मतदारसंघाच्या आगामी निवडणुकीसाठी महायुतीने मंगेश चिवटे यांनाच उमेदवारी द्यावी, अशी मागणी एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेना महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष प्रा.डॉ.बापूसाहेब आडसूळ यांनी सोलापुरात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत केली आहे.

मंगेश चिवटे हे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्नांसाठी सातत्याने कार्यरत आहेत. शिक्षकांच्या न्याय्य हक्कांसाठी तसेच प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला असल्याने पुणे विभागातील शिक्षकांमध्ये त्यांच्या उमेदवारीबाबत सकारात्मक वातावरण असल्याचे आडसूळ यांनी सांगितले.

जुनी पेन्शन योजना, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न, अनुदानित शाळांच्या समस्या, वेतन व सेवाविषयक प्रश्न, शिक्षकांची सुरक्षितता तसेच शिक्षण क्षेत्रातील धोरणात्मक मुद्द्यांवर सक्षमपणे आवाज उठविणाऱ्या नेतृत्वाची गरज आहे. पुणे विभागीय शिक्षक मतदारसंघातील विविध शिक्षक व कर्मचारी संघटना, पदाधिकारी, शिक्षक प्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांकडून चिवटे यांच्या उमेदवारीला वाढता पाठिंबा मिळत असल्याचा दावा त्यांनी केला आहे. महायुतीने त्यांच्या कार्याची दखल घेऊन उमेदवारी द्यावी, असेही त्यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस वैभव शेटे, जुबेर हिप्परगी, उमेश कल्याणी, रतिलाल डोंगरे , एजाज शेख आदी उपस्थित होते.

## तृप्ती कांबळे, अखिला वन्नम, तृप्ती भालेकर प्रथम

### ए.जी. पाटील पॉलिटेक्निकमध्ये श्रावण विशेष मेहंदी व रांगोळी स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ सप्टेंबर-**

विजापूर रोड सैफुल येथील ए. जी. पाटील पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट येथे कार्यरत जागृती महिला विचार मंचच्यावतीने श्रावण विशेष मेहंदी, रांगोळी व रील किंवा व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत अनुक्रमे तृप्ती कांबळे, अखिला वन्नम, तृप्ती भालेकर यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा.ए.बी. नरके, प्रा.एस. एन. गवंडी यांनी काम पाहिले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी जागृती महिला विचार मंचच्या मुख्य समन्वय सरिता मिठ्ठा, सज्योता मरेड्डी, विभागवार समन्वयक सुजाता डोके, करिष्मा शेख, प्रज्ञा कुंभार, ऐश्वर्या सोलंकर, जयश्री सचदेव, अश्विनी आहेरवाडी, स्वाती गाली यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन साक्षी उप्पीन व श्रुती नडगेरी यांनी केले. सरिता मिठ्ठा यांनी आभार मानले. संस्थेचे अध्यक्ष सिध्देश्वर पाटील, सचिव शिवानंद पाटील, प्राचार्य डॉ.एम.ए. चौगुले, उपप्राचार्य एस.के. मोहिते यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले.

स्पर्धानिहाय प्रथम तीन क्रमांकाचे विजेते याप्रमाणे; **मेहंदी :** तृप्ती कांबळे, कौसर जहा शेख, अरब कशाफ महमद. **रांगोळी :** अखिला वन्नम, प्रीती जाधव व ऐश्वर्या तुप्पाद, दिव्या तांबे व प्रणाली गाडे आणि अनुष्का कोकरे व अक्षरा गरदास. **रील, व्हिडिओ निर्मिती :** तृप्ती भालेकर, साक्षी उप्पीन.



## पवनकल्याण यांच्या वाढदिनी सामाजिक उपक्रमांचा जागर

### अतुल्य सेवा प्रतिष्ठान, जनसेना शाखेचा उपक्रम

### रक्तदानसह आरोग्य, मोतीबिंदू शिबीर, साडी व सायकल वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ सप्टेंबर-**

प्रख्यात तेलुगु अभिनेता, आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री तथा जनसेना पक्षाचे अध्यक्ष पवनकल्याण यांच्या ५५ व्या वाढदिवसानिमित्त अतुल्य सेवा प्रतिष्ठान आणि जनसेना शाखा सोलापूर यांच्यावतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यात रक्तदान, मोतीबिंदू, आरोग्य तपासणी शिबीर, गरजू महिलांना साडी वाटप, शालेय विद्यार्थ्यांना सायकल वाटप या कार्यक्रमांचा समावेश होता.

पवन कल्याण यांच्या वाढदिवसानिमित्त केवळ उत्सव न करता समाजातील गरजू घटकांना मदत करण्याच्या उद्देशाने विविध उपक्रम राबविण्यात आले. रक्तदान शिबिराच्या माध्यमातून गरजू रुग्णांसाठी रक्त उपलब्ध होण्यास मदत झाली. आरोग्य तपासणी शिबिरात नागरिकांची प्राथमिक आरोग्य तपासणी करण्यात आली.

याप्रसंगी आमदार देवेंद्र कोठे, पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघम्‌चे अध्यक्ष डॉ.सूर्यप्रकाश कोठे, नगरसेवकद्वय प्रथमेश कोठे, सतीश सिरसिल्ला, सत्यनारायण गुर्रम यांच्यासह नागेश सरगम, गोपीकृष्णा वड्डेपल्ली यांची प्रमुख उपस्थिती होती. अतुल्य सेवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्रीनिवास यन्नम उर्फ कामटे यांच्या पुढाकारातून या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या सर्व उपक्रमांच्या यशस्वीतेसाठी आनंद अवधूत, अनिल कोंडा, श्रीनिवास बिटला, निखिल चेन्नुर, पूर्णेश येमुल, व्यंकटेश पासकंटी, गणेश पोतन, घनशाम सग्गम, नागेश वैताल, श्रीनिवास कनकी, बसवराज क्यातरी, कृष्णा आडम, गणेश भंडारी, पुष्पा पिस्के, नरेंद्र बल्ला, अंबादास गड्डम, नरेंद्र संगा, श्रीनिवास मंथेन, रघु शासम, श्रीनिवास गुंडेटी आदींनी परिश्रम घेतले.



## देव, देश, धर्माच्या कार्याला प्राथमिकता देण्याची आवश्यकता : आ. कोठे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ सप्टेंबर-**

देव, देश, धर्माच्या कामाला प्राथमिकता देणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. याच कर्तव्य भावनेतून रामलाल चाळीतील सभा मंडप परिसरातील नागरिकांच्या सोयीसाठी बांधण्यात येत आहे, असे प्रतिपादन आमदार देवेंद्र कोठे यांनी केले. प्रभाग क्रमांक १५ मधील रामलाल चाळ येथील सभा मंडपाच्या कामाचे भूमि पूजनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ नागरिक अरुणसिंह परदेशी, महादेव स्वामी, माजी उपमहापौर दिलीप कोल्हे, नगरसेवक विनोद भोसले, नगरसेविका श्रीदेवी फ ुलारे, नगरसेविका विजया खरात, अंबादास करगुळे, मंडल अध्यक्ष नागेश खरात, अजयराणा यादव, विजयानंद स्वामी, शाहू सलगर, यशवंत पाथरूट, राजेंद्र स्वामी, प्रमोद कदम, ओंकार राजगे, श्रवण साबळे, चंद्रकांत यमगर, लक्ष्मण दिकोंडा, चंद्रकांत निमगर, प्रभाकर मागास, रोहित खताळ उपस्थित होते.





## जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशनच्या सोलापूर चाप्टरचा पदग्रहण समारंभ

### सोलापूर विभागाच्या चेअरमन इंजिनियर अभय सुराणा तर सरचिटणीसपदी अमित जैन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ सप्टेंबर-**

जैन समाजातील युवा उद्योजक व महिला उद्योजकांसाठी व्यवसाय वृद्धी व्हावी आणि नेटवर्किंगचे प्रभावी व्यासपीठ निर्माण करावे तसेच समाजातील वंचित आणि गरजू उद्योजकांना आवर्जून मदत करणे या उद्देशाने स्थापन झाले. रोम झोन जितोचे राजेंद्र जैन यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या सभेत जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशनच्या सोलापूर विभागाच्या अध्यक्षपदी इंजिनिअर अभय सुराणा यांची तर सरचिटणीस पदी अमित जैन यांची एकमताने निवड करण्यात आली.

इतर पदाधिकारी याप्रमाणे अशीत पंचमीया, सचिन भस्मे अनुक्रमे उपाध्यक्ष तसेच अमित कुमार जैन सरचिटणीस तसेच धीरज बलदोटा साहिल भंडारी प्रवीण वाणीगोता जॉइंट सेक्रेटरी तसेच प्रतीक शाह, महावीर कवाड़, अक्षय शिंगवी, पुष्कराज कोठारी, अभय गांधीफ

या सभेमध्ये जितोच्या युवा विंगचे देखील निवड करण्यात आली यामध्ये चेअरमन म्हणून विनीत शाह, व्हाईस चेअरमन खुशी सुराणा, अभिषेक शाह यांच्या अनुक्रमे तर सरचिटणीस पदी यश जैन तसेच जीतो लेडीज विंगचे देखील या वेळी निवड करण्यात आली चेअरमन पदी आरती सुराणा, व्हाईस चेअरमन तेजल पोरवाल आणि जनरल सचिव पिंकी कवाड.

## भावसार पतसंस्थेतर्फे 14 टक्के लाभांश जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ सप्टेंबर-**

भावसार पतसंस्थेस ५९.८० लाखांचा निव्वळ नफा झाला असून, संस्थेतर्फे सभासदांना १४ टक्के लाभांश देण्यात येत असल्याचे संस्थेचे अध्यक्ष शशिकांत रंगदळ यांनी जाहीर केले.

सोमवार पेठेतील भावसार नागरी सहकारी पतसंस्थेची ४७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष रंगदळ यांच्या अध्यक्षतेखाली झाली.श्री. हिंगुलांबिका देवीच्या पूजनानंतर प्रास्ताविक आणि स्वागत संस्थेचे अध्यक्ष शशिकांत रंगदळ यांनी केले. व्यवस्थापक सतीश तेलकर यांनी अहवाल वाचन केले. यंदाच्या वर्षी ठेवीत ८१ लाखांची वाढ झाली असून ठेवी २७.१९ कोटींच्या झाल्या आहेत. कर्जवाटप २२.७१ कोटी इतके करण्यात आले आहे. संस्थेला ५९ लाख ८० हजार रुपयांचा निव्वळ नफा झाला असून सभासदांना १४ टक्के लाभांश देण्यात येत असल्याचे अध्यक्ष रंगदळ यांनी जाहीर केले. त्याचप्रमाणे संस्थेला ऑडीट वर्ग अ मिळाले आहे असे अध्यक्षांनी सांगितले. संस्थेच्या कामकाजाबद्दल यावेळी किशोर बसुदे, महानंदू कटारे, तसेच इतर सभासदांनी कामाबद्दल समाधान व्यक्त केले. या सभेस राजकुमार हंचाटे, किरण क्षीरसागर, संतोष हंचाटे, नितीन अंबुरे, राजेश महिंद्रकर, श्रीकांत अंबुरे, सुखदेव सरगम, व सुषमा हिबारे, वैशाली चिंचुरे, तसेच हिशेबनीस रुपेश खमितकर, व इतर कर्मचारी वृंद उपस्थित होते. आभार राजकुमार हंचाटे यांनी मानलेफ



## कोरडवाहू शेती अधिक सक्षम करण्यासाठी संवाद महत्वाचा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ सप्टेंबर-**

बदलते हवामान, अनियमित पर्जन्यमान आणि वारंवार उद्‌भवणाऱ्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर कोरडवाहू शेती अधिक सक्षम करण्यासाठी शेतकरी आणि शास्त्रज्ञ यांच्यातील संवाद महत्त्वाचा आहे. याच उद्देशाने विभागीय कृषी संशोधन केंद्र, सोलापूर आणि कृषी विज्ञान केंद्र, मोहोळ यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी विज्ञान केंद्र येथे शेतकरी-शास्त्रज्ञ मंचाची स्थापना करण्यात आली.

महात्मा फुले कृषी विद्यापीठाने सोलंकरवाडी, ता. माढा, जि. सोलापूर हे गाव दत्तक घेतले असून, विद्यापीठाच्या माध्यमातून विकसित करण्यात आलेले आधुनिक कृषी तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. सोलंकरवाडीतील अनेक शेतकरी महात्मा फुले कृषी विद्यापीठाने विकसित केलेल्या विविध कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेती उत्पादन व उत्पन्न वाढवित आहेत. त्यामुळे संशोधनाधारित तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष शेतात वापर केल्यास कोरडवाहू शेतीतही उत्पादनक्षमता आणि आर्थिक उत्पन्न वाढविता येते, हे या शेतकऱ्यांच्या अनुभवातून दिसून येत आहे.

विभागीय कृषी संशोधन केंद्राचे शास्त्रज्ज्ञ डॉ.नितीनकुमार रणशूर याप्रसंगी बोलताना म्हणाले, मृद व्यवस्थापन, पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन, अन्नद्रव्य व्यवस्थापन, पीक नियोजन, आंतरपीक पद्धती, पीक विविधीकरण आणि हवामान-स्मार्ट शेती तंत्रज्ञानाचा अवलंब करावा. महिला शेतकऱ्यांचा शेतीतील सहभाग वाढविण्यासाठी तसेच त्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी अशा उपक्रमांची गरज आहे. यावेळी डॉ.तानाजी वळकुंडे, डॉ. सुहास उपाध्ये यांनीही मनोगत व्यक्त केले. सहभागी शेतकऱ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना उत्तरेही देण्यात आली.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# जहाजे जप्त करणे दहशतवादी कृत्य

## नॉर्वेच्या कारवाईवर पुतिन यांचा संताप, कठोर कारवाईचा इशारा



**मॉस्को, ४ सप्टेंबर**

रशिया-युक्रेन युद्धादरम्यान समुद्रात रशियन जहाजांवरून तणाव वाढला आहे. अलिकडेच नॉर्वेने रशियन संशोधन जहाज प्रोफेसर मोलचानोव ताब्यात घेतल्याने राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनी संताप व्यक्त करीत याला दहशतवादी कृत्य म्हटले आहे. अशा कारवाईला कठोर प्रत्युत्तर दिले जाईल, असा इशारादेखील त्यांनी दिला.

नॉर्वेने युक्रेनच्या सरकारी कंपनी नाफ्टोगाजच्या मागणीवरून हे जहाज ताब्यात घेतले. त्यावेळी 'प्रोफेसर मोलचानोव' स्वालबार्डमधील बारेंट्सबर्ग परिसरात उभे होते. हे रशियाचे सरकारी संशोधन जहाज आहे. यावर वैज्ञानिक आणि संशोधनाशी संबंधित कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त त्यांचे कुटुंब आणि पर्यटकही प्रवास करतात. नॉर्वेने हे जहाज कोणत्याही सागरी निर्बंधांचे उल्लंघन केल्याच्या आरोपाखाली नव्हे, तर एका जुन्या नुकसानभरपाईच्या प्रकरणात जप्त केले. २०१४ मध्ये रशियाने क्रिमियावर ताबा मिळवल्यानंतर तेथील नाफ्टोगाजच्या मालमत्तांवर नियंत्रण मिळवले होते.

त्यानंतर नाफ्टोगाजने रशियाकडून नुकसानभरपाई मागितली. २०२३ मध्ये हेग येथील एका आंतरराष्ट्रीय न्यायालयाने रशियाला नाफ्टोगाजला सुमारे ४.२२ अब्ज डॉलर्स देण्याचा आदेश दिला. रशियाने अद्याप ही रक्कम न दिल्याने जहाज ताब्यात घेतल्याचे नार्वेचे म्हणणे आहे.

मात्र, यावरून पुतिन यांनी संताप व्यक्त करीत नॉर्वेला कारवाईचा इशारा दिल्याने परिस्थिती अधिकच तणावाची बनली आहे.

**युक्रेनकडून शंभर जहाजांवर हल्ले**

पुतिन म्हणाले की, त्यांची नाराजी केवळ नॉर्वेने जहाज जप्त करण्यापुरती मर्यादित नाही, तर युक्रेन आता समुद्रात रशियन प्रवासी जहाजांना थेट लक्ष्य करीत आहे. गेल्या ४० दिवसांत सुमारे १०० रशियन व्यापारी जहाजांवर हल्ले झाले, यात अनेक रशियन आणि परदेशी खलाशांचा जीव गेला. रशिया जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात या कृत्याला सडेतोड उत्तर देण्यासाठी पूर्णपणे तयार आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### अमेरिकेशी चर्चेचा मार्ग बंद नाही

युक्रेनसोबत शांतता चर्चेबाबत अडचणी वाढत असल्या तरी, पुतिन यांनी अमेरिकेसोबत चर्चेचा मार्ग खुला असल्याचे स्पष्ट करताना म्हटले की, रशिया आणि अमेरिका यांच्यात संपर्क सातत्याने कायम आहे आणि मॉस्कोला वॉशिंग्टनसोबतचे संबंध पुन्हा सामान्य करायचे आहेत. यासाठी केवळ रशियाची इच्छा पुरेशी नाही. अमेरिकेलाही यासाठी तयार व्हावे लागेल. त्यांनी रशियामध्ये नवीन अनिवार्य लष्करी भरती किंवा लामबंदीच्या बातम्या फेटाळल्या आहेत. त्यांनी सांगितले की, सध्या रशियाला नवीन सैनिकांच्या भरतीची गरज नाही.



अचानक आलेल्या पुरामुळे नेपाळमधील काही भाग उद्ध्वस्त झाले आहेत. भारताने पाठवलेली मानवतावादी मदत घेऊन काठमांडू येथे पोहोचलेले भारतीय वायुदलाचे विमान

# बंडखोर तृणमूल खासदारांवर टांगती तलवार

### २२ सप्टेंबरपर्यंत उत्तर सादर करण्याचा निर्देश

**नवी दिल्ली, ४ सप्टेंबर**

तृणमूल काँग्रेसच्या २० बंडखोर खासदारांवर अपात्रतेची टांगती तलवार आहे. लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांनी नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टी ऑफ इंडियात (एनसीपीआय) सामील झालेल्या या बंडखोर खासदारांना दिलासा दिला आहे. त्यांना आता २२ सप्टेंबरपर्यंत आपले उत्तर सादर करावे लागेल.

तृणमूल काँग्रेसने पक्षांतरबंदी कायद्यांतर्गत बंडखोर खासदारांचे सदस्यत्व रद्द करण्याची मागणी केली असता त्यांना उत्तर देण्यासाठी केवळ सात दिवसांची मुदत देण्यात आली होती. यासंदर्भात लोकसभा अध्यक्षांनी २६ ऑगस्टला नोटीस बजावून त्यांचे उत्तर मागितले होते. खासदारांनी आपले उत्तर तयार करण्यासाठी अतिरिक्त वेळेची विनंती केली होती. त्यांची विनंती मान्य करून अध्यक्षांनी आता २२ सप्टेंबरची नवीन अंतिम मुदत निश्चित केली आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### लोकसभा अध्यक्षांकडे तृणमूलची याचिका

तृणमूल नेते अभिषेक बॅनर्जी यांनी या २० बंडखोर खासदारांचे सदस्यत्व रद्द करण्याची मागणी करत लोकसभा अध्यक्षांकडे याचिका दाखल केली होती. हे प्रकरण या खासदारांनी तृणमूल सोडून दुसऱ्या पक्षात प्रवेश केल्याच्या आरोप व दाव्यांशी तसेच पक्षांतरबंदी कायद्यांतर्गत खासदारांवर केलेल्या कारवाईशी संबंधित आहे. त्यामुळे, खासदारांची उत्तरे ऐकल्यानंतर लोकसभा अध्यक्षांना पुढील कार्यवाहीचा निर्णय घ्यावा लागेल.

# नीट पीजी फेरपरीक्षा नाहीच

### सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली याचिका

**नवी दिल्ली, ४ सप्टेंबर**

नीट पीजी २०२६ परीक्षा पुन्हा घेण्याची मागणी करणारी जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी फेटाळली. न्या. पी. एस. नरसिंह आणि न्या. आलोक आराधे यांच्या न्यायासनाने याचिकाकर्ते आणि याचिका दाखल करणाऱ्या वकिलाला फटकारले. तसेच याचिकाकर्त्यावर २५,००० रुपयांचा दंडही ठोठावला. कायद्याच्या प्रक्रियेचा गैरवापर केल्याबद्दल वकिलावर कारवाई करण्यासाठी बार कौन्सिल ऑफ इंडियाला सांगू, असा इशाराही न्यायासनाने दिला.

सुनावणीदरम्यान, न्यायासनाने वकिलाला सांगितले की, ही व्यक्ती पूर्णवेळ जनहित याचिकाकर्ती बनली आहे. जिथे कुठे परीक्षा होतात, तिथे तुम्ही याचिका दाखल करायला सुरुवात करता. तुम्ही मुळात स्थगिती याचिका का दाखल केली.ती तुमच्या सांगण्यावरून होती, की याचिकाकर्त्याला ती दाखल करण्यात खरोखरच रस होता, अशी विचारणा करत आम्ही बार कौन्सिल ऑफ इंडियाला तुमच्यावर कठोर कारवाई करण्यास सांगू. एनबीईएमएसचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वकिलाने न्यायालयाला माहिती दिली की, याचिका दाखल करणारे याचिकाकर्ते नोएडा आणि पंजाबचे असून, या व्यत्ययामुळे त्यांच्यावर कोणताही परिणाम झाला नाही. देशभरात १,१११ परीक्षा केंद्रे उभारण्यात आली होती. वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे केवळ दोन केंद्रांपुरताच व्यत्यय मर्यादित होता. ◂ (वृत्तसंस्था)

### याचिकाकर्त्याने फेरपरीक्षेची मागणी का केली?

याचिकाकर्त्याने सर्व विद्यार्थ्यांसाठी फेरपरीक्षेची मागणी केली. याचिकेत असा आरोप करण्यात आला होता की, सर्वोच्च न्यायालयाच्या मे २०२५ च्या आदेशाचे उल्लंघन झाले आहे. त्या आदेशानुसार नीट पीजी परीक्षा एकाच सत्रात घेण्याचा निर्देश देण्यात आला होता. सुनावणीदरम्यान, वकिलाने जयपूरमधील सुमारे २,५०० उमेदवार परीक्षा पूर्ण करू न शकल्याचा मुद्दाही उपस्थित केला. यानंतर, नॅशनल बोर्ड ऑफ मेडिकल एक्झामिनेशन्सने या उमेदवारांसाठी फेरपरीक्षेची घोषणा केली. ही परीक्षा ५ सप्टेंबरला होणार आहे.

## इबोलाचा उद्रेक, मृतांचा आकडा ३,००० पार

**ब्राझाविल, ४ सप्टेंबर**

काँगोमधील इबोलाच्या उद्रेकात ६,१०० पेक्षा जास्त पुष्टी झालेल्या रुग्णांपैकी तीन हजारांपेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला आहे. हा रोग अभूतपूर्व वेगाने पसरत असून, त्याचा मागोवा घेण्याच्या आणि त्याला रोखण्याच्या प्रयत्नांपेक्षाही तो अधिक वेगाने पसरत आहे.काँगोच्या आरोग्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, मे महिन्याच्या मध्यात जागतिक आरोग्य आणिबाणी जाहीर झाल्यापासून या उद्रेकात ६,१८६ पुष्टी झालेले रुग्ण आढळले असून, त्यात ३,००७ मृत्यूंचा समावेश आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# ब्रिक्स शिखर परिषदेपूर्वी सरन्यायाधीश स्वीकारणार महत्त्वपूर्ण जबाबदारी

### सर्वोच्च न्यायालय सरन्यायाधीश मंचाचे करणार आयोजन

**नवी दिल्ली, ४ सप्टेंबर**

ब्रिक्स शिखर परिषदेपूर्वी सर्वोच्च न्यायालय नवी दिल्लीत ब्रिक्स सरन्यायाधीश मंचाचे आयोजन करणार आहे. हा मंच ४ ते ६ सप्टेंबरदरम्यान आयोजित केला जाईल. सरन्यायाधीश सूर्य कांत ब्रिक्स सदस्य आणि भागीदार देशांमधील न्यायिक नेत्यांसोबत द्विपक्षीय चर्चा करतील. १८ वी ब्रिक्स शिखर परिषद १२-१३ सप्टेंबर रोजी होत आहे.

भारतात आयोजित या तीन दिवसीय सरन्यायाधीश मंचाला ब्रिक्स सदस्य आणि भागीदार देशांचे सरन्यायाधीश, राष्ट्रपती आणि सर्वोच्च न्यायालयाचे वरिष्ठ न्यायिक प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. आज न्यायव्यवस्थेसमोरील आव्हाने हा चर्चेचा मुख्य अजेंडा असेल. लाईव्ह लॉच्या वृत्तानुसार, सरन्यायाधीश सूर्य कांत या मंचावर १० देशांतील न्यायिक नेत्यांना भेटणार आहेत. पहिल्या दिवशी, ४ सप्टेंबरला सरन्यायाधीश सूर्य कांत रशिया, चीन, इजिप्त, इंडोनेशिया, संयुक्त अरब अमिराती, बेलारूस, कझाकस्तान, दक्षिण आफ्रिका, इराण आणि उझबेकिस्तान या देशांच्या न्यायिक प्रतिनिधी मंडळांच्या प्रमुखांसोबत द्विपक्षीय बैठका घेणार आहेत.

**ब्रिक्स देशांचे न्यायिक प्रतिनिधी मांडतील त्यांच्या अडचणी**

दुसऱ्या दिवशी, ५ सप्टेंबरला प्रतिनिधी मंडळांचे प्रमुख न्यायिक संस्थांसंबंधीच्या सामायिक चिंतांवर प्रकाश टाकत मंचाला संबोधित करतील. ब्राझील, चीन, इजिप्त, इथिओपिया, इंडोनेशिया, इराण, रशिया, दक्षिण आफ्रिका आणि संयुक्त अरब अमिरातीचे प्रतिनिधी सहभागी होण्याची शक्यता आहे. याव्यतिरिक्त, बेलारूस, बोलिव्हिया, कझाकस्तान, मलेशिया, थायलंड, युगांडा आणि उझबेकिस्तान यासारख्या भागीदार देशांचे प्रतिनिधी देखील सहभागी होतील.

सरन्यायाधीश मंच ब्रिक्स देशांतील न्यायिक नेत्यांना न्यायदान, आंतरराष्ट्रीय विवाद निराकरण आणि तांत्रिक विकास या विषयांवर आपले दृष्टिकोन मांडण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देतील. याव्यतिरिक्त, सीमापार क्षेत्रांमध्ये लवादाच्या आदेशांची अंमलबजावणी, न्यायव्यवस्थेत एआयचा वापर आणि न्यायिक नेतृत्वाचा निरंतर विकास यासारख्या विषयांवरही चर्चा केली जाईल. ◂ (वृत्तसंस्था)



# युद्ध संपवण्यासाठी मध्यस्थीस भारत तयार

### युक्रेनला जयशंकर यांचा प्रस्ताव

**कीव्ह, ४ सप्टेंबर**

युक्रेनच्या दौऱ्यावर असलेले परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी युक्रेनचे मंत्री अँड्री त्सिबिहा यांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांच्या द्विपक्षीय बैठकीत विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. यावेळी जयशंकर यांनी रशिया-युक्रेन युद्ध संपवण्यासाठी मध्यस्थीचा प्रस्ताव दिला. संघर्ष संपवण्यासाठी भारत मध्यस्थी करण्यास तयार असल्याचे त्सिबिहा यांना सांगितले.

युक्रेन भेटीत झालेल्या चर्चेची माहिती देताना जयशंकर यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले की, अँड्री त्सिबिहा यांच्याशी द्विपक्षीय बैठक झाली. यावेळी आंतरराष्ट्रीय मुद्दे आणि द्विपक्षीय संबंध बळकट करण्यावर चर्चा झाली. रशिया-युक्रेन संघर्ष संपवण्याचे आवाहन करताना युद्ध थांबवण्यासाठी भारत मध्यस्थी करण्यास तयार असल्याचा प्रस्ताव दिला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांची शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेदरम्यान भेट झाली. त्यानंतर काही दिवसातच जयशंकर युक्रेनच्या दौऱ्यावर आहे. पुतिन यांच्या भेटीदरम्यान मोदींनी रशिया आणि युक्रेनमध्ये शांतता प्रस्थापित होण्याची आशा व्यक्त केली होती आणि संघर्ष संपवण्याचे आवाहन केले होते. त्यानंतर आता जयशंकर यांनीही युक्रेनला मध्यस्थीचा प्रस्ताव दिला.

परराष्ट्र मंत्रालयाने अधिकृत निवेदनात म्हटले की, द्विपक्षीय संबंध सुधारणे आणि प्रादेशिक घडामोडी व परस्पर हिताच्या मुद्द्यांवर विचारांची देवाणघेवाण करण्याची संधी उपलब्ध करून देणे, हा या दौऱ्याचा उद्देश आहे. बैठकीत दोन्ही मंत्र्यांनी काळ्या समुद्रातील व्यापारी जहाजांवरील हल्ल्यांवर देखील चर्चा केली. काळ्या समुद्रात रशिया आणि युक्रेन यांच्यातील अलीकडील तणावादरम्यान भारतीय खलाशी ठार आणि जखमी झाले. ◂ (वृत्तसंस्था)

# महाराष्ट्रातील व्यक्तीचे जात प्रमाणपत्र अवैधच

### सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा | सेवानिवृत्तीचा लाभ मिळवण्यास पात्र

**नवी दिल्ली, ४ सप्टेंबर**

सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी एका व्यक्तीचा 'टोकरे कोळी' या अनुसूचित जमातीशी संबंधित असल्याचा दावा अमान्य करणारा आदेश कायम ठेवला, परंतु तो सेवानिवृत्ती आणि निवृत्तीवेतनाचे लाभ मिळण्यास पात्र असेल, असाही आदेश दिला.

टोकरे कोळी या अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र १९८४ मध्ये मिळालेल्या व्यक्तीला याच प्रमाणपत्राच्या आधारे ऑक्टोबर १९९४ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेत कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) म्हणून नोकरी मिळाली होती. तो जून २०२५ मध्ये सेवानिवृत्त झाला होता.

न्या. अरविंद कुमार आणि न्या. विपुल एम. पंचोली यांच्या न्यायासनाने संविधानाच्या अनुच्छेद १४२ अन्वये असलेल्या आपल्या व्यापक अधिकारांचा वापर करून नमूद केले की, संबंधित कर्मचाऱ्याने ऑक्टोबर १९९४ ते जून २०२५ या कालावधीत केलेली सेवा ही, लागू असलेल्या सेवा नियमांनुसार त्याच्या सेवानिवृत्तीविषयक आणि निवृत्तीवेतनाशी संबंधित लाभांची गणना व अदायगी करण्याच्या मर्यादित उद्देशासाठी संरक्षित मानली जाईल.

याद्वारे देण्यात आलेले संरक्षण म्हणजे अपीलकर्त्याचा 'टोकरे कोळी' या अनुसूचित जमातीशी संबंध असल्याच्या दाव्याला मान्यता किंवा वैधतेची पावती देणे नव्हे, हे स्पष्ट करण्यात येत आहे, असे न्यायासनाने म्हटले. अवैध ठरवण्यात आलेल्या जात प्रमाणपत्राच्या आधारे अपीलकर्ता किंवा त्याच्या कुटुंबातील कोणताही सदस्य भविष्यातील कोणत्याही लाभाचा दावा करण्यास पात्र असणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. ◂ (वृत्तसंस्था)



आसाममधील नागाव जिल्ह्यात शुक्रवारी एका प्रक्रियेसाठी कापलेल्या तागाच्या पेंढ्यांची जुडी घेऊन जात असलेला शेतकरी

# शिस्तभंगाच्या कारवाईचा 'बीसीआय'ला अधिकार नाही

### सुप्रीम कोर्टाकडून कारवाईचा आदेश रद्द

**नवी दिल्ली, ४ सप्टेंबर**



बार कौन्सिल ऑफ इंडियाला (बीसीआय) कायदा विद्यार्थ्यांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्याचा किंवा त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा कोणताही वैधानिक अधिकार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला. यासोबतच न्यायालयाने हैदराबाद येथील 'नल्सार युनिव्हर्सिटी ऑफ लॉ'च्या विद्यार्थ्यांविरोधात बीसीआयने जारी केलेले दोन्ही आदेश रद्दबातल ठरवले.

सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. व्ही. मोहना यांच्या न्यायासनाने उपरोक्त निर्णय दिला. सरन्यायाधीशांना मुख्य अतिथी म्हणून दिलेले निमंत्रण मागे घ्यावे, अशी मागणी करणारे निवेदन विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी प्रशासनाला दिले होते. २० जुलै रोजी संसदेवर काढलेल्या मोर्चादरम्यान आंदोलकांवर झालेल्या कथित पोलिस अत्याचाराबाबतच्या सुनावणीत सरन्यायाधीशांनी केलेल्या काही टिप्पणींचा संदर्भ विद्यार्थ्यांनी या निवेदनात दिला होता. विद्यार्थ्यांच्या या विरोधानंतर बीसीआयने विद्यापीठातील पदवीधरांना वकील म्हणून नोंदणी न देण्याचा निर्देश दिला होता. चौफेर टीकेनंतर हा निर्णय मागे घेत चौकशी प्रलंबित असताना नोंदणीला परवानगी दिली होती. अखेर न्यायालयाने बीसीआयचे हे दोन्ही आदेश कायदेशीर अधिकारांबाहेरचे असल्याचे स्पष्ट करत रद्द केले. ◂ (वृत्तसंस्था)

## सिकंदराबादमध्ये १६० डेटोनेटर्स जप्त

**हैदराबाद** : सिकंदराबाद छावणीतील एका खाजगी स्थावर मालमत्ता प्रकल्पात तब्बल १६० डेटोनेटर्स बेवारस अवस्थेत सापडले. विशेष म्हणजे, याच छावणीतून काही दिवसांपूर्वी लष्कराच्या तळावरून लष्करी शस्त्रे आणि दारुगोळा चोरीला गेला होता.

लष्करी तळावरून रायफल्स, पिस्तूलसह मॅगझिन्स आणि दारुगोळा चोरीला गेल्यानंतर पोलिस आजूबाजूच्या परिसरात कसून तपासणी करत असताना २ सप्टेंबरला बोलारम पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका नागरी वस्तीत हे डेटोनेटर्स सापडले.

# ८० कोटींची ब्राऊन शुगर जप्त; एकाला अटक

**इम्फाळ** : मणिपूरच्या जिरीबाम जिल्ह्यात ८० कोटी रुपये किमतीची ब्राऊन शुगर जप्त केल्यानंतर एका व्यक्तीला अटक करण्यात आली, अशी माहिती आसाम रायफल्सने गुरुवारी दिली.

मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे, आसाम रायफल्स, सीआरपीएफ आणि जिरीबाम पोलिसांच्या संयुक्त पथकाने बुधवारी जेटी रोड परिसरातील माखा बस्ती येथे शोध मोहीम राबवली आणि संबंधित व्यक्तीकडून १०.८९१ किलो ब्राउन शुगर जप्त केली. अटक करण्यात आलेली व्यक्ती आणि जप्त केलेला मादकपदार्थ पुढील कायदेशीर कारवाईसाठी जिल्हा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहेत.

# जग ओलांडणार १.५ अंश सेल्सिअस तापमानवाढीची मर्यादा

### संयुक्त राष्ट्रांच्या अहवालाने दिला इशारा

**न्यू यॉर्क, ४ सप्टेंबर**

जागतिक हवामान बदलांविरुद्धच्या लढ्यात एक महत्त्वपूर्ण वळण म्हणून, जग आता पुढील काही वर्षांतच २०१५ च्या पॅरिस हवामान करारांतर्गत निश्चित केलेली १.५ अंश सेल्सिअस तापमान वाढीची मर्यादा ओलांडण्याची शक्यता आहे, असे संयुक्त राष्ट्रांनी म्हटले आहे.

'संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रमा'ने आता तापमान त्या मर्यादेच्या वर किती प्रमाणात वाढते यावर नियंत्रण ठेवणे आणि त्यानंतर ते पुन्हा खाली आणणे या गोष्टींवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे, हे एका अहवालात नमूद केले. त्या मार्गाचा अवलंब केला गेला, तरीही जगाला अनेक दशके हवामान बदलामुळे होणाऱ्या अधिक गंभीर नुकसानाचा सामना करावा लागेल. यामध्ये अत्यंत तीव्र हवामान, वाढती समुद्रपातळी, प्रजातींचा ऱ्हास आणि बर्फ व हिमनद्यांचे वितळणे यांचा समावेश आहे. पॅरिस करारानंतर, संयुक्त राष्ट्रांनी आपल्या हवामान-विज्ञानविषयक संस्थेला धोक्याच्या विविध मर्यादांची तपासणी करण्यास सांगितले.

शास्त्रज्ञांना १.५ अंश सेल्सिअसच्या तुलनेत दोन अंश सेल्सिअस तापमानात लोक आणि पृथ्वी यांच्यावर होणारे परिणाम अत्यंत गंभीर असतील, असे आढळून आले. काही शास्त्रज्ञांच्या मते, केवळ एका वर्षाऐवजी २० वर्षांच्या सरासरीचा विचार करता, जगाचे तापमान औद्योगिक क्रांतिपूर्व पातळीच्या तुलनेत आधीच १.४ अंश सेल्सिअसने वाढले आहे. सर्वांत आशावादी परिस्थितीत, जर देशांनी हवामानविषयक महत्त्वाकांक्षी उद्दिष्टे साध्य केली, तर या शतकाच्या मध्यापर्यंत जागतिक तापमानवाढ १.८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचून स्थिरावेल. मात्र, सध्याच्या सरकारी धोरणांनुसार, २१०० सालापर्यंत तापमान औद्योगिक क्रांतीपूर्व पातळीच्या तुलनेत २.६ अंश सेल्सिअसने वाढण्याचा अंदाज आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### अधिक उष्ण जगातच जगावे लागणार

हे अगदी स्पष्ट असायला हवे की, १.५ अंशांचे उद्दिष्ट हेच आपले ध्येय आहे. परंतु, आता आपल्याला त्या दिशेने वेगळ्या पद्धतीने म्हणजेच वरच्या पातळीवरून प्रयत्न करावे लागतील, असे यूएनईपीच्या कार्यकारी संचालक इंगर अँडरसन यांनी सांगितले. यासाठी जीवाश्म इंधनाचा वापर थांबवणे आणि हवेतून कार्बन डायऑक्साइड काढून टाकण्याचे मार्ग विकसित करणे आवश्यक ठरेल. आपल्याला आता या अधिक उष्ण झालेल्या जगातच जगावे लागणार आहे, असे या अहवालाचे सह-लेखक आणि एक्सेटर विद्यापीठातील हवामानशास्त्रज्ञ रिचर्ड बेट्स यांनी म्हटले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# विद्येच्या माहेरचा 'शस्त्रार्थ'

पुणे शहराला महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखले जाते. या शहराला विद्येचे माहेरघर किंवा ऑक्सफर्ड ऑफ दि इस्ट असेही म्हणतात. स्वातंत्र्यलढा, राजकारण, समाजसुधारणा, साहित्य, कला, संस्कृती, क्रीडा, विज्ञान अशा अनेकानेक क्षेत्रांत पुण्याचा इतिहास देदीप्यमान आहे. छत्रपती शिवाजी महाराजांपासून महात्मा फुले, लोकमान्य टिळक, महर्षी कर्वे, गोपाळ गणेश आगरकर, पु. ल. देशपांडे ते आजच्या काळातील अनेक मान्यवर अशी ही थोर परंपरा. महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यात वंचित वर्गाला द्यावयाच्या प्रतिनिधित्वाविषयी ज्या शहरात शास्त्रार्थ झाला, ते शहर म्हणजे पुणे. टिळक-आगरकरांचा शास्त्रार्थ याच शहरात घडला. त्याच शहरात आता 'शास्त्रार्था'ऐवजी 'शस्त्रार्था'चे रंग गहिरे होऊ लागले आहेत. गुन्हेगारी व हिंसाचार वाढतोच आहे; शिवाय छोट्या विषयांवरूनही हिंसा घडू लागली आहे. ताजे उदाहरण उत्सवात डीजे वापरण्यास विरोध करणारे सामान्य नागरिक विद्यानंद बापट यांना झालेल्या मारहाणीचे. भारतीय समाज बहुरंगी आणि बहुढंगी आहे. एरवी त्याचाच आपण विविधतेतील एकता वगैरे म्हणत ढोल बडवितो. पण, डीजेचा गोंगाट नको म्हणणारे एखादे बापट आपल्याला चालत नाहीत हे नवलच म्हटले पाहिजे.

भारतीय संस्कृतीत मतभेदांना नेहमीच स्थान राहिले आहे. आपली संस्कृती कमालीची सर्वसमावेशक आहे. ईश्वरावर विश्वास ठेवणारे, न ठेवणारे हे सारे एकाच ईश्वराचे अंश आहेत आणि त्यामुळे ते सारे आपलेच आहेत, असे मानणारी आपली संस्कृती. चार्वाकाचा भौतिकवाद हा देखील एक विचार आहे, हे मान्य करणारी आपली परंपरा. आपल्या संस्कृतीने चार्वाक किंवा अन्य समांतर विचारधारांना धर्मविरोधी म्हणून नष्ट केले नाही. उलट आपल्यातील एक विचारप्रवाह म्हणून त्यांना आदराचे स्थान दिले. हजारो वर्षांपासून शास्त्रार्थ आणि खंडन-मंडन यांची परंपरा भारतात अक्षुण्ण राहिली. आधुनिक काळात भारतीय समाजाच्या वैचारिक परंपरेचे प्रतिनिधित्व आपली राज्यघटना करते. त्या घटनेतही अभिव्यक्ती स्वातंत्र्याची हमी आहे. तीच राज्यघटना कलम २१ प्रमाणे आपल्या सर्वांना प्रतिष्ठित-सुखमय जीवनाचा अधिकार देते. २१ व्या कलमाच्या तरतुदींमध्ये नागरिकांना सन्मानाने व शांतपणे जगण्याचा अधिकार अनुस्यूत आहे. खाजगीपणा (प्रायव्हसी) राखण्याचा अधिकार, स्वच्छ पर्यावरणात आरोग्यदायी जीवन जगण्याचा अधिकार, उपजीविकेचा अधिकार असे विविध प्रकारचे अधिकार राज्यघटनेने नागरिकांना बहाल केलेले आहेत. २००५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने एक निकाल दिला होता. ध्वनिप्रदूषणमुक्त वातावरणात जगणे हाही शांततेत जगण्याच्या अधिकाराचा भागच होय, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाला संपूर्ण भारतासाठी कायद्याचा दर्जा असतो. बापट यांची मागणी किंवा आवाहन त्या कायद्याच्या बाहेरचे नाही. त्यांच्यावर हल्ला करणाऱ्यांच्या व त्या हल्ल्याचे समर्थन करणाऱ्यांच्या आकलनात चूक आहे, असे दिसते. खरा प्रश्न इथे डीजेचा नाही. खरा प्रश्न आहे तो इतरांच्या जगण्याच्या अधिकाराचा आदर करण्याचा. मला उत्सव साजरा करण्याचा अधिकार जसा आहे, तसाच दुसऱ्याला शांततेत जगण्याचा अधिकार आहे, हे मान्य करण्याचा हा प्रश्न आहे. माझ्या आनंदाचा आवाज इतरांना त्रासदायक ठरत असेल तर त्या आनंदाला पावित्र्य उरत नाही, हे न समजण्याचा हा मुद्दा आहे. भारतीय सणांना आता जे स्वरूप आले आहे, तो काळाचा महिमा असला तरी त्यातले सगळेच चांगले किंवा वाईट असे सरसकट म्हणता येत नाही. व्यापक समाजहितासाठी कोणत्याही गोष्टीत बदल करणे ही आपलीच परंपरा आहे. उत्सव हे भारतीय समाजजीवनाचे अविभाज्य अंग आहेत. आनंद व्यक्त करण्यासाठी एकत्र येणे, परंपरा जपणे, देवदेवतांची आराधना करणे, मिरवणुका काढणे, संगीत व नृत्य करणे याला आपल्या संस्कृतीत मोठे स्थान आहे. मात्र, उत्सवाच्या आनंदाचे रूपांतर उन्मादात होत असेल आणि इतरांना त्रास होत असेल तर आपल्या सणांच्या संदर्भातील मूळ विचार मागे पडतात, हे सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे.

एखाद्याने कायद्याच्या चौकटीत राहून प्रश्न उपस्थित केला की त्याला उत्तर देण्याऐवजी त्याची टवाळी करणे किंवा त्याला मारहाण करणे हे फक्त एका व्यक्तीच्या अवमानापुरते मर्यादित कृत्य नाही. तो समाजाच्या वैचारिक अधःपतनाचा संकेत आहे. बापट यांनी युक्तिवाद केला. त्यांना युक्तिवादाने उत्तर देता येणे शक्य आहे. त्यांच्या साऱ्याच वक्तव्यांचे समर्थन करता येत नाही. पण, त्यांना झालेल्या मारहाणीचेही समर्थन होऊ शकत नाही. युक्तिवादाला गुद्याने उत्तर द्यावे लागत असेल तर आपण शास्त्रार्थ सोडून शस्त्रार्थाच्या दिशेने निघालो आहोत, असेच म्हणावे लागेल. पुण्याची अस्मिता आणि ओळख विद्या, शास्त्रार्थ आणि पुरुषार्थाशी जोडलेली आहे. मतभेद कसे मांडायचे, विरोध कसा करायचा आणि तर्काच्या आधारे भूमिका कशी सिद्ध करायची, याचे अनेक दाखले पुण्याच्या इतिहासात सापडतात. तो शास्त्रार्थ बाजूला पडून शस्त्रार्थाचाच बोलबाला होऊ लागतो तेव्हा साऱ्याच शहरांनी आपल्या इतिहासात डोकावून पाहिले पाहिजे. आपले समाजजीवन नेमक्या कोणत्या दिशेने चालले आहे, याचा धांडोळा घेतला पाहिजे. शास्त्रार्थात पराभव झाला तर पुन्हा विचार करता येतो. मात्र, शस्त्रार्थात अनिष्ट प्रवृत्तींचा विजय झाला तर समाजाचा पराभव होतो. कारण दहशतीच्या वातावरणात विचार मांडण्याची हिंमतच कमी होत जाते आणि भयमुक्त लोकशाहीच्या पायाला धक्का लागत असतो. आज विद्यानंद बापट आहेत. उद्या दुसरा कोणी असेल. आज प्रश्न डीजेचा आहे, उद्या तो रस्त्यावरील अतिक्रमणाचा असेल, प्रदूषणाचा असेल, वाहतुकीचा असेल किंवा एखाद्या सामाजिक विषयाचा असेल. प्रश्न विचारणाऱ्या प्रत्येक नागरिकाला 'तू कोण हे बोलणारा?' असे विचारले जाणार असेल, तर लोकशाहीतील नागरिकत्वाच्या अधिकारांना अर्थच उरणार नाही. भारतीय नागरिकाला प्रश्न विचारण्यासाठी राजकीय पक्षातील पद, संघटनेचे सदस्यत्व किंवा कोणत्याही नेत्याचे पाठबळ लागत नाही. नागरिक असणे एवढीच पात्रता पुरेशी आहे. बापट यांची पात्रता त्यामुळे फक्त नागरिक म्हणून प्रश्नातीत आहे. त्यांच्यासारखा तर्क करता न येणारे लोक युक्तिवादापासून पलायन करीत आहेत आणि हिंसेचा आधार घेत आहेत. विचार चुकीचा असेल तर खोडून काढलाच पाहिजे. तसे न होता फक्त मारहाण करण्याचे समर्थन होऊ शकत नाही. विद्येचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शहरात मतभेद व्यक्त करण्याच्या संदर्भात असे वातावरण निर्माण होत असेल तर ते योग्य नाही. विद्या केवळ पदवी मिळवून देत नसते. विद्या ही माणसाला असहमतीचा स्वीकार करण्याची ताकद देते. ती माणसाला सहनशील व समंजस बनविते. आपल्याला न पटणारे ऐकून घेणे, स्वतःची भूमिका तपासणे आणि गरज पडल्यास ती बदलणे हीच खरी विद्वत्ता असते. ज्याला प्रत्येक विरोधक शत्रू वाटतो, त्याने कितीही पुस्तके वाचली असली तरी त्याच्यात विद्येचा संस्कार किती उतरला, हा प्रश्न उरतोच. त्यामुळेच पुण्याने आणि त्याच्यापाठोपाठ अन्य शहरांनी देखील भारतीय संस्कृतीचा आदर करीत चर्चेची, शास्त्रार्थाची परंपरा पुन्हा जिवंत केली पाहिजे. पुण्याच्या इतिहासात 'शास्त्रार्थ' हा शब्द केवळ धार्मिक किंवा तात्त्विक चर्चेपुरता मर्यादित नव्हता. तो व्यापक सार्वजनिक संस्कृतीचा भाग होता. तर्काचा सामना प्रतितर्काने व्हायचा. मतभेदांतून नवे विचार जन्माला यायचे. त्याच परंपरेचे पुनरुज्जीवन आज पुण्याला नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी आवश्यक आहे. लोकतांत्रिक समाजाची खरी ताकद सर्वांनी एकसारखा विचार करण्यात नसते. सर्वांनी वेगळे विचार करूनही एकत्र राहण्यात असते. भारत हजारो वर्षे विविध विचार, पंथ, उपासना, तत्त्वज्ञान आणि जीवनपद्धती यांना सामावून घेत टिकला, याचे कारण मतभेदांचा अभाव नव्हे; तर मतभेदांसह जगण्याची आपली क्षमता हेच होते. आज त्या क्षमतेचीच कसोटी आहे... अर्थात आपल्या सर्वांचीच परीक्षा आहे. ■

## प्रासंगिक

# शिक्षक : समाजमन घडवणारे भविष्याचे शिल्पकार

**द्रौपदी मुर्मू**, राष्ट्रपती

शिक्षक विद्यार्थ्यांचे भवितव्य साकारत असतात. या शिक्षक दिनानिमित्त, सर्व भारतीयांच्या वतीने, मी अशा सर्व शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करते जे आपल्या कोट्यवधी विद्यार्थ्यांचे जीवन ज्ञान, कौशल्ये, मूल्यांनी परिपूर्ण करतात आणि त्यांना प्रेरित करतात. भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची अशी इच्छा होती की, त्यांचा जन्मदिवस 'शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जावा, हे सर्वश्रुत आहे. ते आंतरराष्ट्रीय ख्यातीचे विद्वान, प्रसिद्ध लेखक आणि आदरणीय मुत्सद्दी होते; मात्र तरीही त्यांनी शिक्षक म्हणून आपल्या भूमिकेला इतर सर्व भूमिकांपेक्षा सर्वांत महत्त्वाचे मानले. भारताचे एक अत्यंत लाडके माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना एकदा विचारण्यात आले होते की, लोक त्यांना वैज्ञानिक म्हणून अधिक लक्षात ठेवतील की राष्ट्रपती म्हणून? त्यावर डॉ. कलाम यांनी उत्तर दिले होते की, त्यांना एक शिक्षक म्हणून आठवणीत राहायला आवडेल.

ज्यांचे कौशल्य आणि चारित्र्य त्यांना वंदनीय बनवते आणि त्यामुळे ज्याच्याप्रति समस्त विद्यार्थी समर्पित असतात असे शिक्षक नेहमीच आपले आदर्श राहिले आहेत. शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांवर स्वतःच्या मुलांप्रमाणे प्रेम केले पाहिजे, त्यांनी सर्वांना समान आणि न्याय्य वागणूक दिली पाहिजे, अशी आपल्या प्राचीन ग्रंथांची शिकवण आहे. सुमारे तीन सहस्र वर्षांपूर्वी तैत्तिरीय उपनिषदातील 'शिक्षावल्ली'ने 'आचार्यदेवो भव' हा कालातीत संदेश दिला होता. अनेक ज्ञानी आणि अतिशय आपुलकीने मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभणे हे माझे परमभाग्य राहिले आहे. आमचे शिक्षक शाळेच्या वेळेनंतरही काही वेळा, त्यांच्या घरी आम्हाला शिकवायचे आणि आमची खूप काळजी घ्यायचे. सातवीची शाळा पूर्ण केल्यानंतर, पुढील शिक्षणासाठी गावाबाहेर पडणारी मी पहिली मुलगी होते. नंतर भुवनेश्वरमध्ये शिकत असतानाही, मला माझ्या शिक्षकांकडून उदंड प्रेम आणि प्रोत्साहन मिळण्याचे सौभाग्य लाभले. मी माझ्या शिक्षकांचा उल्लेख येथे अत्यंत नम्रतेने करत आहे, कारण त्यांची कथा एका सखोल सत्याचे दर्शन घडवते : एक प्रेमळ आणि समर्पित शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये असीम क्षमता आणि प्रेरणा जागृत करू शकतो. त्यांच्या या प्रोत्साहनाने बळकट होऊन, विद्यार्थी आयुष्यातील कठीण आव्हानांना तोंड देण्याचे धैर्य आणि सर्वोच्च ध्येये गाठण्याचा आत्मविश्वास विकसित करतात. शिक्षक आपल्या स्वतःच्या आचरणातून आणि उदाहरणातून, ते एक यशस्वी आणि अर्थपूर्ण जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेली कला आणि कौशल्य यांनी विद्यार्थ्यांना संपन्न बनवतात. मार्गदर्शक असण्यासोबतच, शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या ज्ञानार्जनाच्या प्रवासातील एक शुभचिंतक, मित्र आणि सहप्रवासीसुद्धा असतो.



'एक चांगला शिक्षक कसा असावा' याविषयी प्राचीन काळापासून आपल्या संस्कृती आणि परंपरेतून मिळालेला हा दृष्टिकोन आजही तितकाच प्रासंगिक आहे. अनेक शतकांपूर्वी महाकवी कालिदासांनी त्यांच्या 'मालविकाग्निमित्रम्' या नाटकात लिहिले आहे की, चांगला शिक्षक तोच असतो ज्याच्याकडे सखोल ज्ञान असते आणि ते ज्ञान प्रभावीपणे संक्रमित करण्याची क्षमताही असते. संस्कृतमधील एक प्रसिद्ध सुभाषित आपल्याला सांगते : 'सर्वत्र विजयम् इच्छेत्, शिष्यात् इच्छेत् पराजयम्' - माणसाने सर्वत्र विजयाची इच्छा बाळगावी, परंतु स्वतःच्या शिष्याकडून मात्र पराभूत होण्याची इच्छा ठेवावी. विद्यार्थ्यांमध्ये स्वतंत्र विचारांना प्रोत्साहन देणे, त्यांची उत्सुकता प्रज्वलित करणे, प्रश्न विचारण्याच्या वृत्तीला खतपाणी घालणे, त्यांची तर्क आणि निर्णयाची क्षमता तीक्ष्ण करणे आणि त्यांना एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून घडण्यास मदत करणे हे अध्यापनाचे सर्वांत उपयुक्त आणि सन्माननीय पैलू आहेत. अध्यापन हा केवळ एक व्यवसाय नाही; तर ते एक व्रत आहे. ही केवळ एक कारकीर्द किंवा नोकरी नाही; तर मानवतेला आकार देण्याचे एक पवित्र कार्य आहे. येणाऱ्या पिढ्यांचा मार्ग प्रकाशित करण्याची ही एक उदात्त जबाबदारी आहे. अध्यापनाशी जोडलेल्या माझ्या आठवणी मला एका विशेष समाधानाची अनुभूती देतात. मी ओडिशातील रायरंगपूर येथील श्री ऑरोबिंदो इंटेग्रल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना शिकवले आहे. विविध विषय शिकवण्याव्यतिरिक्त मुलांचे संगीत कार्यक्रम, क्रीडा उपक्रम आणि नाटकांच्या तयारीसाठी पूर्णपणे मदत करत असे. आजही स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्यांची आमची तयारी आणि कार्यक्रमांदरम्यान मुलांमधील आनंदी उत्साहाच्या आठवणी माझ्यासाठी अतिशय सुखावह असतात. विद्यार्थ्यांना सुंदर नैसर्गिक वातावरणात सहलीला नेण्यात आणि खेळ तसेच शोधाच्या माध्यमातून त्यांना प्राणी, पक्षी, झाडे आणि वनस्पतींच्या जगाची ओळख करून देण्यात मला खूप समाधान लाभले आणि जीवनाचा अर्थ सापडला. शाळा सोडल्यानंतर अनेक वर्षांनीही माझे विद्यार्थी मला त्यांच्या कौटुंबिक कार्यक्रमांना आदरपूर्वक आमंत्रित करतात. मला माझ्या अनेक विद्यार्थ्यांची नावेच नव्हे, तर आम्ही ज्या टोपणनावांनी त्यांना प्रेमाने हाक मारायचो ती टोपणनावेही आठवतात.

राष्ट्रपती म्हणून माझ्या कार्यकाळाचे दुसरे वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने, मी राष्ट्रपती भवनाच्या परिसरात असलेल्या शाळांमधील विद्यार्थ्यांसोबत वेळ घालवला आणि त्यांना पर्यावरण संरक्षणाविषयी शिकवले. विद्यार्थ्यांना भेटण्यासाठी आणि त्यांचे विचार व कल्पना समजून घेण्यासाठी मी नेहमीच उत्सुक असते. साधारण ११ वर्षांपूर्वी, मी माझ्या गावच्या घरी एका निवासी शाळेची स्थापना केली. या शाळेत वंचित कुटुंबांतील विद्यार्थी आणि ज्यांनी आपले आई-वडिलांचे छत्र गमावले आहे अशी बालके शिक्षण घेतात. मी वेळोवेळी या बालकांना भेटण्यासाठी या शाळेला भेट देत असते. यावर्षी, २० जून रोजी माझ्या वाढदिवसाच्या दिवशी या बालकांना भेटून मला खूप आनंद झाला. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी यांनीही माझ्यासोबत शाळेला भेट दिली आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. त्यांना भेटण्याचा हा असाधारण अनुभव या विद्यार्थ्यांसाठी कायमस्वरूपी प्रेरणास्रोत बनेल. त्या मुलांना प्रगती करताना पाहून माझ्या मनात एका विशेष अर्थपूर्णतेची भावना निर्माण होते.

शिक्षण देण्याचे कार्य ही केवळ शिक्षकांची एकट्याचीच जबाबदारी नाही. जे लोक आपल्या आचरणातून आणि कर्तृत्वातून मुलांसाठी आदर्श बनतात, तेसुद्धा शिक्षण आणि प्रेरणेचा एक मौल्यवान स्रोत असतात. पालक आणि पालकवर्ग जेव्हा आपल्या मुलांना शिकण्यासाठी पाठवतात, तेव्हा शिक्षकांवर त्यांचा सर्वाधिक विश्वास असतो. शिक्षक आपल्या मुलांना स्वतःचे मानतील आणि मुलांच्या सुरक्षेची व विकासाची पूर्ण काळजी घेतील, असा त्यांचा विश्वास असतो. पालकांच्या या पवित्र विश्वासाचे जतन करणे हे प्रत्येक शिक्षकाचे कर्तव्य आहे. शिक्षकाची वृत्ती, आचरण आणि वर्तनामुळे मुलांमध्ये भीती आणि चिंता निर्माण होऊ नये, त्यांचे खच्चीकरण होऊ नये किंवा त्यांच्यात कोणतीही न्यूनगंडाची भावना निर्माण होऊ नये. चांगले शिक्षक त्यांच्या विद्यार्थ्यांना सर्वोत्तम व्यक्ती बनण्यास मदत करतात. आपल्या विद्यार्थ्यांना एक चांगला माणूस बनवण्यासाठी मार्गदर्शन करणे हे शिक्षकांचे पवित्र कर्तव्य आहे. जे विद्यार्थी आपल्या विचारांत आणि कृतीत नैतिक राहून समृद्धी आणि यश संपादन करतात, ते शिक्षकांच्या यशाचे जिवंत प्रतीक असतात. आपला देश सामाजिक समावेशनाला केंद्रस्थानी ठेवून विकसित भारत बनण्याच्या ध्येयाकडे एका निश्चित गतीने वाटचाल करत आहे. या प्रवासात आपण पुढे जात असताना, आपल्या शिक्षकांनी अशा विद्यार्थ्यांच्या पिढ्या घडवाव्यात, ज्या आपल्या सांस्कृतिक वारशाच्या आणि परंपरेच्या समृद्धीला जपतील; वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करतील आणि मानवतेच्या कल्याणासाठी कार्य करतील; 'अंत्योदय'च्या आदर्शाचे पालन करतील; पर्यावरण आणि सर्व सजीवांचे रक्षण करतील; वैयक्तिक आणि सामूहिक उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करतील आणि 'राष्ट्र प्रथम'च्या भावनेने पुढे जातील. मी प्रत्येक नागरिकाला एक आवाहन करते की आपल्या ध्येयासाठी वाहून घेतलेल्या आणि अतिशय प्रामाणिक असलेल्या शिक्षकांचा नेहमीच आदर करा. अशा प्रकारच्या ध्येयनिष्ठ शिक्षकांच्या योगदानामुळे भारत शिकत राहील आणि जगाचे नेतृत्व करत राहील, अशी मी मनापासून कामना करते. ■

## वेध

**विजय कुळकर्णी**

# 'एनसीएमसी'ची सवलत आणि प्रवाशांना फटका

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातर्फे नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (एनसीएमसी)ची १ सप्टेंबरपासून अंमलबजावणी सुरू केली. मात्र, त्यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. ही केवळ तांत्रिक अडचण म्हणून दुर्लक्ष करण्याजोगी बाब नसून सामाजिक दृष्टिकोनातून पाहता ही योजना अत्यंत महत्त्वाची आहे. या योजनेच्या लाभ देण्या-घेण्यातच अडथळे निर्माण होत असल्यास शासनाच्या चांगल्या योजनांची अंमलबजावणी नेमकी कोठे कमी पडते, असा प्रश्न उपस्थित होतो. या योजनेंतर्गत ५० टक्के प्रवास सवलत असलेल्या महिला, मोफत प्रवास सवलत असलेले ज्येष्ठ नागरिक इत्यादी सर्व प्रवास सवलतीच्या लाभार्थी प्रवाशांनी एनसीएमसी कार्ड काढले. त्यावर विश्वास ठेवून प्रवासाचे नियोजन केले. प्रवासासाठी बसमध्ये आसनस्थ झाल्यानंतर प्रवाशांना त्यांचे कार्ड अद्ययावत नसल्याचे सांगण्यात आले. एवढेच नव्हे तर, प्रवाशांना बसमधून उतरण्यास सांगण्यात आले. ही बाब विशेषतः ज्येष्ठ नागरिक व महिलांसाठी मोठी त्रासदायक ठरली. खामगाव येथील बस स्थानकावर हा प्रकार घडला. ज्येष्ठ नागरिकांसाठी हा प्रकार अतिशय त्रासदायकच आहे. त्यांचे वय, शारीरिक क्षमता आणि प्रवासातील अडचणी लक्षात घेऊनच त्यांच्यासाठी ही मोफत प्रवासाची सुविधा महाराष्ट्र सरकारने सुरू केली. अशा प्रवाशांना सामानासह बसमधून उतरणे, पुन्हा स्थानकात थांबून दुसऱ्या बसची वाट पाहणे किंवा प्रवासाची पर्यायी व्यवस्था करणे, हा त्यांच्या प्रवास सवलतीच्या अधिकाराचा योग्य सन्मान नाही. ज्या ज्येष्ठ लाभार्थींसाठी सुविधा सुरू करण्यात आली त्यांनाच जर अशाप्रकारे त्रास व मनस्ताप सहन करावा लागत असेल तर योजनेच्या अंमलबजावणीबाबत प्रश्न उपस्थित होणे साहजिकच आहे.

महिलांसाठी ५० टक्के प्रवास सवलत ही शासनाच्या विविध योजनांपैकी महत्त्वाची योजना आहे. या सुविधेच्या लाभार्थी महिलांची संख्या खूप मोठी आहे. विशेषतः ग्रामीण भागातील महिलांसाठी एस. टी.चा प्रवास दैनंदिन जीवनाची आवश्यकता आहे. बाजारपेठ, दवाखाना, शासकीय कार्यालयात जाणे, शिक्षण, नोकरी किंवा कौटुंबिक कारणांसाठी त्यांना प्रवास करावा लागतो. अशा लाभार्थींचे कार्ड स्वीकारले नाही तर, त्या प्रवास सवलतीस पात्र असूनही त्यांना त्या प्रवास सवलतीचा लाभ मिळणार नाही. तंत्रज्ञानाचा वापर करून सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सुलभ, पारदर्शक आणि गतिमान करणे, हा शासनाचा उद्देश असतो. एनसीएमसी कार्ड हे त्याच दिशेने टाकलेले पाऊल आहे. मात्र, तंत्रज्ञानामुळे सुविधा मिळण्याऐवजी प्रवाशांची डोकेदुखी वाढली तर, अशा तंत्रज्ञानाचे करायचे काय, असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो. तेव्हा, या तंत्रज्ञानाच्या अंमलबजावणीचा पुनर्विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. कार्ड अद्ययावत नाही, प्रणालीत माहिती दिसत नाही, मशीन कार्ड स्वीकारत नाही, अशा कारणांमुळे प्रवाशांना शिक्षा मिळता कामा नये. त्यामुळे एस. टी. प्रशासनाची जबाबदारी येथे अधिक वाढते. कार्डधारक प्रवाशांची माहिती वेळेवर अद्ययावत करण्यासाठी नियमित मोहीम राबविणे, कार्डमध्ये अडचण असल्यास बस स्थानकावरच त्या दूर करण्याची सुविधा उपलब्ध करून देणे.,चालक-वाहकांना स्पष्ट सूचना देणे आवश्यक आहे. एखाद्या प्रवाशाचे कार्ड अद्ययावत नसल्यास त्याला पर्यायी व्यवस्थेने प्रवास सवलत सुविधा उपलब्ध करून देण्याची तात्पुरती व्यवस्था करता येऊ शकते का? यावर एस. टी. महामंडळाने विचार केला पाहिजे. प्रवाशांना नियमांची माहिती असली पाहिजे, हे खरे पण, त्याचवेळी नियमांची अंमलबजावणी करताना मानवी दृष्टिकोनही तितकाच महत्त्वाचा ठरतो. ज्येष्ठ नागरिक व महिला प्रवाशांच्याबाबतीत संवेदनशीलता अपेक्षित आहे. तांत्रिक बिघाड हा प्रवासी किंवा कर्मचाऱ्यांचा दोष नसतो. पण, त्याचा संपूर्ण भार प्रवाशांवर टाकणे अन्यायकारकच नाही का? खामगाव बस स्थानकातील ही घटना हा भविष्यासाठी एक इशारा समजण्यास हरकत नाही. त्यावरून आज काही प्रवाशांची गैरसोय झाली. उद्या ही समस्या मोठ्या प्रमाणात निर्माण होऊ शकते. तेव्हा, संबंधित यंत्रणेने केवळ त्या दिवसाच्या तक्रारींवर पडदा न टाकता एनसीएमसी कार्ड प्रणालीची प्रत्यक्ष तपासणी केली पाहिजे.

शासकीय योजना कागदावर आकर्षक असण्यापेक्षा त्या प्रत्यक्ष प्रवाशांपर्यंत किती सहजतेने पोहोचतात, हे महत्त्वाचे आहे. ५० टक्के किंवा मोफत प्रवास सवलत ही सुविधा सांगण्यापुरती न राहता प्रवाशांना कोणत्याही अनावश्यक अडथळ्यांविना त्याचा लाभ मिळाला पाहिजे. अन्यथा सवलतीच्या केवळ घोषणाच ठरतील. ■

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# अराजकतावाद्यांची कोल्हेकुई!

'विनाशकाले विपरीत बुद्धी' या सुप्रसिद्ध सुभाषितात दडलेला अर्थ सध्या महाराष्ट्रातील तथाकथित पुरोगामी, ढोंगी विरोधक आणि अराजकतावाद्यांच्या वर्तनावरून तंतोतंत खरा ठरताना दिसत आहे. राज्याच्या राजधानीत आणि संपूर्ण महाराष्ट्रात सध्या लाडक्या बाप्पाच्या आगमनाने गणेशोत्सवाचे चैतन्य ओसंडून वाहत आहे. मात्र, काही सुपारीबाज मंडळींनी आणि रडक्या विरोधकांनी एका नव्या वादाला तोंड फोडून स्वतःची राजकीय पोळी भाजण्याचे नीच राजकारण सुरू केले आहे. डीजेबंदी आणि त्यावरून विद्यानंद बापट यांना झालेली मारहाण, या एका घटनेचे भांडवल करून राज्य सरकारला थेट आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा जो अश्लाघ्य प्रकार सध्या सुरू आहे, तो म्हणजे निव्वळ 'चोराच्या उलट्या बोंबा' आणि विनाशकाळाचीच चाहूल आहे.

कोणत्याही व्यक्तीला मारहाण होणे, मग तो विद्यानंद बापट असो वा दुसरा कुणीही, याचे समर्थन कायद्याचे राज्य मानणारा कोणताही सुसंस्कृत माणूस करणार नाही. बापटांना झालेली मारहाण हा प्रकार काही अतिउत्साही आणि नियम मोडणाऱ्या सार्वजनिक मंडळाच्या कार्यकर्त्याकडून घडला. मात्र, या घटनेनंतर ज्या वेगाने एक विशिष्ट 'इकोसिस्टिम' सक्रिय झाली आणि बापटांना रातोरात 'हिरो' किंवा 'क्रांतिकारक' बनवण्याचा जो घाट घातला गेला, तो अत्यंत संतापजनक आहे. आज बापटांसाठी गळे काढणाऱ्या आणि 'महाराष्ट्रात लोकशाही धोक्यात आली आहे' असा टाहो फोडणाऱ्या या ढोंगी मंडळींना एक साधा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे की, तुमच्या संवेदना एवढ्या 'सोयीस्कर' कशा असू शकतात? महाविकास आघाडीच्या काळात, सत्तेच्या मस्तीत जेव्हा अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा उघडउघड गळा घोटला जात होता, तेव्हा ही कोल्हेकुई करणारी मंडळी मूग गिळून गप्प का होती? एका साध्या सोशल मीडिया पोस्टवरून अभिनेत्री केतकी चितळेला महिनाभर तुरुंगात डांबण्यात आले, तिच्यावर शाईफेक झाली, तिला अमानुष वागणूक देण्यात आली; तेव्हा हे पुरोगामी आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे ठेकेदार कोणत्या मठात झोपले होते? माजी नौदल अधिकारी मदन शर्मा यांना केवळ एक राजकीय व्यंगचित्र फॉरवर्ड केले म्हणून भररस्त्यात तत्कालीन सत्ताधारी पक्षाच्या गुंडांनी रक्तबंबाळ होईपर्यंत मारहाण केली; तेव्हा या मंडळींच्या डोळ्यांतील अश्रू कुठे आटले होते? आणि सर्वांत कहर म्हणजे, अनंत करमुसे या सामान्य नागरिकाला थेट तत्कालीन मंत्र्याच्या बंगल्यावर नेऊन, पोलिसांच्या समक्ष बेदम मारहाण करण्यात आली. तत्कालीन सरकारच्या या अघोषित आणिबाणीवर आणि हुकूमशाही प्रवृत्तीवर आज बापटांसाठी छाती बडवणाऱ्या या एकाही 'विचारवंताने' किंवा विरोधी पक्षाच्या नेत्याने चकार शब्द काढला नव्हता. कारण तेव्हा त्यांना पोसणाऱ्या 'मालकांची' सत्ता होती!

हा सर्व कांगावा म्हणजे केवळ बापटांविषयीचा पुळका नाही, तर यामागे एक मोठे आणि पद्धतशीर षडयंत्र आहे. मराठा आरक्षणाचा मुद्दा असो, बदलापूरची घटना असो, मालवणमधील शिवरायांचा पुतळा कोसळण्याची दुर्दैवी घटना असो किंवा पेपरफूट आणि आता डीजेबंदीचा मुद्दा; प्रत्येक घटनेत राज्य सरकारला टार्गेट करून महायुतीचे सरकार अस्थिर करण्याचा हा सुनियोजित कट आहे. राज्य सरकारने महिलांना बसचं अर्ध तिकीट, 'लाडकी बहीण' यांसारख्या योजनांमधून सर्वसामान्यांच्या थेट घराघरांत पोहोचण्याचे काम केल्यामुळे विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. महाराष्ट्रातील जनता सुज्ञ आहे. त्यांना विरोधकांचा आणि या विशिष्ट इकोसिस्टिमचा दुटप्पीपणा आता पूर्णपणे समजून चुकला आहे. सत्तेसाठी हपापलेल्या आणि केवळ आकसापोटी राज्य सरकारला बदनाम करणाऱ्या या प्रवृत्तीला जनता आगामी काळात त्यांच्याच भाषेत चोख उत्तर देईल, हे नक्की! बापटांना हिरो बनवून स्वतःची राजकीय पोळी भाजणाऱ्यांनी हे कायम लक्षात ठेवावे की, सत्याचा विजय नेहमीच होतो आणि खोटेपणाचा बुरखा फाटायला फार वेळ लागत नाही.

पुणेकरांना 'डीजे'च्या आवाजामुळे होणारा त्रास आणि त्यांची त्याविरोधातील मागणी पूर्णपणे रास्त व वाजवी आहे. सरकार आवश्यक ती सर्व कायदेशीर पावले उचलेल आणि ठोस कारवाई करेल, हीच मुख्यमंत्र्यांची ठाम भूमिका आहे. परंतु, या प्रश्नाचे भांडवल करून जर कोणी रस्त्यावर कायदा हातात घेत असेल किंवा मारहाण करत असेल, तर त्याचे समर्थन कोणत्याही परिस्थितीत केले जाऊ शकत नाही. कायद्याचे राज्य असलेल्या महाराष्ट्रात गुन्हेगारांवर कडक कारवाई केली जात आहे आणि या प्रकरणातही पोलिसांनी तत्परतेने पावले उचलून संबंधितांवर कारवाई केलीच आहे. असे असतानाही, घडलेल्या प्रत्येक घटनेचे खापर परस्पर सरकारवरच फोडून राजकीय पोळी भाजण्याचा जो केविलवाणा कांगावा विरोधकांकडून सुरू आहे, तो म्हणजे त्यांच्या गलिच्छ राजकारणाचा आणि वैचारिक दिवाळखोरीचाच उत्कट पुरावा आहे. ■

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### दहीहंडीचा जल्लोष की जिवाचा 'जुगार'?



श्रीकृष्ण जन्माष्टमी हा आपल्या संस्कृतीतील अत्यंत पवित्र सण आहे. या सणाचा आनंदोत्सव एकमेकांमध्ये आपुलकी वाढवणारा असावा; मात्र काळानुरूप या सणाला जोडल्या गेलेल्या व्यावसायिकतेमुळे आज आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे.

आज दहीहंडी म्हणजे शुद्ध आनंदोत्सव राहिला नसून ते शक्तिप्रदर्शन, राजकीय चढाओढ आणि जाहिरातींचे मैदान बनले आहे. यातही सर्वांत चिंतेची बाब म्हणजे, लाखो रुपयांच्या बक्षिसांसाठी उंचच उंच दहीहंडी बांधण्याची लागलेली स्पर्धा. प्रसिद्धीसाठी मानवी मनोरे रचताना अनेक गोविंदा पथके अतिशय धोकादायक पद्धतीने आपला जीव धोक्यात घालतात. काही लाखांच्या बक्षिसासाठी किंवा प्रसिद्धीसाठी तरुणांचे अपघात होणे, अपंगत्व येणे किंवा जीव जाणे अत्यंत दुर्दैवी आहे. श्रीकृष्णाने भगवद्गीतेमध्ये मानवी जीवनाचे आणि कर्माचे महत्त्व सांगितले आहे. 'मनुष्य जन्म अत्यंत दुर्मिळ असून तो अनेक योनींमधून भ्रमण केल्यानंतर प्राप्त होतो.' अशा या अमूल्य मानवी जीवनाला केवळ काही लाखांच्या बक्षिसांसाठी आणि क्षुल्लक प्रसिद्धीसाठी अशा धोकादायक कसरती करत धोक्यात घालणे अजिबात योग्य नव्हे. प्रशासनाचे नियम पाळून सुरक्षिततेची काळजी घेणे गरजेचे आहे.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

■■■

### भीषण दुष्काळसदृश परिस्थिती आणि उपाय

यंदाच्या मान्सून हंगामात 'अल-निनो'च्या तीव्र प्रभावामुळे राज्यात विशेषतः विदर्भ आणि संपूर्ण देशात पावसाने ताण दिल्याने गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. जुलै महिन्यात विदर्भात समाधानकारक पाऊस झाल्यानंतर ऑगस्ट महिन्यात पावसाने पूर्णपणे निराशा केली. यामुळे विदर्भातील सर्व ११ जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा अत्यंत कमी पावसाची नोंद झाली आहे. जून ते ऑगस्ट या तीन महिन्यांच्या कालावधीत विदर्भात जवळपास ३५ ते ४० टक्के इतकी पावसाची तूट आहे. नागपूर जिल्हा परिषदेच्या लघुसिंचन विभागाच्या मालकीच्या एकूण ४०८ तलावांमध्ये सध्या केवळ ३० ते ३५ टक्केच पाणीसाठा शिल्लक आहे.

या गंभीर परिस्थितीचा सामना करण्यासाठी राज्य शासनाने, प्रशासनाने आणि नागरिकांनी तातडीने खबरदारीचे उपाययोजना करणे गरजेचे आहे. सर्व स्थानिक संस्थांनी पिण्याच्या पाण्याचे ऑडिट करून पुरवठा मर्यादित करावा. गाड्या धुणे, स्विमिंग पूल, आणि बांधकामांसाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करण्यावर तातडीने अंकुश घालावा. उद्योगांना दिल्या जाणाऱ्या पाण्याच्या कोट्यात कपात करून ते पाणी पिण्यासाठी राखून ठेवावे. उपलब्ध पाण्याचा साठा कमी असल्याने शेतकऱ्यांनी ठिबक किंवा तुषार सिंचनाचा वापर करावा. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे जमिनीत पावसाचे पाणी मुरण्यासाठी आणि प्रत्येक शहरातील प्रत्येक घरासाठी वॉटर हार्वेस्टिंग प्रणाली लावणे अनिवार्य केले पाहिजे. आतापासून उपाय योजले तरच भविष्यातील दुष्काळाची दाहकता कमी करता येईल.

**प्रा. विलास डोईफोडे**/९११२८५७२९९

■■■

### शिक्षणविषयक तत्त्वज्ञानात्मक उपदेश

शिक्षक हा दीपस्तंभ आणि आरशासारखा असतो. अज्ञानाचा अंधकार दूर करून ज्ञानरूपी किरण प्रसारित करतो. तर हेच किरण परावर्तित करून समाजाच्या सर्व क्षेत्रांपर्यंत पोहचवीत असतो. समाजाला त्याचे खरे प्रतिबिंब काय आहे, याची जाणीव करून देण्याचे कामदेखील शिक्षक करीत असतो. आपल्या भारतीय संस्कृतीत आचार्य या पदाला प्राचीन काळापासून फार मोठा मान आहे. मातृपितृ देवोभव आणि त्यानंतर आचार्य देवोभव असे सांगितले गेले आहे. आजच्या आधुनिक काळात समाजाला खऱ्या अर्थाने सुशिक्षित आणि गुणसंपन्न करण्याचे फार मोठे दायित्व अलिकडच्या शिक्षक या घटकावर सोपवले गेले आहे. परंतु आचार्य ते शिक्षक हा सगळा प्रवास जर बघितला तर काळाप्रमाणे अनेक गोष्टी बदललेल्या किंवा त्यामध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या आपल्याला दिसून येतात. तरीदेखील आचार्य ते शिक्षक यांच्याविषयीचा आदरभाव कायम राहिला पाहिजे हा आग्रह आपल्याला नाकारता येत नाही. आज ५ सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करीत असताना त्यामागचे एकूण जीवनमूल्य समजून घेणे आवश्यक आहे. तत्त्वज्ञानाचे अभ्यासक, ऑक्सफर्डसारख्या विद्यापीठाचे प्राध्यापक, आंध्र विज्ञापीठ, बनारस हिंदू विद्यापीठांचे उपकुलगुरू आणि भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. राधाकृष्णन यांच्याकडे असलेला विद्याव्यासंग आणि त्यांनी केलेल्या विविध ग्रंथांमधून मांडलेली बहुमूल्य मते ही समाजाला सुशिक्षित, संस्कारी आणि दृढसंपन्न करणारी होती. त्यांनी मांडलेला हा शिक्षणविषयक विचार किंवा तत्त्वज्ञानात्मक उपदेशातून शिक्षक आणि शिक्षणाविषयी सांगितलेला दृष्टिकोन अधिक विस्तारता यावा यासाठी या शिक्षक दिनाचे प्रयोजन आहे. ■

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

# महापालिकेत नोकरीस लावतो म्हणून ९५ लाख रुपये घेऊन फसवणूक

## पुण्याच्या व्यक्तीवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ सप्टेंबर-**

पुणे महानगरपालिकेतील विविध पदावर नोकरी लावण्याचे आमिष दाखवून ९५ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी पुणे येथील एकाविरुध्द सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिवानंद बाळासाहेब पाटील (रा. कर्वे नगर, पुणे) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून याबाबत श्रीशैल अमोगसिध्द नाईकवाडे (वय ५०, रा. न्यू कित्तूर चन्नम्मा नगरजवळ, सैफुल, विजापूर रोड) यांनी फिर्याद दिली आहे. हा प्रकार १५ मार्च २०२६ रोजी सकाळी ९.३० ते आजतागायत घडला. नाईकवाडे यांच्या ओळखीचे तारासिंग राठोड यांनी पुणे येथील शिवानंद पाटील यांच्याशी जुना एम्प्लॉयमेंट चौकातील कामत हॉटेल येथे ओळख करून दिली. त्यानंतर पाटील याने नाईकवाडे यांचा विश्वास संपादन करून त्यांना पुणे महानगरपालिकेत उप आरोग्य अधिकारी म्हणून, नाईकवाडे यांच्या पत्नी सुनिता वडेर यांना वैद्यकीय अधिकारी आणि नाईकवाडे यांची भाची कविता पुजारी यांना वरिष्ठ औषध निर्माता वर्ग ३ या पदावर नोकरी लावतो असे आमिष दाखवले. त्यानंतर नाईकवाडे यांना पुणे महानगरपालिकेच्या नावाची बनावट कागदपत्रे देऊन त्यांची ९५ लाखांची फसवणूक केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. सहायक पोलीस निरीक्षक रायगोंडा हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.




**शहर परिसरात अल्पवयीन मुलींच्या विनयभंग प्रकरणी दोन गुन्हे दाखल**

**सोलापूर :** शहर व परिसरात दोन मुलींचा विनयभंग केल्याची घटना घडली आहे. पहिल्या घटनेत शाळकरी मुलीचा विनयभंग करणाऱ्या तरूणाविरुध्द विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पीडित शाळकरी मुलीच्या आईच्या फिर्यादीवरुन सूरज कोळी (वय २८, रा. कृष्णा नगर, सैफुल) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १२ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत सूरज याने त्याच्याकडील मोटारसायकल (एमएच १३ सीपी ३१७१) व कार (एमएच १३ डीएम८३१४) या वाहनावर येऊन पिडीत शाळकरी मुलीला ट्युशन व शाळेला जात असताना तिचा पाठलाग करून तिचा हात हातात घेऊन तसेच कोळी याच्या मोबाइलमधील अश्लील व्हीडिओ दाखवून शरीरसुखाची मागणी करून तिचा विनयभंग केला. मी तुला मारून टाकेन नाही तर तुझा सुंदर चेहरा खराब करून टाकेन अशी धमकी देऊन पीडितेचे चोरून फोटो व व्हिडिओ मोबाइलमध्ये काढून ते व्हायरल करण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस उपनिरीक्षक पवार हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

दुसऱ्या घटनेत एका अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या स्वप्नील सुरेश माने (रा. गिरीजा मंगल कार्यालयामागे, सोलापूर) याच्याविरुध्द विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २ सप्टेंबर रोजी सायंकाळी स्वप्नील याने पीडितेला समर्थ नगरातील एका पडक्या खोलीमध्ये नेऊन ती आरडाओरड करीत असताना तिचें तोंड दाबून तिचा विनयभंग केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार शेख हे करीत आहेत.

## महत्वाचे...



## विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी पुस्तक प्रदर्शन

**सोलापूर, दि. ४ सप्टेंबर-**

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, ग्रंथालयात उपलब्ध तसेच नव्याने समाविष्ट झालेल्या पुस्तकांची माहिती करून देणे आणि विद्यार्थ्यांना दर्जेदार साहित्य व विविध विषयांवरील ग्रंथांशी जोडणे हा या प्रदर्शनाचा प्रमुख उद्देश असल्याचे, तेलगू भाषा अभिवृद्धी सार्वजनिक ग्रंथालयाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन कमटम यांनी सांगितले. हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स येथील ग्रंथालय विभाग आणि तेलगू भाषा अभिवृद्धी सार्वजनिक ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने सामंजस्य कराराच्या अंतर्गत दोन दिवसीय पुस्तक प्रदर्शनाचे आयोजनप्रसंगी ते बोलत होते. प्रदर्शनात साहित्य, कला, संस्कृती, इतिहास, व्यक्तिमत्त्व विकास, स्पर्धा परीक्षा, शैक्षणिक संदर्भग्रंथ तसेच सामान्य वाचनासाठीची विविध पुस्तके मांडण्यात आली. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सत्यजित शहा, एम.बी.ए. विभागप्रमुख डॉ. प्रितम कोठारी, सी.ए. डॉ. सुनील इंगळे, डॉ. शिवकुमार बिरादार, डॉ. नवराज काळदाते, डॉ. श्रीनिवास जगताप आणि ग्रंथपाल डॉ. संदीप लोखंडे उपस्थित होते. तेलगू भाषा अभिवृद्धी सार्वजनिक ग्रंथालयाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन कमटम, उपाध्यक्ष बलराजू बोल्ली, सदस्य तिपान्ना गणेरी आणि ग्रंथपाल विजयालक्ष्मी गुडूर यांची विशेष उपस्थिती लाभली. पुस्तक प्रदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ''का वाचावे?'' आणि ''काय वाचावे?'' याची जाणीव करून देण्यात आली. पुस्तके ही ज्ञानवृद्धी, चिकित्सक विचारसरणी आणि व्यक्तिमत्त्व विकासाची प्रभावी साधने आहेत, हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला.

## भारत विकास परिषद व डॉ. हेडगेवार रक्तपेढीच्या आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**सोलापूर, दि. ४ सप्टेंबर-**

ॲनिमिया मुक्त भारत व थैलीसीमिया मुक्त भारत या दोन्ही अभियानाच्या अंतर्गत भारत विकास परिषद व डॉ. हेडगेवार रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने हिराचंद नेमंचद वाणिज्य महाविद्यालयात व हिमोग्लोबिन तपासणी शिबिरास उत्फूर्त प्रतिसाद मिळाला.



याचे उद्घाटन प्राचार्य डॉ. सत्यजित शहा यांचे हस्ते, डॉ. सारडा, भारत विकास परिषदेचेचे महादेव न्हावकर, लक्ष्मीकांत कुरा, हेडगेवार रक्तपेढीचे मिलिंद फडके, डॉ. गायत्रीताई देशपांडे आदी उपस्थित होते. यावेळी ५००पेक्षा जास्त विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणी केली. याप्रसंगी भारत विकास परिषदेचे रघुनाथ शिरसागर, किशोरी भट, आप्पासाहेब बेलूरे आदी उपस्थित होते.

## माजी नगरसेवक वाधवाणी यांच्यावर कोयत्याने खुनी हल्ला

**सोलापूर, दि. ४ सप्टेंबर-**

माजी नगरसेवक तथा सिंधी समाजाचे माजी अध्यक्ष लालचंद नामोमल वादवाणी(रा-लक्ष्मी विष्णु सोसायटी प्लॉट नन ४८ कुमठा नाका सोलापूर) यांच्यावर कोयत्याने जीवघेणा हल्ला करून त्यांना जखमी केल्याप्रकरणी सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकाश किसनदास आडवाणी (वय ६५, रा. सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. ३ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ५.४० वाजता गुरुनानक चौक, सोलापूर येथे ही घटना घडली. फिर्यादी लालचंद वाधवाणी हे गुरुनानक मंगल कार्यालयाबाहेर उभे असताना आरोपी प्रकाश आडवाणी याने त्यांना, ''तू माझे संसाराचे वाटोळे केले, तुला मी जिवंत सोडणार नाही,'' असे म्हणत जीवे ठार मारण्याची धमकी देत त्यांच्यावर कोयत्याने हल्ला केला.

उजव्या पायाच्या गुडघ्याच्या खाली नडगीवर तसेच डाव्या पायाच्या वाटीवर आणि नडगीवर लोखंडी कोयत्याने वार त्यांना जखमी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक राजगुरू हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.


**जाहीर प्रसिध्दीकरण**

दि. कि. अर्ज ५७ /२०२६
नि.५

### बार्शी येथील मे.सि.ज.ज्यु.डि. साहेब यांचे कोर्टात

१) **राजकुमार प्रमोद बुरगुटे,**
वय ३२ वर्षे, धंदा - शेती.
रा. मु.पो. ऊपळे (दुमाला) ता. बार्शी, जि. सोलापूर.

२) **विजया प्रमोद बुरगुटे**
वय ६६ वर्षे, धंदा -
रा. मु.पो. ऊपळे (दुमाला) ता. बार्शी. जि. सोलापूर.

३) **विक्रम प्रमोद बुरगुटे,**
वय ३५ वर्षे, धंदा - शेती,
रा. मु.पो. ऊपळे (दुमाला) ता. बार्शी, जि. सोलापूर.

४) **शिल्पा प्रमोद बुरगुटे,**
वय ३० वर्षे, धंदा -
रा. मु.पो. ऊपळे (दुमाला) ता. बार्शी. जि. सोलापूर.

— **अर्जदार**

विरुध्द

**कोणी नाही** **- सा.वाला**

तमाम जनतेस या जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी यातील रामप्रसाद सिताराम बुरगुटे हे मयत असून त्यांना अर्जदार नं. १ राजकुमार, अर्जदार नं. २ विजया, अर्जदार नं. ३ विक्रम, व अर्जदार नं. ४ शिल्पा हे कायदेशीर वारस आहेत. यातील मयत रामप्रसाद सिताराम बुरगुटे हे दिनांक १३/०८/१९८२ रोजी मयत झालेले आहेत. यातील अर्जदार नं. १ ते ४ यांनी मौजे ऊपळे (दुमाला) ता. बार्शी, जि. सोलापूर येथील उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय यांना मयत रामप्रसाद सिताराम बुरगुटे यांचे यांच्या नावाचे ऐवजी त्यांचे वारस अर्जदार नंबर १ ते ४ यांच्या नावाची नोंद नगर भूमापन क्रमांक ५५७ उताऱ्यावर नोंदविण्यास सांगितली असता उपअधीक्षक भुमि अभिलेख अधिकारी वैराग ता. बार्शी, जि. सोलापूर यांनी यातील अर्जदार नं. १ ते ४ हे मयत रामप्रसाद सिताराम बुरगुटे यांचे वारस असलेबाबत मे. कोर्टाचे वारस प्रमाणपत्र आणणेस सांगितले त्यामुळे यातील अर्जदारांनी त्यांना वारस दाखला मिळणे बद्दल हा अर्ज या मे कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, सदर मयत रामप्रसाद सिताराम बुरगुटे यांना यातील अर्जदार व्यतिरिक्त इतर कोणाचा वारसा हक्क, हितसंबंध असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत वकिलामार्फत अगर स्वतः मे कोर्टात नेमलेल्या तारखेसह दि.१५/१०/२०२६ रोजी अगर त्यापूर्वी हजर होऊन म्हणणे मांडावे सदर मुदतीत कोणाचीही तक्रार न आल्यास यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारसा दाखला देणेत येईल याची नोंद घ्यावी.

हे प्रसिध्दीकरण माझ्या सहीने व मे. कोर्टाचे सही शिक्यानिशी दिले ता. ०२/०९/२०२६.

**सही/-**
**क. लिपीक**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**अधिक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय बार्शी, कनिष्ठ स्तर**
**ता. बार्शी जि. सोलापूर**



### सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि, शंकरनगर - अकलूज

पो. यशवंत नगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर पिन - ४१३११८
फोन नं. (०२१८५) २२२०४८, २२२२४८
फॅक्स नं. (०२१८५) २२२२४९ Email : smsmpssk@gmail.com

**बी हेवी इथेनॉल विक्री टेंडर नोटीस**

आमचे कारखान्याकडील ऊस गळीत हंगाम २०२५-२०२६ मध्ये बी-हेवी मळीपासून उत्पादित झालेले २२.३६ लाख लिटर इथेनॉल विक्रीस उपलब्ध आहे. तरी, इच्छूक खरेदीदाराकडून सिलबंद टेंडर निविदा मागविणेत येत आहेत.

बी-हेवी इथेनॉल खरेदीबाबतचे सिलबंद निविदा कार्यकारी संचालक यांचे नावे शनिवार दि.१२/०९/२०२६ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत समक्ष अथवा पोस्टाद्वारे जमा करावेत. सिलबंद टेंडर निविदा पाकिटावर बी-हेवी इथेनॉल खरेदी कोटेशन असा स्पष्ट उल्लेख करुन त्यावर संपुर्ण पत्त्यासह मोबाईल नंबर देण्यात यावा. टेंडर मंजूर झालेनंतर इथेनॉल खरेदीदार यांनी EMD करीता प्रति लिटर रक्कम रु.१/- प्रमाणे होणारी रक्कम RTGS ने कारखान्याकडे जमा करावी लागेल. सदर सिलबंद निविदा अंतिम करणेकरिता तारीख व वेळ अलहिदा कळविण्यात येईल.

वरील प्रमाणे बी-हेवी इथेनॉल विक्री टेंडर स्विकारणे अथवा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क कारखान्याने राखून ठेवलेला आहे.

**सही/-**
**सुहास रघुनाथ यादव**
**कार्यकारी संचालक**

**सही/-**
**शंकरराव रामचंद्र (आबासाहेब) माने-देशमुख**
**व्हाईस चेअरमन**

**सही/-**
**जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील**
**चेअरमन**



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-Tender Notice**

Digitally signed online bids are invited through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No 7000041409 E-Tender No. EE/400kV/R.S/DN/LBT/E-Tender: 03/2026-27, Particulars:** Work of overhauling & servicing along with required spares for ABB make, 400/220kV level, SF-6 Circuit Breaker at 400kV Lamboti Substation. **Estimated cost:** Rs. 15,00,000**/- E.M.D. (Approx. 1% of est. cost):** Rs. 15,000**/- Tender cost in** Rs. 500/- + GST, **Sale period:** 04.09.2026 to 14.09.2026, **Last Date of Submission:** 14.09.2026 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 15.09.2026 at 12:00 Hrs. (If possible). **Contact person:** Executive Engineer - 8554995014. For further details. **Subsequent call intimations (2nd/3rd calls, if any) will not be re-published in newspapers and will only be available on the e-tender portal: please visit**
**1) https://srmetender.mahatransco.in**
**2) https://mahatransco.in**
**Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-enquiry (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer, 400 kV R.S. Div Lamboti.**



### शिवशक्ती अर्बन को-ऑप. बँक लि., बार्शी

**७२५/१/४४ ब, शिवाजीनगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर**

**२७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

**(फक्त सभासदांसाठी)**

शिवशक्ती अर्बन को-ऑप. बँक लि., बार्शी या बँकेची **२७ वी** वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि. २०/०९/२०२६ रोजी सकाळी ११-०० वाजता** बँकेचे चेअरमन **मा.डॉ. प्रकाश गोविंदराव बुरगुटे** यांचे अध्यक्षतेखाली मराठा मंदिर, छत्रपती कॉलनी, कुर्डुवाडी रोड, बार्शी येथे खालील विषयांच्या विचारार्थ आयोजित करण्यात आली आहे. सदर सर्वसाधारण सभेस आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

**-: सभेपुढील विषय :-**

१) दि. २८/०९/२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) सन २०२५-२६ चा वार्षिक अहवाल स्वीकृत करणे व दि. ३१/०३/२०२६ चे ताळेबंद पत्रक व सन २०२५-२६ चा कालावधीचे नफा-तोटा पत्रक स्वीकृत करणे.
३) मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या वर्ष २०२६-२७ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे. तसेच २०२५-२६ च्या अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे.
४) मा. वैधानिक लेखापरीक्षक यांच्याकडून आलेल्या वर्ष २०२५-२६ या वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालाची नोंद घेणे.
५) बँकेच्या सन २०२४-२५ चे वैधानिक लेखापरीक्षण अहवालावरील दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
६) सन २०२६-२७ मध्ये बाहेरुन उभारावयाच्या निधीची मर्यादा ठरविणे.
७) मा. संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांचेकडील कर्जाची माहिती घेणे.
८) सन २०२६-२७ साठी मा. रिझर्व्ह बँकेच्या मान्यतेने मा. वैधानिक लेखापरीक्षकांची मा. संचालक मंडळाने नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकास मान्यता देणे.
९) सन २०२६-२७ साठी मा. अंतर्गत लेखापरीक्षण तसेच आयकर लेखापरीक्षणासाठी मा. संचालक मंडळाने नियुक्त केलेल्या लेखापरीक्षास मान्यता देणे.
१०) महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार एकरकमी कर्ज परतफेड योजनेअंतर्गत पात्र कर्जामध्ये दिलेल्या सुटीस मान्यता देणे.
११) बँकेमार्फत सभासद, संचालक व कर्मचारी यांचे शिक्षण व प्रशिक्षणाची नोंद घेणे तसेच सदर वार्षिक सर्वसाधारण सभेतील अनुपस्थित सभासदांची रजा क्षमापित करणे.
१२) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरुन
**श्री. भारत श्रीरंग उमाटे,**
**सरव्यवस्थापक**

स्थळ :- बार्शी
दिनांक :- ०५/०९/२०२६

✻ **सूचना :-** गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास सदर सभा नियोजित ठिकाणी नियोजित वेळेनंतर अर्ध्या तासाने सुरु होईल व त्यासाठी गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.

✻ **सभासदांना सूचना :-** १) ज्या सभासदांनी वारसाची नोंद केली नसेल त्यांनी फॉर्म भरुन नोंद करुन घ्यावी व सर्व खात्यांची केवायसी पूर्तता करावी. २) सभासदांनी त्यांचे पत्त्यात बदल झाला असल्यास नवीन पत्ता तसेच आपला मोबाईल क्रमांक बँकेच्या मुख्य कार्यालयाकडे लेखी स्वरुपात कळवावा. ३) सभासदांनी बँकेच्या कामकाजाविषयी सभेत प्रश्न वा सूचना मांडावयाच्या असतील त्यांनी दि. १६/०९/२०२६ पूर्वी कार्यालयीन वेळेत बँकेचे सरव्यवस्थापक, मुख्य कार्यालय यांचेकडे लेखी द्याव्यात. ४) पोटनियमानुसार अपूर्ण भागधारण असणाऱ्या सभासदांनी जादा भाग खरेदी करुन नियमानुसार किमान भागधारण पूर्ण करावी. ५) बँकेची आर्थिक पत्रके व वार्षिक अहवाल नजीकच्या शाखेच्या मा. शाखा व्यवस्थापक यांचेकडे सभासदांना अवलोकनार्थ उपलब्ध आहे.



### सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि, शंकरनगर - अकलूज

पो. यशवंत नगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर पिन - ४१३११८
फोन नं. (०२१८५) २२२०४८, २२२२४८ फॅक्स नं. (०२१८५) २२२२४९ Email : smsmpssk@gmail.com

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना कार्यकारी संचालक यांचेकडून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि., शंकरनगर - अकलूज या संस्थेचे खालील उत्पादक सभासद दुर्दैवाने मयत झाल्याचे समजते.

| अ.नं. | सभासदाचे नाव | गांव | मयत झाल्याची अंदाजे तारीख |
|---|---|---|---|
| १ | कै. फुले पांडुरंगराव गणुजी | चौंडेश्वरवाडी | १६/०२/२०२५ |
| २ | कै. जाधव अर्जुन देवबा | आनंद नगर | ०८/०८/२०२२ |
| ३ | कै. फडतरे पोपट भानुदास | माळी नगर | १९/१०/२०२५ |
| ४ | कै. पाटोळे गोरख दत्तु | वाघोली | २१/०६/२०२५ |
| ५ | कै. रेडे भगवान हणमंत | महाळुंग | १७/०४/२०१९ |
| ६ | कै. गुंड भिमराव बलभिम | मिरे | २७/११/२०२१ |
| ७ | कै. माने नामदेव शंकर | वेळापूर | ०७/०२/२००६ |
| ८ | कै. माने धोंडुबाई कृष्णाजी | खळवे | २७/१२/२०२३ |
| ९ | कै. तोरणे भानुदास चंदर | म. निमगांव | ३१/१०/२०१५ |
| १० | कै. मगर दादासाहेब नामदेव | म. निमगांव | ०३/०५/२०२४ |
| ११ | कै. जाधव महादेव कृष्णाजी | दत्त नगर | ०२/०८/२००९ |
| १२ | कै. भाकरे महादेव नामदेव | पिसेवाडी | ११/०७/२०२३ |
| १३ | कै. पवार बाळू रामा | पिसेवाडी | २९/१०/२०२५ |
| १४ | कै. धनवडे सुखदेव नारायण | शेंडेचिंच | ०९/०७/२०२५ |
| १५ | कै. आवताडे पंढरीनाथ माधव | फळवणी | १२/११/२०२२ |
| १६ | कै. सदेवाले गोरख नारायण | पिलीव | ०३/१२/२०१६ |
| १७ | कै. क्षिरसागर मारुती जगन्नाथ | गिरवी | ३०/१०/२०२५ |
| १८ | कै. शेख सत्तार लतीब | लुमेवाडी | ०४/०१/२०१६ |
| १९ | कै. वाघमोडे मच्छिंद्र भिमराव | काटी | २३/०३/२०१३ |
| २० | कै. खटके गणपत लक्ष्मण | भोडणी | ०३/०८/२०२१ |

महाराष्ट्र को. ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट कलम ३० रुल २५ (३)(१) च्या तरतुदी प्रमाणे या जाहीर नोटीसीने सर्व संबंधीत वारसांना अगर मयताचे कायदेशिर हक्क सांगणाऱ्या इसमांना कळविण्यात येते की, मयत उत्पादक सभासदांचे शेअर्स, ठेवी, डिबेंचर्स वगैरे रक्कम मयताचे नावे आहेत. सबब ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांचे आत ज्या कोणा हित संबंधीतांना उपर निर्दीष्ट मयतास वारस आहोत असे कारखान्यास पटवून मयतांचे शेअर्स, ठेवी, डिबेंचर्स वर्ग करुन घेण्याचे असतील त्यांनी कायदेशीर वारस हक्क प्रस्थापित करण्यासाठी असणारे सर्व कागदपत्रे व पुरावे कारखान्याच्या रजिस्टर्ड ऑफीसमध्ये कामाच्या वेळेत सादर करावेत व पश्चात वारसाची शाबीदी करावी, दिलेल्या मुदतीनंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व ते कारखान्यावर बंधनकारक राहणार नाहीत.

ही जाहीर नोटीस दिली असे.
**दिनांक ०५/०९/२०२६**

**सही/-**
**सुहास रघुनाथ यादव**
**कार्यकारी संचालक**



### दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि.

**रजि. ऑफिस : माळीनगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर, पिन : ४१३१०८**
**CIN-U15424PN1932PLC001904**

याद्वारे नोटीस देण्यात येते की, भागधारकांची असाधारण सभा व्हीडीओ कॉन्फरन्सिंग (VC)/ अदर ओडीओ व्हीज्युअल मिन्स (OAVM) द्वारे सभासदांच्या सोयीसाठी सौभाग्य कार्यालय, माळीनगर येथे रविवार दि. २० सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता दि. १४/०८/२०२६ च्या नोटीसीत नमूद केलेल्या काम काजासाठी घेण्यात येत आहे. सदरची सभा बोलाविल्याबाबतची नोटीस भागधारकांना पाठविण्यात आली आहे. सदरची नोटीस कंपनीच्या www.saswadmalisugar.in या वेबसाईट वर उपलब्ध आहे.

कंपनी कायदा २०१३ च्या कलम ९१ अन्वये भागधारकांचे रजिस्टर व शेअर ट्रान्स्फर बुक दि. १३ सप्टेंबर २०२६ पासून ते दि. २० सप्टेंबर २०२६ अखेर (दोन्ही दिवस धरून) बंद राहील.

कंपनी कायदा २०१३ च्या कलम १०८ व कंपनीज (मॅनेजमेंट व ॲडमिनिस्ट्रेशन) नियम २०१४ च्या नियम २० नुसार कंपनीने नोटीसीतील विषयांसाठी रिमोट ई-मतदानाची व ई-मतदानाची सुविधा सेंट्रल डिपॉझीटरी सव्हीसेस लि. (CDSL) यांचेमार्फत उपलब्ध करून दिली आहे. मा. संचालक मंडळाने दि. १२ सप्टेंबर २०२६ ही रेकॉर्ड डेट ठरविली असून जे भागधारक या दिवशी शेअर्स धारण करीत असतील त्यांना ते धारण करीत असलेल्या शेअर्सच्या प्रमाणात मतदान करता येईल.

**कंपनी कायदा २०१३ व त्यामधील रूल्स अन्वये पुढीलप्रमाणे माहिती देत आहोत.**

१. रिमोट ई-व्होटींग सुरू होण्याची तारीख व वेळ : गुरुवार दि. १७ सप्टेंबर २०२६ सकाळी ९ वाजलेपासून
२. रिमोट ई-व्होटींग बंद होण्याची तारीख व वेळ : शनिवार दि. १९ सप्टेंबर २०२६ सायंकाळी ५ वाजता.
३. दि.१९ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५ नंतर रिमोट ई-व्होटींगची सुविधा बंद होईल.
४. ज्या भागधारकांनी सभा सुरू होण्यापूर्वी मतदान केले असेल अशा भागधारकांना मिटींगचे दिवशी मतदान करता येणार नाही.
५. ज्या भागधारकांनी रिमोट ई-व्होटींग केले आहे अशा भागधारकांना VC/OAVM ने सभेस हजर राहता येईल परंतु त्यांना पुन्हा ई-व्होटींगने मतदान करता येणार नाही.
६. रिमोट ई-व्होटींग व ई-व्होटींगबाबतच्या व व्हीडीओ कॉन्फरन्सिंग (VC) व अदर ऑडीओ व्हीज्युअल मिन्स (OVM) च्या सुचना सभेच्या नोटीसीसोबत दिलेल्या आहेत.

**माळीनगर**
**ता. ०३/०९/२०२६**

**सही/-**
**दि. सासवड माळी शुगर फॅक्टरी लि. करिता**
**मोहन रा. लांडे**
**चेअरमन**



### IDFC FIRST Bank Limited

**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)**
**CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत नोटीस**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडून खाली नमूद केलेले तारण कर्ज घेतले होते. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या तारणावर (गहाणखत) सुरक्षित करण्यात आली आहेत. ते संबंधित कर्ज करारांच्या अटी व शर्तींचे पालन करण्यास अपयशी ठरल्यामुळे आणि त्यांच्या खात्यातील व्यवहार अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज खाते 'एनपीए' (अनुत्पादक मालमत्ता) म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. त्यांच्याकडून **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते) देय असलेली रक्कम खालील तक्त्यामध्ये सविस्तरपणे नमूद केलेल्या संबंधित नोटीसनुसार दिली आहे, आणि सदर रकमेवर पुढील व्याज देखील लागू होईल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून कंत्राटी दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिस नुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 143558936 | मालमत्तेवर कर्ज | १. सनी सुरेश भोसले<br>२. प्रियंका सनी भोसले | 06-May-2026 | INR 7,89,286.86/- |

**मालमत्तेचा पत्ता :** निवासी घराचा सर्व तुकडा आणि भाग, मालमत्ता क्रमांक १६५, क्षेत्रफळ ९६० चौ.फूट (३०X३२), मौजे शिंदेवाडी, तालुका माळशिरस, जिल्हा सोलापूर, महाराष्ट्र., आणि सदर मालमत्तेची चतुःसिमा :- पूर्व : रामभाऊ एकनाथ सपकाळ, पश्चिम : राजेंद्र मल्हारी शिंदे, उत्तर : रस्ता, दक्षिण : सुखदेव एकनाथ झेंडे

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिस नुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 145427819 | मालमत्तेवर कर्ज | १. रोहिणी मनोजकुमार सुळ<br>२. मनोजकुमार मधुकर सुळ | 10-Jun-2026 | INR 9,52,246.43/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मालमत्ता क्रमांक ७६९ मधील निवासी घराचा सर्व तुकडा आणि भाग, ज्याचे क्षेत्रफळ १४०० चौ.फूट (४०X३५) व बाखळ जमीन क्षेत्रफळ २२२० चौ. फूट, एकूण क्षेत्रफळ ३६२० चौ.फूट, मौजे : मोरची, तालुका : माळशिरस, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र-४१३१०९ (सध्या श्री. मनोजकुमार मधुकर सुळ यांच्या मालकीची मालमत्ता) आणि खालीलप्रमाणे चतुःसिमा : पूर्व - सुभाष सुळ, पश्चिम - पार्वती सुळ, उत्तर - मोकळी जमीन, दक्षिण - रस्ता

याद्वारे तुम्हाला आवाहन करण्यात येते की, वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या तपशिलानुसार, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या ती **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) त्यांच्या संबंधित तारखांपासून करारातील व्याजदरासह आणि इतर खर्च, शुल्क इत्यादी रकमा या प्रकाशनाच्या (जाहिरातीच्या) तारखेपासून ६० दिवसांच्या आत अदा कराव्यात. तसे न केल्यास, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडची** देय रक्कम वसूल करण्यासाठी, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध सरफेसी कायद्याच्या कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत कायदेशीर कारवाई सुरू करणे स्वाक्षरीकर्त्यास भाग पडेल. याशिवाय, सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत तुम्हाला उपरोक्त सुरक्षित मालमत्ता विक्री, भाडेपट्टा (लीज) किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरित करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

दिनांक : **05/09/2026**
स्थळ : **सोलापूर, महाराष्ट्र**

**स्वाक्षरी/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, ज्याचे आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीनीकरण झाले असून सध्या ते आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाते)**

## महत्त्वाचे

### राष्ट्रीय योगसन महासंघ स्थापनेसाठी अर्ज पाठवा

**नवी दिल्ली :** दिल्ली उच्च न्यायालयाने 'योगासन भारत'ला दिलेली मान्यता रद्द केल्यानंतर, क्रीडा मंत्रालयाने योगसनासाठी नवीन राष्ट्रीय महासंघाच्या (एनएसएफ) स्थापनेसाठी अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. यासाठी पात्र संस्थांना १७ सप्टेंबर ही अंतिम मुदत देण्यात आली आहे. 'योगसन भारत'ची मान्यता रद्द करतानाच, दिल्ली उच्च न्यायालयाने मंत्रालयाला संलग्नता देण्याची नवीन प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देशही दिले होते. उच्च न्यायालयाच्या ९ जुलै २०२६ रोजीच्या निर्णयाचे पालन करीत, मंत्रालय योगसन या खेळासाठी राष्ट्रीय क्रीडा महासंघ म्हणून मान्यता मिळण्याच्या विचारासाठी पात्र संस्थांकडून अर्ज मागवित आहे. सर्व पात्र संस्थांना विनंती करण्यात येते की त्यांनी सोबत जोडलेल्या नमुन्यात अर्ज व आवश्यक कागदपत्रे मंत्रालयाकडे सादर करावीत. अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख १७ सप्टेंबर २०२६ (संध्याकाळी ५:३० वाजेपर्यंत) आहे, असेही त्यात नमूद केले आहे. या अर्जाच्या नमुन्यात ३० प्रश्न आहेत.

### मुंबई क्रिकेटवर वेब सीरिजची निर्मिती सुरू

**मुंबई :** मुंबई क्रिकेट संघाच्या संपूर्ण हंगामाचे चित्रण करणारी वेब सीरिज तयार करण्याबाबत काम सुरू असल्याचे एमसीएचे अध्यक्ष अजिंक्य नाईक यांनी शुक्रवारी सांगितले. मुंबईला क्रिकेटचा समृद्ध इतिहास लाभला आहे. पॅट्रिक ग्रॅहम यांच्या दिग्दर्शनाखाली तयार होणाऱ्या या माहितीपटातून वरिष्ठ संघाची संस्कृती मोठ्या पडद्यावर दिसणार असून त्यामुळे तरुणांना प्रेरणा मिळेल, असे नाईक म्हणाले. आम्हाला मुंबईच्या वरिष्ठ संघाच्या संपूर्ण हंगामाचे चित्रण करायचे असल्याने आम्ही बीसीसीआयकडून काही परवानग्या मागितल्या आहेत. याचे स्वरूप वेब सीरिजचे असेल की माहितीपटाचे, हे काम पुढे सरकल्यावर ठरविले जाईल; परंतु संपूर्ण हंगामात मुंबई संघाच्या पडद्यामागील घडामोडींची एक वेगळी झलक चाहत्यांना दाखविणे हा यामागचा उद्देश आहे, असे नाईक यांनी सांगितले.

# भारत विजयाचा प्रबळ दावेदार

### आशिया चषक महिला टी-२० क्रिकेट



फातिमा सना व हरमनप्रीत कौर

**भारत विरुद्ध पाकिस्तान**
**स्थळ :** दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, दुबई
**वेळ :** सायंकाळी ८.०० वाजतापासून
**थेट प्रसारण :** सोनी स्पोर्ट्सवर

**दुबई, ४ सप्टेंबर**

महिला आशिया चषक महिला टी-२० क्रिकेट स्पर्धेत उपांत्य फेरीत स्थान निश्चित केल्यानंतर हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय महिला संघ शनिवारी आपल्या अखेरच्या साखळी फेरीच्या सामन्यात पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानविरुद्ध खेळणार आहे. या सामन्यात अधिक सरस असलेल्या भारतीय संघाकडून आक्रमक खेळाची अपेक्षा असून भारतच विजयाचा प्रबळ दावेदार मानला जात आहे.

पुरुष असो वा महिला, बहु-संघीय स्पर्धांमध्ये भारत-पाकिस्तान यांच्यातील नियमित सामन्यांनी गत काही काळापासून मैदानाबाहेरील चर्चा व उत्साहाच्या तुलनेत मैदानावर मात्र फारशी प्रभावी कामगिरी केलेली नाही.

दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर जेव्हा हे दोन संघ आमने-सामने येतील, तेव्हाही चित्र वेगळे असण्याची शक्यता नाही; कारण विजेतेपदासाठी प्रबळ दावेदार असलेल्या भारतीय संघाकडून पाकिस्तानचा सहज पराभव केला जाण्याची शक्यता आहे.

आशियाई स्तरावर भारताच्या तोडीस तोड असा कोणताही संघ नाही. मागील स्पर्धेत भारतीय संघ श्रीलंकेकडून पराभूत होऊन उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. दुसरीकडे, पाकिस्तानने थायलंडविरुद्धचा आपला पहिला सामना जिंकला असून ते उपांत्य फेरीच्या शर्यतीत कायम आहेत.

सामन्यापूर्वी, भारताच्या दोन्ही सलामीवीर - स्मृती मंधाना व शेफाली वर्मा उत्कृष्ट लयीत असल्याचे दिसून आले. मंधानाने हाँगकाँगविरुद्धच्या सामन्यात अविस्मरणीय शतक झळकावताना अनेक विक्रम मोडीत काढले आणि स्पर्धेतील इतर संघांना धोक्याचा इशारा दिला. येथील खेळपट्ट्या फलंदाजीसाठी फारशा सोप्या राहिलेल्या नाहीत. खेळपट्टीचा वेग आणि वर्तन समजून घेण्यासाठी फलंदाज सहसा सुरुवातीचे १० चेंडू घेतात आणि त्यानुसार आपला डावाची आखणी करतात. गुरुवारी रात्री मंधाना व शेफालीने नेमके हेच केले. प्रतिका रावल, ऋचा घोष व कर्णधार हरमनप्रीत कौर यांसारख्या खेळाडूंना मैदानावर अधिक वेळ घालविण्याची इच्छा असेल, कारण त्यांना मिळालेल्या चांगल्या सुरुवातीचे मोठ्या खेळीत रूपांतर करता आलेले नाही.

तिसऱ्या क्रमांकावर खेळणाऱ्या नवीन खेळाडू प्रतिका रावलवर दबाव वाढत आहे. वन-डेमध्ये भरपूर यश मिळवूनही तिला टी-२० खेळाच्या गरजांनुसार कामगिरी करता आलेली नाही.

वेगवान गोलंदाजीच्या फळीत नंदनी शर्माचा समावेश करणे हे योग्य दिसेल ने टाकलेले पाऊल आहे. प्रमुख गोलंदाज क्रांती गौडसोबत गोलंदाजीची सुरुवात करताना ती आपल्या क्षमतेनुसार चांगली कामगिरी करीत आहे.

दुसरीकडे, भारताशी स्पर्धा करण्यासाठी पाकिस्तानला त्यांच्या फलंदाजीमध्ये आमूलाग्र सुधारणा करण्याची गरज आहे. फलंदाजीतील त्रुटींमुळे गत काही वर्षांपासून संघाला निराशाजनक कामगिरीचा सामना करावा लागला आहे. थायलंडविरुद्धच्या गत सामन्यातही, पॉवरप्लेमध्ये तीन बळी गमावल्यामुळे पाकिस्तानचा संघ दबावाखाली आला होता. तरीही, तुलनेने कमकुवत असलेल्या संघाविरुद्ध ११९ धावांचे माफक आव्हान त्यांनी यशस्वीपणे बचावले.

हा संघ सलामीवीर मुनीबा अली व अष्टपैलू फातिमा सनावर अति-अवलंबून आहे. फातिमा ही संघाची कर्णधारही आहे. बलाढ्य प्रतिस्पर्ध्यांना आव्हान द्यायचे असेल, तर ही परिस्थिती बदलणे आवश्यक आहे.

**प्रतिस्पर्धी संघ**

**भारत :** हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मंधाना (उपकर्णधार), शेफाली वर्मा, भारती फुलमाळी, दीप्ती शर्मा, रिचा घोष (यष्टिरक्षक), जी. कमलिनी (यष्टिरक्षक), अरुंधती रेड्डी, प्रेमा रावत, राधा यादव, श्री चरणी, रेणुका ठाकूर, नंदिनी शर्मा, क्रांती गौड, प्रतिका रावल.

**पाकिस्तान :** फातिमा सना (कर्णधार), आयशा जफर, एमान नसीर, एमान फातिमा, गुल फिरोझा, मोमिना रियासत, मुनीबा अली सिद्दीकी (यष्टिरक्षक), सदाफ शमास, नशरा संधू, सादिया इक्बाल, सायरा जबीन, सवाल झुल्फिकार, तुबा हसन, उम्म-ए-हानी, वाहिदा अख्तर. (वृत्तसंस्था)

# सात्त्विक-चिराग उपांत्य फेरीत

### चायना मास्टर्स बॅडमिंटन





**शेन्झेन (चीन), ४ सप्टेंबर**

येथे सुरू असलेल्या 'बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर सुपर ७५०' दर्जाच्या 'चायना मास्टर्स' बॅडमिंटन स्पर्धेत सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी-चिराग शेट्टी या भारतीय पुरुष दुहेरी जोडीने डेन्मार्कच्या किम ॲस्ट्रप आणि अँडर्स स्कारुप रासमुसेन या जोडीचा ७० मिनिटांत २१-१३, १६-२१, २१-१८ असा पराभव केला. या विजयासह त्यांनी स्पर्धेच्या उपांत्य फेरीत सलग चौथ्यांदा धडक मारली. चौथे मानांकन असलेल्या या भारतीय जोडीचा पुढील सामना मलेशियाच्या नूर अझरिन आणि टॅन वी कीऑंग किंवा इंडोनेशियाची सहावी मानांकित जोडी असलेल्या साबर कार्यमान गुतामा आणि मोह इस्फहानी यांच्याशी होईल.

या महिन्यात 'सिंगापूर ओपन' जिंकल्यानंतर सात्त्विक आणि चिराग पहिल्यांदाच एखाद्या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत पोहोचले आहेत.

गेल्या महिन्यात नवी दिल्लीत झालेल्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेच्या (वर्ल्ड चॅम्पियनशिप्स) उपांत्यपूर्व फेरीत पराभूत झाल्यापासून ते स्पर्धेपासून दूर होते. (वृत्तसंस्था)

# श्रीकांतचे आव्हान संपुष्टात



चायना मास्टर्स सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेत शुक्रवारी किदाम्बी श्रीकांतचे आव्हान उपांत्यपूर्व फेरीत संपुष्टात आले. माजी प्रथम विश्वमानांकित श्रीकांतला हाँगकाँगच्या ली चेऊक यिऊकडून सरळ गेम्समध्ये पराभव पत्करावा लागला.

या वर्षाच्या सुरुवातीला 'यूएस ओपन सुपर ३००' स्पर्धेत उपविजेतेपद पटकावताना आपल्या जुन्या लयीची झलक दाखवणाऱ्या ३३ वर्षीय श्रीकांतला २५ व्या क्रमांकावरील ली चेऊकने ३९ मिनिटांच्या लढतीत १६-२१, १६-२१ असे पराभूत केले.

याआधीच्या अंतिम सोळाच्या फेरीत श्रीकांतने उत्कृष्ट खेळ करीत कॅनडाच्या व नवव्या विश्वमानांकित व्हिक्टर लाईचा २१-१८, २१-१९ असा पराभव केला होता. मात्र, ली चेऊकविरुद्धच्या सामन्यात श्रीकांतला बराच काळ पिछाडीवरून खेळावे लागले; विशेषतः पहिल्या गेमच्या मध्यात त्याने सामन्यावरील पकड गमावल्यानंतर त्याला संघर्ष करावा लागला. श्रीकांतने वेगवान सुरुवात करत ३-० अशी आघाडी घेतली होती, पण ली चेऊकनेही लवकरच आपला लय (रिदम) पकडला. हाँगकाँगच्या या बॅडमिंटनपटूने सलग तीन गुण मिळवून ३-३ अशी बरोबरी साधली व त्यानंतर सलग सहा गुण घेत १४-६ अशी मोठी आघाडी घेतली. श्रीकांतने सामन्यात परतण्याचा प्रयत्न केला, पण गुणांमधील तफावत खूप मोठी होती. ली चेऊकने संयम राखत पहिला गेम आपल्या नावे केला.

## बार्शीच्या विश्वेश देशपांडेची महाराष्ट्राच्या ज्युनियर फुटबॉल संघात निवड

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ४ सप्टेंबर**



डॉ. बी. सी. रॉय ट्रॉफी (टियर-१) ज्युनियर बॉईज नॅशनल फुटबॉल चॅम्पियनशिपसाठी महाराष्ट्र राज्य (विफा) ज्युनियर बॉईज फुटबॉल संघात बार्शीच्या विश्वेश गणेश देशपांडे याची निवड झाली आहे. विशेष म्हणजे, महाराष्ट्रातून निवड झालेल्या १८ खेळाडूंमध्ये सोलापूर जिल्ह्यातून विश्वेश हा एकमेव खेळाडू ठरला आहे. पश्चिम भारत फुटबॉल संघटनेतर्फे महाराष्ट्राच्या ज्युनियर बॉईज संघाच्या (विफा) तयारीसाठी १३ ऑगस्टपासून मुंबईत झालेल्या निवड चाचणीतून त्याची महाराष्ट्राच्या अंतिम संघात निवड झाली आहे. महाराष्ट्राचा संघ बंगळूर येथे सुरु असलेल्या डॉ. बी. सी. रॉय ट्रॉफी (टियर-१) राष्ट्रीय ज्युनियर बॉईज फुटबॉल चॅम्पियनशिप मध्ये सहभागी झाला आहे. विश्वेश सध्या संजीवन स्कूल, पन्हाळा येथे इयत्ता दहावीत शिक्षण घेत आहे. त्याला संचालक सौरभ भोसले तसेच प्रशिक्षक अमित साळोखे यांचे मार्गदर्शन लाभले.

# एमआयटी-एडीटीचा तेजस पाटील भारतीय आशियाई तलवारबाजी संघात

**पुणे, दि. ४ सप्टेंबर-**



जपानमध्ये होणाऱ्या आगामी आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय तलवारबाजी (फेन्सिंग) संघाची घोषणा करण्यात आली असून, यामध्ये पुण्याच्या एमआयटी आर्ट, डिझाईन आणि तंत्रज्ञान (एमआयटी-एडीटी) विद्यापीठाचा विद्यार्थी तेजस मनोज पाटील याने भारतीय पुरुषांच्या फॉइल संघात आपले स्थान पक्के केले आहे.

भारतीय तलवारबाजी संघटनेच्या निवड समितीने नुकतीच या पथकाची अधिकृत घोषणा केली. राष्ट्रीय मानांकन तसेच आशियाई वरिष्ठ तलवारबाजी चॅम्पियनशिप, जागतिक चॅम्पियनशिप आणि राष्ट्रकुल तलवारबाजी चॅम्पियनशिपमधील उत्कृष्ट कामगिरीच्या आधारे खेळाडूंची अंतिम निवड करण्यात आली आहे.निवड झालेले सर्व खेळाडू पटियाला येथे १५ सप्टेंबरपर्यंत चालणाऱ्या राष्ट्रीय तयारी शिबिरामध्ये सहभागी होतील. त्यानंतर १६ सप्टेंबर रोजी स्पर्धापूर्व वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी संपूर्ण भारतीय संघ थेट जपानमधील आयची-नागोया येथे रवाना होणार आहे.

एमआयटी-एडीटी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ कॉम्प्युटिंगचा (एसओसी) विद्यार्थी असलेल्या तेजस पाटील याने आपल्या सातत्यपूर्ण कामगिरी, मेहनत आणि उत्कृष्ट कौशल्याच्या जोरावर यापूर्वी चीनमधील शांघाय येथे झालेल्या प्रतिष्ठित 'फॉइल ग्रँड प्रिक्स' आणि नायजेरियातील लागोस येथे झालेल्या राष्ट्रकुल तलवारबाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या 'फॉइल' संघात स्थान मिळवले होते. या स्पर्धांमध्ये त्याने दोन रौप्य व एक कांस्य पदक पटकावले होते. आता पुन्हा एकदा आशियाई फेन्सिंग स्पर्धेत पुरुषांच्या फॉइल प्रकारात तो भारताचे प्रतिनिधित्व करणार असल्याने विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

तेजसच्या या आंतरराष्ट्रीय स्तरावरील निवडीबद्दल एमआयटी-एडीटी विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड, कार्यकारी संचालक डॉ. सुनिता कराड, कुलगुरू डॉ. राजेश एस. आणि क्रीडा विभाग संचालक प्रा. पद्माकर फड आदींनी अभिनंदन केले.

### आशियाई स्पर्धेसाठी नेमबाजांचे सराव शिबिर

**नवी दिल्ली :** जपानमधील आइची-नागोया येथे १९ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेत सर्वोत्तम कामगिरी करण्यासाठी, आशियाई स्पर्धेसाठी पात्र ठरलेले भारतीय नेमबाज या महिन्यात दिल्ली आणि भोपाळ येथील केंद्रांवर सराव शिबिरांमध्ये सहभागी होणार आहेत. ही शिबिरे भोपाळमधील 'एमपी स्टेट शूटिंग अकादमी' आणि राजधानीतील 'करणी सिंग रेंज' अशा दोन ठिकाणी विभागण्यात आली आहेत. कार्यक्रमानुसार, आशियाई स्पर्धेसाठी निवड झालेले पिस्तूल आणि रायफल नेमबाज ५ ते १४ सप्टेंबर या कालावधीत भोपाळमध्ये सराव करतील.



# ग्रीनस्टार सोलापूर, एस.एन.जी. नागपूर व नागपाडा मुंबई संघांची विजयी सलामी

### गुरूवर्य बापूसाहेब झपके स्मृती निमंत्रित राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ४ सप्टेंबर-**

शिक्षणमहर्षी कै. गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ आयोजित राष्ट्रीय स्तरावरील निमंत्रित पुरुषांच्या बास्केटबॉल स्पर्धेत पहिल्या दिवशी झालेल्या अटीतटीच्या सामन्यांमध्ये ग्रीनस्टार सोलापूर, जयहिंद जिमखाना कडा-बीड, एस.एन.जी. नागपूर आणि नागपाडा मुंबई या संघांनी आपले सामने जिंकत दमदार आगेकूच केली आहे.

येथे सुरू झालेल्या या स्पर्धेत देशातील २४ नामवंत संघांनी सहभाग नोंदवला असून, ही स्पर्धा ६ सप्टेंबरपर्यंत खेळवली जाणार आहे. या स्पर्धेत सहभागी झालेल्या २४ संघांची ते अशा एकूण ८ गटांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. स्पर्धेच्या नियमांनुसार, प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ बाद फेरीत प्रवेश करतील.

**चुरशीच्या लढतीत जयहिंद बीडची बाजी:** जयहिंद जिमखाना कडा-बीड आणि समायरा अकादमी मुंबई यांच्यात अत्यंत अटीतटीचा सामना पाहायला मिळाला. या रोमांचक सामन्यात जयहिंद संघाने ६४-६१ अशा अवघ्या ३ गुणांच्या फरकाने निसटता विजय मिळवला.

**ग्रीनस्टार सोलापूरचा विजय:** ग्रीनस्टार स्पोर्ट्स क्लब सोलापूर संघाने यजमान बापूसाहेब झपके स्पोर्ट्स अकादमी सांगोला संघाचा ६८-४४ असा २४ गुणांच्या फरकाने पराभव करत विजयी सुरुवात केली.

**नागपूर व नांदेड संघांची धडक:** एस.एन.जी. नागपूर संघाने शिवरत्न स्पोर्ट्स अकादमी अकलूज संघाचा ५८-२६ अशा ३२ गुणांच्या मोठ्या फरकाने धुव्वा उडवला. तर, नेक्सस स्पोर्ट्स अकादमी नांदेड संघाने भारती विद्यापीठ पुणे संघावर ५३-३० अशी २३ गुणांनी मात केली.

**पुण्याच्या बी.एस.सी. बी.ई.जी. संघाचे यश:** बी.एस.सी. बी.ई.जी. अँड सेंटर खडकी-पुणे संघाने एस.टी.बी.ए. सांगोला संघावर ६१-३५ अशा २६ गुणांनी विजय मिळवला.

**मुंबईच्या संघांचे वर्चस्व:** हाय-५ युथ फाउंडेशन, मुंबई संघाने श्री. भानू तालीम संस्था मिरज संघाचा ५५-२८ अशा फरकाने पराभव केला. तसेच, नागपाडा मुंबई संघाने प्रिन्स युनायटेड कोल्हापूर संघावर ३५-०६ अशा २९ गुणांच्या फरकाने सहज विजय नोंदवला.

**कोल्हापूरचा एकतर्फी विजय:** डू इट बास्केटबॉल अकादमी कोल्हापूर संघाने प्रा. शरद पाटील महाविद्यालय मिरज संघावर ५१-१७ अशा तब्बल ३४ गुणांच्या मोठ्या फरकाने एकतर्फी विजय मिळवला.

# सांगोल्यात घडत आहेत उद्याचे राष्ट्रीय शिलेदार : युवराज नाईक

**सांगोला, दि. ४ सप्टेंबर-**




जिल्हा क्रीडा अधिकारी म्हणून कार्यरत असताना मी विविध शाळांमध्ये क्रीडाविषयक सुविधा निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. खेळाडूंसाठी करिअरच्या विविध संधी आणि खेळांच्या माध्यमातून कौशल्य विकसित करण्याचे प्रयत्न महाराष्ट्र शासन करत आहे. ऑलिम्पिकमध्ये महाराष्ट्रातील खेळाडू पोहोचवण्याचा शासनाचा मानस असून, विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच क्रीडा क्षेत्रातही प्राविण्य मिळवावे. सांगोल्यासारख्या ग्रामीण भागात १ कोटीपेक्षा अधिक खर्चातून उभारलेल्या इनडोअर स्टेडियमची निर्मिती आणि खेळाडू तयार करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांचे प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहेत.या प्रयत्नांतूनच उद्याचे दर्जेदार राष्ट्रीय खेळाडू घडतील असा विश्वास व्यक्त करत यासाठी शासन स्तरावरून सदैव सहकार्य राहील असे प्रतिपादन पुणे विभागाचे क्रीडा व युवक सेवा उपसंचालक युवराज नाईक यांनी केले.

सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष थोर स्वातंत्र्यसेनानी कै. गुरुवर्य चंद्रशेखर विश्वनाथ तथा बापूसाहेब झपके यांच्या ४५ व्या स्मृती समारोहानिमित्त संस्थेच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या पर्वात आयोजित पुरुषांच्या निमंत्रित राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेचा उद्घाटन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष व सांगोला नगरीचे नगराध्यक्ष आनंदा माने, सोलापूर जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश मोहरे, सांगोला तालुका क्रीडा अधिकारी सचिन रणदिवे, संस्थाध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, राष्ट्रीय पंच एम.शेफी, उद्योगपती देणगीदार विलास क्षीरसागर, सुहास होनराव नागेश तेली, श्रीकांत देशपांडे, संस्था उपाध्यक्ष अँड विजयसिंह चव्हाण, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत,सदस्य चंद्रशेखर अंकलगी, प्राचार्य चारुदत्त जगताप उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थापक अध्यक्ष कै.गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.प्रास्ताविकातून संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांनी बास्केटबॉल स्पर्धेची ऐतिहासिक पार्श्वभूमी विशद केली. ते म्हणाले सलग ४३ वर्षे राज्यस्तरावर होत असलेल्या या स्पर्धेने गेल्या वर्षापासून राष्ट्रीय स्तरावर झेप घेतली आहे. संस्थेच्या अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करत असताना संस्थेच्या विस्ताराबरोबरच गुणवत्तेच्या शिखरावर क्रीडा क्षेत्रात झालेले कार्य उल्लेखनीय आहे. गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या नावाने सुरू झालेल्या बास्केटबॉल अकादमीच्या माध्यमातून पाचवीपासूनच बालखेळाडू तयार होत आहेत याचा सार्थ अभिमान वाटतो. असे सांगत कार्यक्रमाचे हेतू विशद केला व उपस्थितांचे स्वागत केले. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश मोहरे, तालुका क्रीडा अधिकारी सचिन रणदिवे यांनी आपल्या मनोगतात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या शैक्षणिक व क्रीडाविषयक गुणांमधून या मैदानावर उत्तम खेळाडू आणि अधिकारी घडत आहेत असे सांगितले. यावेळी प्रा.संजय पाटील यांनी गुरुवर्य बापूसाहेब झपके स्पोर्ट्स अकॅडम च्या खेळाडूंना कीट भेट दिली यावेळी अकॅडमीचे समन्वयक नरेंद्र होनराव उपस्थित होते. या उद्घाटन सोहळ्यासाठी संस्थेचे कार्यकारणी सदस्य व सांगोला तालुका बास्केटबॉल असोसिएशनचे सदस्य विश्वेश झपके ,बास्केटबॉल स्पर्धा आयोजन समिती सचिव प्रशांत मस्के,महाराष्ट्र, सोलापूर व सांगोला तालुका बास्केटबॉल असोसिएशनचे पदाधिकारी,पंच,खेळाडू, सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला पदाधिकारी,पत्रकार, नागरिक विद्यामंदिर परिवारातील सर्व प्रशासकीय अधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.धनाजी चव्हाण,सुनील भोरे यांनी केले तर प्राचार्य चारुदत्त जगताप यांनी सर्वांचे आभार मानले.

### क्रीडायज्ञ तरुण पिढीसाठी दिशादर्शक : नगराध्यक्ष माने

सांगोल्यासारख्या दुष्काळी तालुक्यात शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या कै.गुरुवर्य बापूसाहेबांच्या नावाने अमृत महोत्सवी वर्षात होणाऱ्या या राष्ट्रीय बास्केटबॉल सामन्यांचे आयोजन अतिशय अभिमानास्पद आहे. सलग ४३ वर्षे सातत्याने होत असलेल्या या स्पर्धेमुळे सांगोल्याची ओळख राज्याबाहेरही पोहोचली आहे.गुरुवर्य बापूसाहेबांच्या स्मृतीसमारोहानिमित्त सुरू झालेला हा क्रीडायज्ञ तरुणांना मैदानाकडे वळवणारा असून, आजच्या तरुण पिढीसाठी तो नक्कीच दिशादर्शक ठरेल. सांगोला शहराच्या या ऐतिहासिक भूमीत सर्व खेळाडूंचे मी स्वागत करतो आणि त्यांना या स्पर्धेसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देतो.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### एमआयटी विश्वशांती गुरुकुलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहात साजरी

**पंढरपूर,दि. ४ सप्टेंबर-**

वाखरी येथील एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमीचा सोहळा बालगोपाळांचा उत्स्फूर्त सहभागाने मोठ्या उत्साहात झाला. बालगोपाळांनी पारंपरिक पोशाखातील श्रीकृष्ण व राधेच्या वेशभूषेतून बालिकांनी कार्यक्रमात विशेष रंगत आणली. दहीहंडी उत्सवात विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. यावेळी 'गोपाला गोपाला, देवकीनंदन गोपाला' या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. मुख्याध्यापक शिवाजी गवळी यांनी विद्यार्थ्यांना श्रीकृष्ण जन्माचा प्रसंग अत्यंत रंजक कथारूपाने सांगितला. उपमुख्यध्यापिका रंजीता चौकेकर यांनी विद्यार्थ्यांना दहीहंडी उत्सवाचे सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व सांगितले. कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### श्रावण शुक्रवारनिमित्त श्री रुक्मिणी मातेस पारंपरिक अलंकार परिधान

**पंढरपूर, दि. ४ सप्टेंबर -**



श्रावण शुक्रवार पर्वानिमित्त श्री विठ्ठल व रुक्मिणी मंदिरात रुक्मिणी मातेस सुवर्ण अलंकार परिधान करण्यात आले. पारंपरिक अलंकारांमुळे रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी महिला भाविकांची गर्दी झाली होती. श्री रुक्मिणी मातेस सोन्याचा मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, ताणवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमनी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मी हार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादी पारंपरिक अलंकार परिधान केल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रवीणकुमार घम यांनी दिली.



### तरूणांनी उद्योगाला प्राधान्य द्यावे : कोगनूरे

**दक्षिण सोलापूर, दि.४ सप्टेंबर -**

तरूणांनी नोकरीच्या मागे न लागता स्वावलंबी जीवन जगण्यासाठी उद्योगाला प्राधान्य द्यावे. राजकारण व नोकरीच्या पाठीमागे न लागता समाजाच्या गरजेनुसार उद्योग निवडून यशस्वी व्हावे, असे प्रतिपादन एम.के. फाउंडेशनचे अध्यक्ष महादेव कोगनूरे यांनी केले. मंद्रूप येथील विजयकुमार घाले यांच्या वैभव ट्रेडर्सचे उद्घाटन करताना कोगनूरे बोलत होते. यावेळी पंचायत समिती सदस्य मळसिध्द मुगळे, माजी सभापती अप्पाराव कोरे, संजय गांधी निराधार योजनेचे माजी अध्यक्ष प्रशांत कडते, ग्रामपंचायत सदस्य शिवपुत्र जोडमोटे, गोविंद पाचवे, सुरेश स्वामी, शिवराज कालदे, अॅड. नागेश मेंडगुदले, ग्रामपंचायत अधिकारी प्रविणकुमार घाडगे आदी उपस्थित होते. मान्यवरांनी विजयकुमार घाले व घाले परीवाराला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमासाठी म्हाळप्पा घाले, चिदानंद घाले, निंगप्पा ख्याडे, केदार घाले, वैभव घाले, विशाल घाले, मल्लिनाथ घाले व जाकीर शेख आदींनी परीश्रम घेतले.



### व्यक्तिमत्त्व हे घडवावे लागते : प्रा. पाटील

**सांगोला, दि.४ सप्टेंबर-**

विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, सकारात्मक विचारसरणी, शिस्त आणि प्रभावी संवादकौशल्य विकसित करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या यशामध्ये केवळ शैक्षणिक ज्ञान महत्त्वाचे नसून, त्यासोबत व्यक्तिमत्त्व विकासाचीही तितकीच गरज आहे, असे प्रतिपादन प्रा.राजेंद्र पाटील यांनी केले. ते फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च, सांगोला येथे मेकॅनिकल व सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर आयोजित व्याख्यानात बोलत होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.संजय पवार यांनी केले. कार्यक्रमासाठी प्रा.सोनाली पाटील यांच्यासह सिव्हिल व मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## निधन वृत्त...

### बशीर परवाज

**सोलापूर, दि. ४ सप्टेंबर-**



सोलापूरचे साहित्यिक बशीर परवाज (वय ८२) यांचे शुक्रवारी रात्री निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले आणि दोन मुली असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर जडे साहेब कब्रस्तान येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

### शैलजा भट

**सोलापूर, दि. ४ सप्टेंबर -**

सिद्धेश्वर पेठ येथील रहिवासी आणि हरिभाई देवकरण प्रशालेतील संस्कृतच्या माजी शिक्षिका शैलजा भट (वय ७०) यांचे गुरुवार दि.३ सप्टेंबर रोजी येथील अश्विनी रुग्णालयात अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा आदित्य, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी मोदी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# शक्तीपीठ महामार्ग विरोधात शेतकरी एकवटले

## करकंब परिसरातील बाधितांचा पंढरपूर तहसीलसमोर उपोषणाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.४ सप्टेंबर -**



प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गाविरोधात करकंब व पंढरपूर तालुक्यातील बाधित शेतकरी या महामार्गाच्या विरोधात आरपारची लढाई लढण्यासाठी मैदानात उतरले आहेत. बुधवार दि. ९ सप्टेंबर रोजी पंढरपूर तहसील कार्यालयासमोर एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात येणार आहे.

प्रशासनाने बाधित शेतकऱ्यांना विश्वासात न घेता संयुक्त मोजणीच्या मनमानी तारखा जाहीर केल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे. याविरोधात शक्तीपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीने हा निर्वाणीचा इशारा दिला आहे. शासनाने मे २०२६ मध्ये या महामार्गाची अधिसूचना काढल्यापासून संबंधित शेतकऱ्यांनी या महामार्गाविरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे. या प्रकल्पामुळे बागा, बागायती शेती, पारंपारिक जलस्तोत्र, राहती घरे उध्वस्त होऊन शेतकरी भूमिहीन होणार आहे. यापूर्वी उपविभागीय अधिकारी, सोलापूर जिल्हाधिकारी, एमएसआरडीसी, मुख्यमंत्री कार्यालय यांचेकडे लेखी हरकती नोंदवूनही प्रशासनाने त्याला केराची टोपली दाखविल्याचा आरोप बाधित शेतकऱ्यांनी केला आहे.

सदर आंदोलनाबाबत करकंब ता.पंढरपूर येथे बाधित शेतकऱ्यांची निर्धार बैठक पार पडली. प्रस्तावित महामार्ग पूर्णपणे रद्द होत नाही, तोपर्यंत हा लढा आम्ही थांबवणार नाही असा इशारा दिला. प्रशासनाने तात्काळ निर्णय न घेतल्यास लढा अधिक आक्रमक स्वरूपात करण्याचा निर्धार संघर्ष समितीने केला आहे.

**शेतकऱ्यांच्या मागण्या**

✽ संयुक्त मोजणीला तात्काळ स्थगिती द्या. ✽ शेतकऱ्यांच्या हरकतींवर कायदेशीर निर्णय होईपर्यंत मोजणीच्या तारखा रद्द करा ✽ सक्तीचे अधिग्रहण रद्द करा ✽ शासन व अधिकाऱ्यांशी थेट चर्चा घडवून आणा

# बृहन्मुंबई महापालिकेच्या महापौर पुरस्काराने वैशाली टंकसाळी-धाराशिवकर सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ सप्टेंबर -**



मूळच्या सोलापूरच्या व सध्या मुंबईत राहत असलेल्या वैशाली टंकसाळी-धाराशिवकर यांना बृहन्मुंबई महानगरपालिकेचा प्रतिष्ठेचा महापौर पुरस्कार २०२६ यांना प्रदान करण्यात आला आहे.

वैशाली टंकसाळी-धाराशिवकर या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पीएमश्री. एमपीएस गणेशनगर इंग्रजी शाळेत शारीरिक शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. शाळेत सेवा करत असताना बॉक्सिंग, ज्युडो, कुस्ती, अॅथलेटिक्स यासारख्या खेळात विद्यार्थ्यांच्या क्षमता ओळखून त्यांना राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळात सहभाग घ्यावयास प्रेरणा दिली. मेहनती, प्रामाणिक, शिस्तप्रिय, समर्पणाची भावना ठेवून विद्यार्थ्यांना घडवण्याचे कार्य करीत आहेत, त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना या पुरस्काराने सन्मानित केले आहे.

त्यांचे शालेय शिक्षण स.हि.ने. कन्या प्रशाला व दयानंद महाविद्यालयात येथे झाले. शिवाजी विद्यापीठाच्या अॅथलेटिक्स व खो - खो संघाच्या कर्णधार तसेच महाराष्ट्राच्या खो-खो संघाच्याही खेळाडू होत्या. आपल्या जिल्ह्याच्या अशा गुणी खेळाडूने बृहन्मुंबई महापालिकेत सोलापूर जिल्ह्याचा नावलौकिक वाढविला असून मानाचा तुरा रोवला आहे. पुरस्कारप्राप्तीबद्दल त्यांचे सोलापूर शहरातील सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# सीना-माढा योजनेच्या पाण्यासाठी अन्नत्याग

## उपळाई बुद्रुकमध्ये आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ४ सप्टेंबर -**




सीना-माढा उपसा सिंचन योजनेचे पाणी उपळाई बुद्रुक गावाला मिळावे, या मागणीसाठी शेतकऱ्यांनी मंगळवार (दि. १) दुपारपासून क्रांती चौकात अन्नत्याग आमरण उपोषण सुरू केले आहे. गावात प्रत्यक्ष पाणी पोहोचेपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार केला आहे.

पाण्याच्या मागणीसाठी उपळाईकरांकडून पुर्वीही आंदोलन केले होते. त्यावेळी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडून पाणी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, आश्वासनानंतरही प्रत्यक्ष पाणी न मिळाल्याने शेतकऱ्यांनी पुन्हा आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. मंगळवारी सायंकाळी पाचच्या सुमारास लघु पाटबंधारे विभागाचे उपकार्यकारी अभियंता मंजुनाथ तुंबळ यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन पाणी सोडण्याबाबत आश्वासन दिले. मात्र, चर्चेनंतरही ठोस निर्णय न झाल्याने आंदोलनकर्त्यांनी उपोषण सुरूच ठेवण्याचा निर्णय घेतला.

आंदोलनाला पंचायत समिती सदस्य प्रा. नितीन झाडबुके, माजी पंचायत समिती सदस्य दीपक देशमुख, सामाजिक कार्यकर्ते शंभू साठे यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन पाठिंबा दिला. सज्जन गोरे, हरी बेडगे, दत्तात्रय शिंदे, ईसाक काझी, संजय आवारे, वैभव गोरे, सोमेश्वर शेंडे, पप्पू डुचाळ, विश्वंभर झाडबुके व शिवानंद झाडबुके यांनी अन्नत्याग आमरण उपोषण सुरू केले आहे.

# श्रीपूरला 'एमआयडीसी'च्या घोषणेने आशा पल्लवीत

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. ४ सप्टेंबर -**



माजी आ. बबनराव शिंदे यांच्या नागरी सत्कारप्रसंगी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे यांच्या मागणीला प्रतिसाद देत श्रीपूरच्या एमआयडीसीचे काम मार्गी लावू असे आश्वासन दिले. त्यानंतर श्रीपूरकरांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.

श्रीपूर येथे महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची खंडकऱ्यांना देवून सुमारे चार हजार एकर जागा उपलब्ध आहे. तसेच अगदी जवळून भिमा नदी वाहते. त्यामुळे एमआयडीसीसाठी अत्यावश्यक असणारे पाणी उपलब्ध आहे . याबरोबरच याला लागूनच संगम ते वेळापूर क्रॉक्रीट रस्ता होत आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे ३ ते ४ किमीवरून सोलापूर ते पुणे हा राष्ट्रीय महामार्ग जात आहे. एकूणच पाणी व दळणवळणाची साधने उपलब्ध असलेने व खुद्द पालकमंत्र्यानीच आश्वासन दिल्याने एमआयडी बाबत श्रीपूरकरांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत .

याभागात एमआयडीसी व्हावी यासाठी माळशिरसचे आ . उत्तम जानकर, माढ्याचे आ. अभिजित पाटील, माळशिरसचे माजी आ. राम सातपुते यांनी पाठपुरावा केला. त्याप्रमाणे सोलापूर औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी शिवाजी राठोड यांनी शेती महामंडळाचे जमिनीची प्रत्यक्ष पाहणी केली होती. यावेळी भानुदास सालगुडे, सोमनाथ वाघमोडे, शिवसेना (शिंदे गट ) चे तानाजी भोळे - पाटील, श्रीपूर नगरपंचायतीचे सदस्य तानाजी भगत, सोमनाथ मुंडकणे व उद्योजक महावीर शहा उपस्थित होते.

# विवाहितेचा छळ; पतीसह सासरच्या चौघांविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ४ सप्टेंबर**

विवाहितेला मानसिक व शारीरिक त्रास दिल्याप्रकरणी पतीसह सासरच्या चौघांविरुद्ध बार्शी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.



ऋतुजा स्वप्निल मेहेर (वय २५, रा. धर्माधिकारी प्लॉट, गाडेगाव रोड, बार्शी) यांनी याबाबत पोलिसांत फिर्याद दिली आहे. त्यांचे लग्न २४ मे २०२५ रोजी रोपळे, ता. माढा येथील स्वप्निल मेहेरसोबत झाले. लग्नापूर्वी त्यांनी नोकरीची इच्छा व्यक्त केली होती. तसेच दोघे पुण्यात राहण्याचे ठरले होते. त्यावेळी अटी मान्य केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

लग्नानंतर त्या पतीसोबत कुर्डुवाडी येथे राहत होत्या. १० ऑगस्ट २०२५ रोजी खासगी नोकरीबाबत पतीशी बोलल्यानंतर त्याने मारहाण, शिवीगाळ व दमदाटी केली. सासू-सासऱ्यांनीही दबाव टाकला. दीर संदीपनेही शिवीगाळ व दमदाटी केली. २० मार्च २०२६ रोजी सासरे कैलास मेहेर यांनी नोकरी करु देणार नसल्याचे सांगून घराच्या बांधकामासाठी माहेरहून ४ लाख रुपये आणण्यास सांगितले. ११ मार्च रोजी नोकरीच्या कारणावरुन पतीने मारहाण केल्यानंतर माहेरी आल्याचे त्यांनी फिर्यादीत म्हटले आहे. ३० जून रोजी पतीने व्हॉट्सॲपवर धमकीवजा संदेश पाठवून मानसिक त्रास दिल्याचा आरोपही केला आहे. याप्रकरणी पती स्वप्निल, सासरा कैलास, सासू भामाबाई मेहेर आणि दीर संदीप मेहेर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# मनोज जरांगे-पाटील यांच्या समर्थनार्थ मंगळवेढा कडकडीत बंद

## व्यापारी, दुकानदार, नागरिकांचा प्रतिसाद

## बाजारपेठा, दुकाने बंद, रस्ते शांत

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ४ सप्टेंबर -**




मराठा आरक्षणाच्या समर्थनार्थ मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा दर्शविण्यासाठी मंगळवेढा शहर व तालुक्यात शुक्रवारी (दि. ४ सप्टेंबर) कडकडीत बंद ठेवण्यात आला. बंदला शहरातील व्यापारी, व्यावसायिक, दुकानदार तसेच नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

सकाळपासूनच प्रमुख बाजारपेठा, दुकाने आणि विविध व्यावसायिक आस्थापना बंद ठेवल्याने नेहमी गजबजलेल्या रस्ते व बाजारपेठेत शांतता दिसून आली. अनेक व्यापाऱ्यांनी स्वतःहून दुकाने बंद ठेवली. शहरातील विविध भागांत कार्यकर्ते बंद यशस्वी करण्यासाठी सक्रिय होते. प्रशासन व पोलिसांकडूनही आवश्यक खबरदारी घेतली होती.

यापूर्वी दामाजी चौक येथे मराठा बांधवांची बैठक झाली. बैठकीत ठिय्या आंदोलन, रास्ता रोको आणि बंद याबाबत जनजागृती केली. मंगळवेढा शहर व तालुका बंदचे आवाहन केले. बंदच्या माध्यमातून मराठा आरक्षणाच्या मागणीला मंगळवेढ्यातून ठोस पाठिंबा देण्यात आला.



# मंगळवेढा येथे नदी पात्रातून अवैध वाळू वाहतूक

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ४ सप्टेंबर -**

मंगळवेढा भीमा नदीपात्रातून विनापरवाना वाळूचा उपसा करून वाहतूक करणाऱ्या वाहनावर मंगळवेढा पोलिसांनी कारवाई केली आहे. कारवाईत टमटमसह वाळू असा मुद्देमाल जप्त करत एका आरोपीला अटक केली आहे. मंगळवेढा तालुक्यातील तांडूर येथील नदीपात्रातून २ सप्टेंबर रोजी पहाटेच्या सुमारास बेकायदेशीरपणे वाळूचा उपसा करून तिची वाहतूक केली जात होती. याप्रकरणी हवालदार विनायक जाधव (वय ३६ )यांनी मंगळवेढा पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. कारवाईत पोलिसांनी नामदेव बिरूदेव कोळेकर ( वय २१ रा. रड्डे ) यास अटक केली आहे. आरोपी अशोक लेलँड कंपनीच्या टमटममधून (एमएच १३ इपी ५०८४) अंदाजे एक ब्रास वाळू स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बेकायदेशीरपणे वाहून नेताना आढळून आला. याप्रकरणी मंगळवेढा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास हवालदार खंडागळे करत आहेत.

# पंढरपूर फलटण रेल्वे मार्गाचा 'डीपीआर' तयार; मंजुरीसाठी पुढील प्रक्रिया सुरू

## खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या प्रश्नाला रेल्वे राज्यमंत्री सोमण्णा यांचे उत्तर

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ४ सप्टेंबर -**




पंढरपूर फलटण आणि देहू राष्ट्रीय रेल्वे मार्गांदरम्यान रेल्वे जोडणी निर्माण करण्याबाबत खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी लोकसभेत प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाला केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री वी. सोमण्णा यांनी लेखी उत्तर दिले आहे. उत्तरानुसार, पंढरपूर -फलटण रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार केला आहे. त्यामुळे या महत्त्वपूर्ण रेल्वे मार्गाच्या पुढील प्रक्रियेला आता गती मिळण्याची अपेक्षा आहे.



डीपीआर तयार झाल्यानंतर प्रकल्पाच्या पुढील कार्यवाहीसाठी महाराष्ट्र शासनासह विविध संबंधित भागधारकांशी सल्लामसलत करणे आवश्यक आहे. तसेच नीती आयोग, केंद्रीय अर्थ मंत्रालय आणि इतर संबंधित यंत्रणांकडून आवश्यक परीक्षण व मंजुरीची प्रक्रिया पूर्ण करावी लागणार असल्याचे रेल्वे मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. संबंधित यंत्रणांकडून परीक्षण आणि मंजुरी यावर प्रकल्पाच्या अंतिम मंजुरीची कालमर्यादा अवलंबून असल्याचेही उत्तरात स्पष्ट केले आहे. पंढरपूर-फलटण रेल्वे मार्गामुळे सोलापूर, माढा, पंढरपूर, माळशिरस तसेच फलटण परिसरातील दळणवळणाला मोठी चालना मिळणार आहे.


# मतदार यादीत नाव नसल्यास त्वरित दावा करा : तहसिलदार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ४ सप्टेंबर -**

मतदार यादीत आपले नाव नसेल आणि इतर काही चुका झाल्या असतील तर त्वरित दावा करा आणि आपल्या मतदानाचा हक्क अबाधित राखा असे आवाहन तहसीलदार विनायक मगर यांनी केले आहे

पुनर्नरीक्षण मतदार यादी प्रसिद्ध झाली आहे. मतदारांनी ती यादी पहावी ,आपले नाव तपासावे, नावात चूक झाली का वय जन्मतारीख फोटो पत्ता आदी बाबत त्रुटी असतील तसेच मतदान केंद्र बरोबर आहे का याकडेही लक्ष ठेवावे नाव नसेल गायब असेल किंवा चुकीचे असेल तर ३० सप्टेंबरपर्यंत या संदर्भात दावा करावा, आदी सूचना मगर यांनी दिल्या आहेत.

सदरची मतदार यादी महाराष्ट्र शासनाने एसआयआर पोर्टलवर प्रसिद्ध केली आहे. ३० सप्टेंबर पर्यंत दावे दाखल करावेत. त्याची सुनावणी होऊन त्याचे निराकरण २२ऑक्टोबर पर्यंत केले जाईल आणि त्यानंतर अंतिम यादी २७ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे, असेही तहसिलदार मगर यांनी सांगितले.



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### एम. के. फाउंडेशनची भक्तिमय दर्शन यात्रा

**सोलापूर, दि.४ सप्टेंबर-**

श्रावण मासाचे औचित्य साधून एम. के. फाउंडेशन संचालक मंडळ तसेच महादेव कोगनुरे मित्र परिवाराच्या वतीने आपल्या सदस्यांसाठी विशेष भक्तिमय दर्शन यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेअंतर्गत श्री क्षेत्र औंढा नागनाथ ज्योतिर्लिंग तसेच नांदेड येथील पवित्र गुरुद्वारा येथे दर्शन घेण्यात येणार आहे. एम. के. फाउंडेशन आणि महादेव कोगनुरे मित्र परिवार यांच्या माध्यमातून विविध सामाजिक व विधायक उपक्रम राबविले जात आहे. धार्मिक आस्था, सामाजिक बांधिलकी आणि आपलेपणाची भावना जपत परिवारातील सदस्यांनी एकत्रितपणे हा आध्यात्मिक प्रवास करण्याचा संकल्प करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

### अनवलीच्या शासकीय निवासी शाळेत विद्यार्थ्यांचे स्वागत

**सोलापूर, दि. ४ सप्टेंबर-**

समाज कल्याण विभाग, सोलापूर अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून नव्याने सुरू झालेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांच्या शासकीय निवासी शाळा, अनवली (ता. पंढरपूर) येथे नवागत विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहात झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक आण्णासाहेब शिंदे होते. प्रमुख अतिथी म्हणून शासकीय मुलींचे वसतिगृह, पंढरपूर येथील विद्या कानडे उपस्थित होत्या. यावेळी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थी व पालकांच्या हस्ते शाळेच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले. स्वागतगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. सहशिक्षक दिगंबर जाधव यांनी प्रास्ताविक केले. नवागत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प व शैक्षणिक साहित्य देऊन स्वागत करण्यात आले. मुख्याध्यापक आण्णासाहेब शिंदे यांनी विद्यालयात इयत्ता सहावी ते आठवीचे वर्ग सुरू झाले असून, शासनामार्फत विद्यार्थ्यांना निवास, भोजन, शैक्षणिक साहित्य तसेच विविध सुविधा विनामूल्य उपलब्ध करून दिल्या जात असल्याची माहिती दिली.



### लायन्स क्लब बार्शी रॉयलच्यावतीने दंत तपासणी शिबीर

**बार्शी दि. ४ सप्टेंबर-**

लायन्स क्लब बार्शी रॉयल व शिल्पा मल्टी स्पेशलिस्ट डेंटल हॉस्पिटल बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने दर महिन्याच्या पहिल्या बुधवारी मोफत दंत तपासणी व दातांचा कॅन्सर यावर गरजू, गरजवंत रुग्णांवर उपचार व मार्गदर्शन करण्यात येते. या उपक्रमासाठी ला. डॉ. तेजस लाड व तसेच ला. डॉ. किरण लाड यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात येते . सद्यस्थितीमध्ये लोकांना तोंडाच्या कॅन्सरचा प्रमाण मोठ्या प्रमाणात जाणवत आहे आणि अजून पण लोकांमध्ये जनजागृती नाही. त्यासाठीच हा उपक्रम लाड डॉक्टरांकडून राबवण्यात येतो, असे सांगण्यात आले.




### स्वामी विवेकानंद शाळेत वृक्षारोपण संपन्न

**सोलापूर, दि. ४ सप्टेंबर-**

माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून स्थानिक स्वामी विवेकानंद शिशु व प्राथमिक शाळेत वृक्षारोपण कार्यक्रमाचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते. पर्यावरणाचे संतुलन राखणे आणि भावी पिढीमध्ये निसर्गाविषयी सजगता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. शाळेच्या प्रांगणात संपन्न झालेल्या या वृक्षारोपण कार्यक्रमाचा शुभारंभ शालेय समितीचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांच्या हस्ते विविध प्रजातींची रोपे लावून करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी झाडे लावण्यासोबतच त्यांच्या संगोपनाची जबाबदारी घेण्याचा संदेश दिला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड (एन.ए.बी.) जिल्हा शाखेचे सेक्रेटरी शशीभूषण यलगुलवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन शाळेच्या मुख्याध्यापिका सविता व्हनमाने यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. याप्रसंगी सहशिक्षिका वैशाली शहापुरे, अनुराधा बनसोडे, राजू मिरेकर यांच्यासह सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ब्लड कॅन्सर आधुनिक उपचारांनी बरा होऊ शकतो : डॉ.जयशेतवार

**सोलापूर, दि.४ सप्टेंबर-**

बोन मॅरो ट्रान्सप्लांट, इम्युनोथेरपी, टार्गेटेड थेरपी आणि सीएआर-टी सेल थेरपीसारख्या आधुनिक उपचारपद्धतींमुळे रक्ताचा कर्करोग अर्थात ब्लड कॅन्सर आता रुग्णांसाठी आशेचे नवे दालन खुले झाले आहे, अशी माहिती डॉ. गणेश जयशेतवार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

एकेकाळी अत्यंत गंभीर मानला जाणारा रक्ताचा कर्करोग अर्थात ब्लड कॅन्सर आता अनेक रुग्णांमध्ये प्रभावीपणे नियंत्रित करता येणारा आणि काही प्रकारांमध्ये पूर्णपणे बरा होऊ शकणारा आजार बनत आहे, असेही त्यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस अतुल चव्हाण, साई वेंकटेश आदी उपस्थित होते.

# ग्रामीण रोजगाराला नवी दिशा; सोलापूर जिल्हा परिषदेत 'पंच संमेलन'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ सप्टेंबर-**

ग्रामीण भागातील बेरोजगारी कमी करून स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी निर्माण करण्याबरोबरच गावांच्या मूलभूत सुविधांचा विकास आणि शाश्वत मालमत्ता निर्मितीला चालना देण्यासाठी ग्रामपंचायतींनी अधिक प्रभावी नियोजन करावे, असे आवाहन जिल्हा परिषदेत आयोजित जिल्हास्तरीय 'पंच संमेलन २०२६'मध्ये करण्यात आले. 'विकसित भारत रोजगार व आजीविका हमी अभियान (ग्रामीण) कायदा, २०२५' (जी रामजी)च्या प्रभावी अंमलबजावणीवर या संमेलनात विशेष भर देण्यात आला.

सोलापूर जिल्हा परिषदेच्या वतीने यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित या संमेलनास जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष तथा अर्थ व बांधकाम समिती सभापती इंद्रजीत पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, कृषी, पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सभापती रामपा चिवडशेट्टी, महिला व बालकल्याण समिती सभापती अमृता वाघे, समाजकल्याण समिती सभापती संस्कृती सातपुते, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) सूर्यकांत भुजबळ, उपजिल्हाधिकारी (रोहयो) अंजली मरोड यांच्यासह जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सभापती, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जी रामजी कायद्यातील तरतुदी, ग्रामीण नागरिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया, कामांचे प्राधान्यक्रम निश्चित करणे, ग्रामपंचायतींची जबाबदारी, लोकसहभाग आणि गावाच्या गरजेनुसार शाश्वत विकासकामांचे नियोजन याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

समाजकल्याण समिती सभापती संस्कृती सातपुते यांनी गावपातळीवर उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर करून रोजगारनिर्मिती आणि आजीविका बळकटीकरणावर भर देण्याचे आवाहन केले.

केवळ रोजगार उपलब्ध करून न थांबता त्या माध्यमातून गावात दीर्घकालीन उपयोगी ठरणाऱ्या मालमत्ता निर्माण करण्याची गरज व्यक्त केली.

ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ यांनी रोजगारनिर्मिती, आजीविका वृद्धी आणि सक्षम ग्रामव्यवस्था उभारण्यासाठी विभागीय समन्वय व लोकसहभाग आवश्यक असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन सागर होनमाने व प्रशांत ढगे यांनी केले. गट विकास अधिकारी (रोहयो) अरुण वाघमोडे यांनी आभार मानले.

## मनपा प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेचे 'उपक्रमशील शिक्षक पुरस्कार' जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ सप्टेंबर-**

सोलापूर महानगरपालिका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या वतीने महानगरपालिकेच्या मराठी, कन्नड, उर्दू आणि तेलुगू माध्यमातील ११ उपक्रमशील शिक्षकांची उपक्रम शील शिक्षक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

शनिवार, दि.५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता समाज कल्याण केंद्र येथे या पुरस्कारांचे वितरण सोहळा होणार आहे, अशी माहिती संस्थेचे चेअरमन नागेश गोसावी यांनी दिली. यावेळी जहारा नगदेकर, गंगाधर कांबळे, स्वाती शिंदे, कृष्ण परमेश्वर सुतार, इम्रान जमादार, अफरोज बागवान, मुद्देसर पाशा पिरजादे, शाहीन शेख, केशव गलगली, भास्कर मदनाल, स्नेहा पुजारी उपस्थित होते.

अप्पासाहेब चंद्रकांत ककमारे (मनपा मराठी मुलांची शाळा कॅम्प), रियाज बिलाल नदाफ (मनपा मराठी मुलांची केंद्र शाळा क्र.४), हनुमंत कुंडलिक लंगोटे (मनपा मराठी मुलींची शाळा कॅम्प), दुर्गादेवी गणेश जंजिराल (मनपा मराठी मुलींची शाळा क्र.१०), शिरीन सुल्लामबुला शेख (मनपा मराठी मुलांची हेडक्वार्टर शाळा), विठ्ठल सत्यप्पा वाघमोडे (मनपा मुले कन्नड ३), कल्पना व्यंकटेश कुरापाटी (मनपा मुला-मुलींची तेलुगू शाळा क्र.१), तहसीन सोहेल शेख (मनपा मुलांची उर्दू चिरागली शाळा), शबाना परवीन सोहेल जमादार (मनपा मुलांची उर्दू केंद्रशाळा क्र.५), महेबूबबी मुश्ताक अहमद शेख (मनपा मुलांची उर्दू शाळा क्र.३), इम्रान हुसेन मोहम्मद इसाक सौराज (मनपा मुलांची उर्दू शाळा क्र.८) यांचा यात समावेश आहे.

## विशेष मतदार यादी पुनरिक्षणासाठी विभागीय आयुक्त ८ सप्टेंबरला सोलापुरात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ सप्टेंबर-**



भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार पुणे महसूल विभागातील पाच जिल्ह्यांसाठी विभागीय आयुक्त शीतल तेली- उगले यांची 'मतदार यादी निरीक्षक' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. विशेष सखोल पुनरिक्षण २०२६ अंतर्गत दावे व हरकती स्वीकारण्याच्या टप्प्यात मतदार यादी निरीक्षक तेली-उगले यांचे ८ ते १० सप्टेंबर या कालावधीत जिल्हानिहाय दौरे आयोजित करण्यात आले आहेत.

मतदार यादी निरीक्षक तथा विभागीय आयुक्त ह्या ८ सप्टेंबर रोजी सोलापूर येथे सकाळच्या सत्रात व सांगली येथे दुपारच्या सत्रात, ९ सप्टेंबर रोजी कोल्हापूर येथे सकाळच्या सत्रात व सातारा दुपारच्या सत्रात आणि १० सप्टेंबर रोजी पुणे येथे आढावा घेतील.

मतदार यादी निरीक्षक तथा विभागीय आयुक्त ह्या ८ सप्टेंबर रोजी सोलापूर येथे सकाळच्या सत्रात व सांगली येथे दुपारच्या सत्रात, ९ सप्टेंबर रोजी कोल्हापूर येथे सकाळच्या सत्रात व सातारा दुपारच्या सत्रात आणि १० सप्टेंबर रोजी पुणे येथे आढावा घेतील. नोडल अधिकाऱ्यांनी निरीक्षकांच्या भेटीपूर्वी संबंधित जिल्ह्यात उपस्थित राहून भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या पहिल्या भेटीच्या तपासणी यादी (चेक लिस्ट) नुसार सर्व बाबींची पडताळणी करावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

मतदार यादी निरीक्षकांच्या दौऱ्यादरम्यान जिल्ह्यातील विद्यमान खासदार, आमदार आणि मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची विशेष बैठक आयोजित करण्यात येणार आहे. तसेच सर्व संबंधित निवडणूक अधिकारी यांची आढावा बैठक घेण्यात येणार आहे, असे विभागीय आयुक्त कार्यालयाचे अपर आयुक्त तुषार ठोंबरे यांनी सांगितले.

## गणेशोत्सव मिरवणुकीत डॉल्बी सिस्टीम व लेझर लाईटला बंदी

**१३ ते २६ सप्टेंबरपर्यंत जिल्ह्यात प्रतिबंध लागू**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ सप्टेंबर-**

गणेशोत्सवाच्या काळात सार्वजनिक गणेश मंडळांच्या मिरवणुकांमध्ये डॉल्बी सिस्टीम व लेझर लाईटचा वापर केल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास आणि सुरक्षिततेस धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन, जिल्ह्यात १३ ते २६ सप्टेंबर, २०२६ या कालावधीत गणेशमूर्ती आगमन व विसर्जन मिरवणुकींमध्ये डॉल्बी सिस्टीम आणि लेझर लाईट शोच्या वापरास प्रतिबंध करण्यात आला आहे. जिल्हादंडाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत.

जिल्ह्यात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा केला जातो. सार्वजनिक गणेश मंडळांकडून गणेशमूर्ती आगमन तसेच विसर्जनावेळी मोठ्या प्रमाणात मिरवणुका काढल्या जातात. या मिरवणुकांमध्ये डॉल्बी सिस्टीम आणि लेझर लाईटचा मोठ्या प्रमाणात वापर होण्याची शक्यता असते. डॉल्बी सिस्टीमच्या वापरामुळे मिरवणुकीत उपस्थित असलेल्या काही व्यक्तींना कानाचा व छातीचा त्रास होऊन कायमस्वरूपी अपंगत्व अथवा जीवितास धोका निर्माण झाल्याच्या घटना पूर्वी निदर्शनास आल्या आहेत. तसेच, लेझर लाईट थेट डोळ्यांवर पडल्यामुळे विशेषतः लहान मुले आणि वयोवृद्धांच्या डोळ्यांच्या पडद्याला व बुबुळाला इजा झाल्याच्या घटनाही घडल्या असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

दि.१३ सप्टेंबर ते २६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत सोलापूर जिल्ह्यात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकडून स्थापना व विसर्जनाच्या दिवशी आयोजित मिरवणुकांमध्ये डॉल्बी सिस्टीम आणि लेझर लाईट शोचा वापर करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. दरम्यान, या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर फौजदारी कारवाई करण्यात येईल, असेही जिल्हादंडाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आदेशात स्पष्ट केले आहे.

## सोलापूरकरांसाठी खरेदीची पर्वणी; शॉपिंग फेस्टिव्हल एक्स्पोचा दिमाखात शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ सप्टेंबर-**



सोलापूर शहरातील व्यापार, उद्योग आणि व्यावसायिक क्षेत्राला चालना देण्याच्या उद्देशाने आर. के. इव्हेंट्स अँड एक्झिबिशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सोलापूर शॉपिंग फेस्टिव्हल एक्स्पो२०२६ चा शुभारंभ शुक्रवारी हेरिटेज 'सी' लॉन्स, गांधी नगर येथे उत्साहात झाला. बिल्डर असोसिएशनचे अध्यक्ष मनोज म्हेत्रस, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष केतन शहा, प्रदीप हिंगे, युवराज चुंबळकर, दत्तात्रय मुळे, माजी नगरसेवक जगदीश पाटील आणि अमोल सोनकवडे यांच्या प्रमुख उपस्थितीत दीपप्रज्वलन करून एक्स्पोचे उद्घाटन करण्यात आले.

तीन दिवस चालणाऱ्या या एक्स्पोमध्ये ऑटोमोबाईल, रिअल इस्टेट, सोलार एनर्जी, बँकिंग व फायनान्स, फर्निचर, शिक्षण तसेच विविध व्यावसायिक क्षेत्रांतील कंपन्या व संस्थांनी सहभाग घेतला आहे. नागरिकांना विविध उत्पादने व सेवांची माहिती, नवीन व्यवसाय व गुंतवणुकीच्या संधी तसेच विविध आकर्षक ऑफर्स एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

एक्स्पोमध्ये फॉक्सवॅगन कार, लक्ष्मी ऑटोमोबाईल, जोगेश्वरी सोलार, ब्रह्मा डेव्हलपर्स, क्रिस्टल डेव्हलपर्स, श्री स्वामी समर्थ रिॲलिटी, फायसन सोलार, मोंढे मोटर्स, शुभम ग्रुप, तत्त्व सोलार, डिब्बो एज्युकेशन, सोलार पॉवर, यश डेव्हलपर्स, नेक्सा , डायमंड डेव्हलपर्स, पी. एन. रिअल इस्टेट, राहुल डेव्हलपर्स, स्कायलाइन प्रॉपर्टीज, लोकमान्य मल्टिपर्पज बँक, लोकमंगल बँक, हॅप्पी होम फर्निचर, स्नेहरिका ग्रुप आदींचे स्टॉल आहेत. रिअल इस्टेट विभागात विविध गृहप्रकल्प, फ्लॅट्स व प्लॉट्सची माहिती, तर सोलार विभागात सौर ऊर्जा प्रणाली व ऊर्जा बचतीच्या उपाययोजनांची माहिती देण्यात येत आहे. ऑटोमोबाईल क्षेत्रात नवीन वाहन मॉडेल्स आणि विविध ऑफर्स नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत. बँकिंग व फायनान्स विभागात कर्ज योजना आणि आर्थिक सेवांची माहिती उपलब्ध आहे. यावेळी कमलेश शिंदे, जगदीश बोगा, रोहित जोगीपेठकर, वैभव गायकवाड, संतोष बगले, माधव साळुंखे, दिपली कल्यानशेट्टी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाती इराबत्ती यांनी केले, तर आभार कमलेश शिंदे यांनी मानले. दि. ४ ते ६ सप्टेंबरदरम्यान सकाळी ११ ते रात्री ९ वाजेपर्यंत हा एक्स्पो नागरिकांसाठी मोफत प्रवेश असून सोलापूरकरांनी मोठ्या संख्येने भेट देण्याचे आवाहन करण्यात आले.



## नागरी वस्ती सुधारणा योजनेतून होताहेत रस्ते

**आ.देवेंद्र कोठे यांच्या हस्ते क्रॉंकिटीकरणाचा शुभारंभ**

**रस्त्यांसाठी १८ लाख ७७ हजार रुपयांचा विकासनिधी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ सप्टेंबर-**

उत्तर सदर बझार परिसरातील महावीर तालीम चौक मातंग समाज मंदिर परिसरातील रस्ते कॉंक्रिटीकरण कामाचा शुभारंभ गुरुवारी शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचे आमदार देवेंद्र कोठे यांच्या हस्ते करण्यात आला. या रस्त्यांसाठी १८ लाख ७७ हजार रुपयांचा विकासनिधी देण्यात आला आहे.

याप्रसंगी स्थायी समितीचे माजी सभापती देवेंद्र भंडारे, माजी नगरसेवक जेम्स जंगम, नगरसेवक रवी कैय्यावाले, भारतसिंग बडूरवाले, निर्मला जंगम, जुगनबाई आंबेवाले, ऋषिकेश मेट्रे, अक्षय अंजिखाने, मंडल अध्यक्ष नागेश सरगम, महावीर तालीमचे अध्यक्ष अनंत गोडलोलू, करेप्पा जंगम, अविनाश बेंजरपे, सुरेश पाटोळे, अशोक सायबोळू, रेणुका गोडलोलू, मोहन बाडीवाले, सुरज विटे उपस्थित होते.

आमदार देवेंद्र कोठे म्हणाले, सभामंडप, समाज मंदिरे, रस्ते या विकासकामांबरोबरच शहराला दररोज पाणी देण्याचा संकल्प आम्ही केला आहे.

# माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या वाढदिवसाचा जल्लोष

**पदाधिकारी, कार्यकर्त्यांकडून शुभेच्छांचा वर्षाव**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ सप्टेंबर-**

माजी केंद्रीय गृहमंत्री तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त सोलापूर शहर काँग्रेसच्या वतीने काँग्रेस भवनात उत्साहपूर्ण वातावरणात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. शहर काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष अंबादास गुत्तीकोंडा यांच्या पुढाकारातून झालेल्या या कार्यक्रमाला काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शिंदे समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष चेतन नरोटे आणि जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सातलिंग शटगार यांच्या हस्ते केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी शिंदे यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



सुशीलकुमार शिंदे यांच्या प्रदीर्घ राजकीय कारकिर्दीचा आणि सोलापूरच्या विकासासाठी त्यांनी केलेल्या योगदानाचा गौरव केला. सामान्य कार्यकर्त्यापासून केंद्रीय गृहमंत्रिपदापर्यंतचा त्यांचा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या नेतृत्वाचा आणि मार्गदर्शनाचा काँग्रेस कार्यकर्त्यांना सातत्याने लाभ होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान ''सुशीलकुमार शिंदे साहेबांना उदंड आयुष्य लाभो, उत्तम आरोग्य लाभो'' अशा घोषणांनी काँग्रेस भवन परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. उपस्थित कार्यकर्त्यांनी एकत्रितपणे वाढदिवसाचा आनंद साजरा करत शिंदे यांच्याप्रती असलेला स्नेह व्यक्त केला. याप्रसंगी माजी आमदारद्वय प्रकाश यलगुलवार, विश्वनाथ चाकोते, माजी महापौरद्वय संजय हेमगड्डी, आरिफ शेख, सुशीला आबुटे, स्थायी समितीचे माजी सभापती बाबा मिस्त्री, नगरसेवक प्रा.नरसिंह आसादे, युवक काँग्रेसचे अध्यक्ष गणेश डोंगरे, सेवादलचे अध्यक्ष भीमाशंकर टेकाळे, मीडिया सेलचे अध्यक्ष तिरुपती परकीपडंला यांच्यासह युवराज जाधव, विवेक कन्ना, महेश लोंढे, अनंत म्हेत्रे, सुभाष वाघमारे, मैनुद्दिन शेख, ॲड. करीमुनिसा बागवान, हेमा चिंचोळकर आदी उपस्थित होते.

**'८५ वा वाढदिवस, ८५ रक्तदाते'**

माजी केंद्रीय गृहमंत्री तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांच्या ८५ व्या वाढदिवसानिमित्त सोलापूर शहर युवक काँग्रेस अध्यक्ष गणेश डोंगरे यांनी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिंदे यांच्या ८५ व्या वाढदिवसाचे औचित्य साधत ८५ जणांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## नोंदणी पावतीवरही एसटी प्रवासात सवलत मिळणार

तभा वृत्तसेवा

लालूर दि. ४ सप्टेंबर : प्रवाशांची गैरसोय टळणार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) तिकीट प्रणालीत १ सप्टेंबर २०२६ पासून 'एनसीएमसी' (नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड) अनिवार्य केल्याने सर्व्हरवर अचानक ताण आला होता. यामुळे कार्ड टॉपअप आणि रिडिंगमध्ये मोठ्या अडचणी येत होत्या. मात्र, आता 'ईबिक्स कॅश' कंपनीकडून संबंधित सॉफ्टवेअरचे नवीन व्हर्जन अपडेट करण्यात आले आहे. लवकरच ही प्रणाली पूर्णपणे सुरळीत होईल, अशी माहिती कंपनीच्या प्रतिनिधींनी दिली.

तांत्रिक बिघाडामुळे प्रवाशांना सवलतीपासून वंचित राहावे लागू नये, याची खबरदारी एसटी प्रशासनाने घेतली आहे. कार्ड हातात नसलेल्यांना ३० सप्टेंबरपर्यंत, तर कार्ड असूनही मशीन चालत नसलेल्यांना १४ सप्टेंबरपर्यंत मॅन्युअल तिकिटावर सवलत देण्यात आली आहे. या निर्णयामुळे मशीन बंद असल्याच्या कारणावरून प्रवाशांना पूर्ण तिकीट काढावे लागण्याचा मनस्ताप आणि आर्थिक नुकसान टळणार आहे.



# विविध वृत्त.....

## ५०० हून अधिक विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा मार्गदर्शन



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ सप्टेंबर युनिक पब्लीक स्कूल येथे इयत्ता ५ वी ते १० वी च्या ५०० हून अधिक विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्रामध्ये सायबर वॉरियर योगिता जाधव आणि सायबर वॉरियर प्राजक्ता बोरुळे यांनी विद्यार्थ्यांना डिजिटल जगात सुरक्षित व जबाबदारीने वावरताना घ्यावयाच्या काळजीबाबत मार्गदर्शन केले.

सध्याच्या डिजिटल युगात विद्यार्थी मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणावर वापर करतात. त्यामुळे ऑनलाइन फसवणूक, बनावट लिंक, सोशल मीडिया स्कॅम आणि अनोळखी व्यक्तींकडून होणाऱ्या फसवणुकीपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, याबाबत विद्यार्थ्यांना सोप्या आणि समजण्यासारख्या पद्धतीने माहिती देण्यात आली.

सत्रादरम्यान संशयास्पद लिंक कशी ओळखावी, अनोळखी व्यक्तींशी वैयक्तिक माहिती शेअर करू नये, लोकेशन शेअर करताना घ्यावयाची काळजी, अनोळखी कॉल व संदेशांपासून सावध राहणे तसेच ऑनलाइन स्कॅमपासून बचाव यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी सत्रामध्ये उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न विचारून सायबर सुरक्षेबाबत आपली उत्सुकता व्यक्त केली. या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये सायबर स्मार्ट बना, सुरक्षित रहा ही जाणीव निर्माण करणे हा होता.

या जनजागृती सत्रामुळे ५०० हून अधिक विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत उपाययोजनांची माहिती मिळाली. शालेय विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल सुरक्षिततेची जाणीव निर्माण करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

# मोळवण येथे १६ किलो ८५० ग्रॅम गांजाची झाडे जप्त

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ सप्टेंबर : अहमदपूर तालुक्यातील मौजे मोळवण येथे एका शेतात गांजाची झाडे लागवड केल्याचा प्रकार नांदेड येथील अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सच्या कारवाईत उघडकीस आला आहे. या कारवाईत तब्बल १६ किलो ८५० ग्रॅम वजनाची गांजाची झाडे जप्त करण्यात आली असून, जप्त केलेल्या गांजाची अंदाजे किंमत ८ लाख रुपये असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, दि. ३ सप्टेंबर रोजी नांदेड येथील अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सला मोळवण येथील एका शेतात गांजाची लागवड करण्यात आल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानंतर पथकाने माहितीची खातरजमा करून शेत गट क्रमांक २५६ येथे कारवाई केली. या ठिकाणी गांजाची झाडे लागवड केलेली आढळून आल्याने पथकाने पंचनामा करून गांजाची झाडे जप्त केली आहेत.

ही कारवाई नांदेड अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सचे डीवायएसपी अनिल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पथकातील एपीआय कोरटंलु, पीएसआय पवार, एएसआय जेकेवाड, तानाजी येळगे, सुजित बेंबडे, गणेश जाधव व मुजीफ शेख यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

या प्रकरणी राजेश्र्वर वाल्मीकराव कांदे, पोलीस हवालदार, नांदेड यांच्या फिर्यादीवरून संबंधित शेतमालक रामकिशन शेषेराव दहिफळे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती आहे.

मोळवणसारख्या ग्रामीण भागातील शेतात मोठ्या प्रमाणात गांजाची लागवड होत असताना स्थानिक किनगाव पोलिसांना याची माहिती का मिळाली नाही? असा प्रश्न आता नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. विशेष म्हणजे, नांदेड येथील पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. त्यामुळे स्थानिक पोलिसांच्या गुप्तवार्ता यंत्रणेची कार्यक्षमता आणि ग्रामीण भागातील अवैध धंद्यांवर असलेले लक्ष याबाबतही चर्चा सुरू झाली आहे.तसेच गुप्तवार्ता देणाऱ्या नागरिकाचा किनगाव पोलिसांवर विश्र्वास नाही का...? असा हि प्रश्न येथील सुजान नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

किनगाव पोलीस ठाण्याचे नव्याने रुजू झालेले सहाय्यक पोलीस निरीक्षक संकेत दिघे यांच्यासमोर अवैध धंद्यांना आळा घालण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. परिसरात अमली पदार्थांची विक्री, वाहतूक अथवा लागवड यासारख्या प्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी स्थानिक पातळीवर अधिक प्रभावी गुप्तवार्ता यंत्रणा सक्रिय करण्याची गरज असल्याची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

दरम्यान, मोळवण येथील या कारवाईमुळे अहमदपूर तालुक्यातील ग्रामीण भागात गांजाची लागवड किंवा अमली पदार्थांचे जाळे कितपत विस्तारले आहे, याबाबतही आता पोलिसांनी सखोल तपास करावा, अशी मागणी होत आहे.

## माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचा गौरव सोहळा

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. ४ सप्टेंबर : लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना साखर कारखान्यांच्या माध्यमातून उसाला उच्चांकी दर मिळवून देत शेतकरी वर्गाची आर्थिक उन्नती साधण्यासाठी योगदान दिल्याबद्दल सहकारमहर्षी तथा माजी मंत्री दिलीपरावजी देशमुख यांच्या गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी 'गौरव सोहळा व ग्रंथ प्रकाशन सोहळा' संपन्न होणार आहे.

हा कार्यक्रम सोमवार, दि. ७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता, शिरूर अनंतपाळ येथील मोरया लॉन्स, कुमारस्वामी नगर येथे आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहकार मंत्री मा. ना. श्री. बाबासाहेबजी पाटील राहणार आहेत. तर प्रमुख पाहुणे म्हणून लातूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. शिवाजीराव काळगे तसेच ग्रंथ रसिक संमेलनाध्यक्ष, ज्येष्ठ विचारवंत व शिक्षणतज्ज्ञ प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार उपस्थित राहणार आहेत. या गौरव सोहळ्याचे आयोजक या नात्याने यावेळी एल. बी. आवळे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रंथ रसिक स्वागताध्यक्ष म्हणून, डॉ. राजकुमार बोपलकर सचिव म्हणून तसेच डॉ. जयदत्त जाधव संपादक म्हणून उपस्थित राहणार आहेत.

## चाकूचा धाक दाखवून लुटणारा आंतरराज्यीय गुन्हेगार अटक




तभा वृत्तसेवा

चाकूर दि. ४ सप्टेंबर : चाकूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका महिलेस चाकूचा धाक दाखवून तिच्या अंगावरील सोन्याचे दागिने जबरदस्तीने चोरून नेल्याच्या गंभीर गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखा, लातूरच्या पथकाने छडा लावला आहे. या कारवाईत दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, त्यापैकी एक आरोपी हा महाराष्ट्र, राजस्थान व गुजरात राज्यांमध्ये अनेक गंभीर गुन्हे दाखल असलेला सराईत आंतरराज्यीय गुन्हेगार असल्याचे निष्पन्न झाले आहे. या कारवाईत चोरीतील सोन्याचे दागिने, गुन्ह्यात वापरण्यात आलेला धारदार चाकू तसेच गुन्हा करून पसार होण्यासाठी वापरण्यात आलेली दुचाकी, असा एकूण २ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी चाकूर पोलिस ठाणे येथे गुरनं. ४६९/२०२६, कलम ३०९ (४), ३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये जबरी चोरीचा गुन्हा दाखल आहे. दि. ३ सप्टेंबर २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास नवीन रेणापूर नाका, लातूर येथील आप्पा पान शॉपसमोर दोन इसम होंडा शाईन दुचाकीसह संशयास्पदरीत्या थांबले असल्याची माहिती मिळाली असता स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने संबंधित ठिकाणी सापळा रचला असता दुपारी सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास संशयित दोन इसम पोलिसांना मिळून आले.यावेळी ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींमध्ये राहूल बादल बंजारा ऊर्फ पंडितसिंग धरमसिंग जुन्नी, वय ५३ वर्षे, रा. इंदिरा कॉलनी, भादरलाऊ, जि. पाली, राजस्थान, ह.मु. शिवाजी चौक, परळी वैजनाथ, जि. बीड. बच्चनसिंग मंगलसिंग बावरी, वय ४५ वर्षे, रा. नागसेन नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. यांना ताब्यात घेण्यात आले. आरोपी राहुल बादल बंजारा ऊर्फ पंडितसिंग याच्या कमरेला काळ्या रंगाच्या कव्हरमध्ये ठेवलेला धारदार लोखंडी चाकू तसेच त्याच्या ताब्यात चोरीतील सोन्याचे दागिने मिळून आले. या प्रकरणी अधिक चौकशी केली असता आरोपींनी त्यांचा साथीदार जगजितसिंग अचोलसिंग दुधानी, रा. शिवाजी चौक, परळी, जि. बीड याच्या मदतीने चाकूर येथे एका महिलेस चाकूचा धाक दाखवून तिच्या अंगावरील सोन्याचे दागिने जबरदस्तीने चोरून घेतल्याची माहिती दिली. आरोपींकडून २७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने धारदार लोखंडी चाकू, होंडा कंपनीची शाईन दुचाकी क्रमांक एम.एच-२६-ए.वाय-४३४९ असा एकूण २ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या कारवाईतील मुख्य आरोपी राहूल बादल बंजारा ऊर्फ पंडितसिंग धरमसिंग जुन्नी याच्या गुन्हेगारी पार्श्र्वभूमीची माहिती घेण्यात आली असता त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र, राजस्थान व गुजरात राज्यांतील विविध पोलीस ठाण्यांमध्ये अनेक गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे. या आरोपीविरुद्ध महाराष्ट्र ६८, राजस्थान ११, गुजरात २०, कर्नाटक ०२ असे मिळून जवळपास एकशे एक गुन्हे दाखल असून राजस्थानमधील पाली, अजमेर आदी जिह्यांतील विविध पोलिस ठाण्यांमध्ये त्याच्याविरुद्ध अनेक गुन्ह्यांची नोंद आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील बीड, परळी, नांदेड, परभणी, उदगीर व इतर भागांतील पोलीस ठाण्यांमध्येही त्याच्याविरुद्ध अनेक गंभीर स्वरूपाचे गुन्हे केल्याची शक्यता नाकारता येत नाही. ही कारवाई पोलिस अधीक्षक अमोल तांबे व अपर पोलिस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील सहायक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने, पोलीस उपनिरीक्षक राजेश घाडगे, संजय कांबळे, सूर्यकांत कलमे, तुराब पठाण, विनोद चलवाड, रामलिंग शिंदे, राजेश कंचे, पाराजी पुठ्ठेवाड, तुळशीराम बरुरे, गोविंद अंगद येलमटे, प्रेमदास राठोड, मनोज खोसे, आनंद हल्लाळे, हरी पतंगे, श्रीनिवास जांभळे यांनी केली आहे.

## 'व्हीडीएफ'मध्ये 'एआय'च्या नव्या पर्वाची सुरुवात

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ सप्टेंबर : विलासराव देशमुख फाउंडेशन ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशन्स, लातूर येथे प्रशिक्षण व प्लेसमेंट सेलच्या वतीने 'कृत्रिम बुद्धिमत्ता : शिक्षण आणि उद्योग सहकार्याचे नवे युग' या विषयावर सेमिनार तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता सेंटर ऑफ एक्सलन्सच्या उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमास स्किलसमेट्रिक्स, पुणेचे प्रादेशिक व्यवस्थापक प्रमुख शशिकांत म्हरासळे, क्षेत्रीय व्यवस्थापक कृष्णा जायभाये आणि प्रशासकीय अधिकारी नितीन कुंडले यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. महेश शिंदे, प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिष्ठाता डॉ. संदीप काकडे, विभागप्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. सेमिनारमध्ये विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेतील आधुनिक तंत्रज्ञान, उद्योगातील वाढता वापर, रोजगाराच्या संधी आणि आवश्यक कौशल्ये याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सैद्धांतिक ज्ञानासोबत प्रशिक्षण, प्रकल्प, इंटर्नशिप आणि कौशल्यविकासावर भर द्यावा, असे आवाहन करण्यात आले.

नव्याने सुरू करण्यात आलेले कृत्रिम बुद्धिमत्ता सेंटर ऑफ एक्सलन्स विद्यार्थ्यांसाठी प्रत्यक्ष प्रशिक्षण, नवोपक्रम, प्रकल्पाधारित शिक्षण कौशल्यविकासाचे व्यासपीठ ठरणार आहे. आणि उद्योगाभिमुख महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे.

## गणेशोत्सोव ध्वनीप्रदूषणमुक्त अन् सीसीटीव्ही युक्त पार पडणार

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ सप्टेंबर : गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवून उत्सव शांततेत, सुरक्षित व आनंदात तर पार पडणारच पण ध्वनी प्रदूषणमुक्त व सीसीटीव्ही युक्त असणार यावर पोलीस प्रशासनाचा भर राहणार आहे. श्री गणेशोत्सव २०२६ च्या अनुषंगाने लातूर शहर पोलीस व गणेश मंडळांचे पदाधिकारी यांची बैठक पार पडली. यामध्ये हा निर्णय घेण्यात आला.



गणेशोत्सवामध्ये कर्कश आवाजात डीजे, स्पीकर अथवा ध्वनीवर्धक यंत्रणेचा वापर करू नये. ध्वनीप्रदूषणासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालय, शासन व संबंधित प्राधिकरणांनी निश्र्चित केलेल्या नियमांचे काटेकोरपणे आवश्यक पालन करावे. ध्वनीक्षेपक वापरण्यासाठी परवानगी घेऊन निर्धारित वेळेत व निर्धारित ध्वनीमर्यादितच त्याचा वापर करावा. ध्वनीप्रदूषणामुळे ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, विद्यार्थी, रुग्ण तसेच नागरिकांना त्रास होणार नाही, याची गणेश मंडळांनी विशेष दक्षता घेण्याच्या सूचना करण्यात आल्या.

यावेळी बैठकीस उपविभागीय पोलीस अधिकारी समरसिंह साळवे, पोलीस निरीक्षक सुनील रेजितवाड, समाधान चवरे, संतोष पाटील तसेच गणेश मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीमध्ये गणेश मंडळाच्या अध्यक्षांनीही सूचना केल्या.

# मांजरा प्रकल्पाच्या पाण्याची आयुक्तांकडून पाहणी

## अमृत योजनेतील जॅकवेलचे काम तत्काळ करण्याच्या सूचना



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ सप्टेंबर : महापालिका आयुक्त राहुल कुलकर्णी यांनी मांजरा धरणावर जाऊन पाण्याची पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रकल्पात सुरू असलेल्या अमृत - २.० अंतर्गत लातूर वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या जॅकवेलच्या कामास भेट दिली.

केंद्रशासन परस्कृत २५९ कोटी रुपयांच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेअंतर्गत मांजरा धरणात नवीन जॅकवेल तसेच जॅकवेल ते हरंगुळ येथील जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत १ हजार २०० मिमी व्यासाच्या सुमारे ५० किमी लांबीच्या पाईपलाईनचे काम प्रगतीपथावर आहे. यावर्षी आतापर्यंत अत्यल्प पाऊस झाल्याने मांजरा धरणात नव्याने पाणी दाखल झाले नाही. प्रकल्पात ७० फूट खोलीचे जॅकवेलचे काम सुरू आहे. आयुक्तांनी जॅकवेलचे काम गतीने पूर्ण करण्याच्या सूचना ठेकेदाराला दिल्या. यावर्षी जॅकवेल पूर्ण केल्यास येत्या काळात टंचाई उद्भवल्यास त्याद्वारे अस्तित्वातील पाईपलाईन वापरून शहरास टंचाई कालावधीत पाणीपुरवठा करता येऊ शकेल काय, याचीही पडताळणी त्यांनी केली. कामाच्या गतीसोबतच गुणवत्ताही कायम राखण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

यावेळी आयुक्त कुलकर्णी यांनी हरंगुळ येथील जलशुद्धीकरण केंद्राचीही पाहणी केली. तेथील जलशुद्धीकरण प्रक्रियेची माहिती कार्यकारी अभियंता मंठाळे यांनी दिली. यावेळी शहरातील नागरिकांना शुद्ध व सुरक्षित पाणीपुरवठा सुरळीतपणे मिळावा, यासाठी आवश्यक ती काळजी घेण्याच्या सूचना आयुक्तांनी केल्या.

यावेळी अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, कार्यकारी अभियंता शिवसागर मंठाळे, प्रकल्प व्यवस्थापक विजय चोळखणे, तांत्रिक सल्लागार इंगळे, सिद्राम हारके उपस्थित होते.

## बाजार समितीच्या वतीने त्रिधारा येथे अन्नधान्य पाठवले

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ सप्टेंबर :सामाजिक बांधिलकी म्हणून प्रति वर्षा प्रमाणे याही वर्षी बाजार समिती मार्फत श्रीक्षेत्र त्रिधारा, बीड येथे वाहनाद्वारे अन्नधान्य पाठविण्यात आले. त्या वाहनाची पूजा श्रीफळ वाढवून करण्यात आली.

यावेळी बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, संचालक आंनद पवार, सुभाष घोडके, बालाप्रसाद बिदादा, प्रा. डॉ. बालाजी वाघमारे, पवन देशमुख, बळवंत पाटील, शिवाजी कांबळे, आडत असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील, पदाधीकारी दिनकर मोरे, लक्ष्मी अर्बन बँकचे चेअरमन तथा व्यापारी अशोक अग्रवाल, बाजार समितीचे प्रभारी सचिव अरविंद पाटील, सहाय्यक सचिव सतीश भोसले, निरीक्षक दिपक पाटील, बाजार समितीचे कर्मचारी विनोद नखाते, राम शिंदे, व इतर कर्मचारी वृंद उपस्थित होते.

## गोंद्री येथे सायबर सुरक्षा जनजागृती सत्र

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ सप्टेंबर : श्री साईबाबा शुगर लिमिटेड, गोंद्री येथे सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्रात सायबर वॉरियर योगिता जाधव आणि सायबर वॉरियर प्राजक्ता बोरुळे यांनी उपस्थितांना सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी महत्त्वपूर्ण माहिती दिली.

दैनंदिन जीवनात मोबाईल, इंटरनेट आणि डिजिटल व्यवहारांचा वाढता वापर लक्षात घेता सायबर फसवणुकीपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विशेषतः आपली लोकेशन अनोळखी व्यक्तींसोबत किंवा सोशल मीडियावर शेअर करू नये, याबाबत उपस्थितांना जागरूक करण्यात आले.

तसेच संशयास्पद लिंक कशा ओळखाव्यात, अनोळखी लिंकवर क्लिक करण्यापूर्वी कोणती काळजी घ्यावी, याची माहिती देण्यात आली. बँकेच्या नावाने येणारे अनोळखी किंवा संशयास्पद कॉल, संदेश आणि ऑफर्स यापासून सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले. कोणत्याही अनोळखी व्यक्तीला जढ्ढ, झखछ, उतत, पासवर्ड किंवा बँक खात्याशी संबंधित गोपनीय माहिती देऊ नये, असेही स्पष्ट करण्यात आले.

सायबर फसवणुकीचे विविध प्रकार, त्यांची कार्यपद्धती आणि अशा घटनांपासून बचाव करण्याच्या उपाययोजनांवरही सत्रामध्ये मार्गदर्शन करण्यात आले. संशयास्पद व्यवहार किंवा सायबर फसवणूक झाल्यास तातडीने संबंधित यंत्रणेकडे तक्रार करण्याचे महत्त्वही सांगण्यात आले. भारतातील राष्ट्रीय सायबर गुन्हे हेल्पलाइन १९३० असून, सायबर गुन्ह्यांची तक्रार राष्ट्रीय सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टलवर करता येते. या जनजागृतीपर सत्रामुळे उपस्थितांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण झाली असून, सावध रहा, सुरक्षित रहा आणि सायबर गुन्ह्यांना प्रतिबंध करा असा संदेश देण्यात आला.

## संक्षिप्त...

## LIC च्या वर्धापन दिनानिमित्ताने रक्तदान शिबिर संपन्न



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. ४ सप्टेंबर : भारतीय जीवन बीमा निगम च्या ७० व्या वर्धापनदिनानिमिताने निलंगा येथील शाखा कार्यालयात दिनांक १ सप्टेंबर रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला डखउ च्या विमेदर कर्मचारी,अधिकारी,विमा प्रतिनिधी प्रतिसाद दिला. हा रक्तदान कार्यक्रम शहरातील बीदर रस्त्यावरील धूत कॉम्प्लेक्स येथील शाखा कार्यालयात संपन्न झालारक्तदान हेच श्रेष्ठ दान हा संदेश डोळ्यासमोर ठेवून अनेक रक्तदात्यांनी स्वयंस्फूर्तीने पुढे येत रक्तदान केले. या मोहिमेद्वारे गोळा झालेले रक्त भालचंद्र ब्लॉड बँक ,लातूर यांनी संकलन केले असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या रक्तदान शिबिरात शाखाधिकारी अनंत जोशी,शाखेतील सर्व विकास अधिकारी,विमा प्रतिनिधी ,विमाधारक, अधिकारी,कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी होते..

## कृषी विभागाची मोफत 'डिजिटल शेतीशाळा'

तभा वृत्तसेवा

लातूर,दि. ४ सप्टेंबर : बदलत्या हवामानात शाश्र्वत शेतीचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करण्याच्या उद्देशाने कृषी विभाग, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) आणि पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत 'डिजिटल शेतीशाळा' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबवला जात आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी, महिला शेतकरी गट आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांनी (ऋझउी) यात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन लातूरच्या विभागीय कृषी सहसंचालकांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

# प्रभागात स्वच्छेतेसाठी ९०० कर्मचारी करणार हमला

तभा वृत्तसेवा /प्रमोद सुरवसे

लातूर दि .४ सप्टेंबर : शहरात स्वच्छता करण्यासाठी मनपाच्या कर्मचाऱ्या च्या वतीने एकावेळी एकाच प्रभागात जाऊन स्वच्छता मोहीम राबविण्यात येत असून या मोहिमेमुळे शहराची स्वच्छता जलदगतीने होण्यास मदत होणार आहे






हमला या मोहिमेचा शुभारंभ मंगळवारी प्रभाग एक आणि दोन मध्ये करण्यात आला .

नियमित स्वच्छे तेअभावी शहराच्या विविध प्रभागात घाणीचे साम्राज्य पसरले असून गटारीचा उपसा लवकर होत होत नसल्यामुळे त्या गटारी तुंबल्या आहेत . त्यातून डासांची संख्या झापाट्याने डेंगू अशा आजानांना जणू हे निमंत्रण आहे . तसेच या ठिकाणी गवत वाढल्याने पण डासांची संख्या वाढण्यात मदतच होत असल्याचे चित्र असल्यामुळे याचा नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे . तसेच प्रभागात घाणी मुळे परिसरात दुर्गंधीही पसरली आहे .

नागरिकांच्या आरोग्याच्या तक्रारी वाढत असल्यामुळे मनपा प्रशासनानी हमला काढून त्याची अंमलबजावणी सुरु केली आहे .

मनपातील९०० स्वच्छता कर्मचारी एकाचवेळी एका प्रभागात जावून हमला मोहीम राबवित असून त्या प्रभागात स्वच्छता करत असून यात गटारीची स्वच्छता, रस्त्यांच्या कडेला असलेले गवत काढून टाकणे, रिकाम्या प्लॉट मध्ये साचलेला कचराही उचलून स्वच्छता करण्यात येत आहे . तसेच नागरिकांनी आपला कचरा कोठेही न टाकता तो घंटागाडीतच टाकून सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येत आहे .

शहरातील विविध प्रभागात अपार्टमेंट मध्ये राहणारे नागरिक मतले उतरून खाली येण्यास कंटाळा करतात . रात्री दुचाकीवरून हा कचरा रिकाम्या प्लॉटमध्ये किंवा रस्त्यांवर टाळतात . त्यामुळे त्या परिसरात घाणीचे साम्राज्य निर्माण होऊन त्याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असतो . त्यामुळे हमला मोहिमेत काम करणारे कामगार अशांवर कारवाई करणार असल्यामुळे यापुढे या नागरिकांनी आपला कचरा घंटागाडीत च टाकून आपल्यावर होणारी कारवाई टाळावी असे आवाहन मनपा प्रशासना तर्फे करण्यात आले आहे

## मंत्रालयातील शालेय शिक्षण विभागात 'अक्षरवाटा'ची दखल

### लाल बहादूरच्या बाल लेखकांचे सांस्कृतिक धोरण समितीकडून विशेष कौतुक

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ४ सप्टेंबर : विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला आणि सृजनशील लेखनाला हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या 'अक्षरवाटा एक नवी सुरुवात' या अभिनव उपक्रमाची मंत्रालय, मुंबई येथील शालेय शिक्षण विभागात विशेष दखल घेण्यात आली. मंत्रालयात पार पडलेल्या सांस्कृतिक धोरण समितीच्या बैठकीत लाल बहादूर शास्त्री विद्यालय, उदगीर येथील विद्यार्थ्यांच्या लेखणीतून साकारलेल्या या पुस्तकाची माहिती सादर करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला पुस्तकाच्या माध्यमातून अभिव्यक्ती देणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी विशेष कौतुक केले.



लाल बहादूर शास्त्री विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पना, अनुभव, भावना आणि विचार लेखणीच्या माध्यमातून विविध साहित्यप्रकारांत व्यक्त केले आहेत. या सृजनशील लेखनाचे संकलन व संपादन करून 'अक्षरवाटा एक नवी सुरुवात' हे पुस्तक साकारण्यात आले आहे. जळगाव येथील अथर्व पब्लिकेशनने प्रकाशित केलेल्या या पुस्तकाचे संपादन विद्यालयाच्या सहशिक्षिका तथा सांस्कृतिक धोरण समितीच्या सदस्या अनिता येलमटे यांनी केले आहे.

मंत्रालयातील शालेय शिक्षण विभागात आयोजित सांस्कृतिक धोरण समितीच्या बैठकीस समिती सदस्य म्हणून उपस्थित असलेल्या अनिता येलमटे यांनी पुस्तकामागील संकल्पना, विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग तसेच या उपक्रमाचा शैक्षणिक उद्देश याबाबत माहिती दिली. विद्यार्थ्यांना आपल्या मनातील विचार शब्दबद्ध करण्याची संधी मिळावी आणि त्यांच्या लेखनाला व्यापक व्यासपीठ प्राप्त व्हावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

## कोळगाव ग्रामसभेत २६५ घरकुल लाभार्थ्यांच्या यादीचे वाचन

तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. ४ सप्टेंबर : तालुक्यातील कोळगाव ग्रामपंचायतीची विशेष ग्रामसभा रविवार, दि. ३० ऑगस्ट रोजी सरपंच चंद्रकांत मस्के यांच्या अध्यक्षतेखाली शांततेत व उत्स्फूर्त वातावरणात पार पडली. ग्रामसभेत घरकुल योजनेअंतर्गत पात्र ठरलेल्या तब्बल २६५ लाभार्थ्यांच्या यादीचे वाचन करण्यात आले. मोठ्या संख्येने पात्र लाभार्थी निश्र्चित झाल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण होते.

घरकुल योजनेसाठी विशेष प्रयत्न केल्याबद्दल रेणापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती ॲड. शेषराव हाके पाटील व सरपंच चंद्रकांत मस्के यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी माणिक कोपणर यांची

तंटामुक्ती सदस्य म्हणून निवड करण्यात आली. यादीत नाव समाविष्ट न झालेल्या गरजू नागरिकांकडूनही अर्ज मागविण्यात आले. पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक

कार्यवाही करण्याचे आश्र्वासन देण्यात आले. ग्रामसभेस सोसायटीचे चेअरमन पंडित ठोंबरे, पोलीस पाटील महादेव पाटील यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अहमदपूरात गणेशोत्सव शांतता समितीची बैठक उत्साहात

## माझे मंडळ, माझी जबाबदारी' म्हणून गणेशोत्सव शांततेत साजरा करा : अरविंद रायबोले

तभा वृत्तसेवा

अहमदपूर : लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक एकोपा, जनजागृती आणि समाजप्रबोधनाची मुहूर्तमेढ रोवली. याच विधायक उद्देशाने अहमदपूर शहरातील गणेश मंडळांनी गणेशोत्सव साजरा करावा. उत्सवाच्या काळात कायदा व सुव्यवस्था राखण्याबरोबरच 'माझे मंडळ, माझी जबाबदारी' हा उपक्रम राबवून डीजेमुक्त मिरवणूक, सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मतेला प्राधान्य द्यावे, असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले यांनी केले.

लातूर जिल्हा पोलीस दल व प्रशासनाच्या वतीने उपविभागीय अधिकारी यांच्या सभागृहात आयोजित गणेशोत्सव शांतता समितीच्या बैठकीत प्रमुख मार्गदर्शक म्हणून अरविंद रायबोले बोलत होते.

अरविंद रायबोले म्हणाले की, गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता समाजाला एकत्र आणणारा आणि सामाजिक प्रबोधन करणारा उत्सव व्हावा. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना एका व्यासपीठावर आणले. त्याच परंपरेचा वारसा पुढे नेत अहमदपूरातील गणेश मंडळांनी सामाजिक बांधिलकी जपावी. प्रत्येक मंडळाने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रशासन व पोलीस दलाला सहकार्य करावे. डीजेचा अतिरेक टाळून शांततापूर्ण आणि शिस्तबद्ध मिरवणुका काढाव्यात.

ईद-ए-मिलादुन्नबीच्या निमित्ताने शहरात मुस्लिम संघटनांच्या वतीने मोटारसायकल रॅली काढण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र, उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले यांच्या समन्वयातून शांतता, सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मतेला प्राधान्य देत ही रॅली रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयाबद्दल सोहेल कुरेशी व खलील कुरेशी यांचा उल्लेख करण्यात आला.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार उज्वलाताई पांगरकर होत्या. व्यासपीठावर पोलीस निरीक्षक विनोद मेत्रेवार, गटविकास अधिकारी पंकज शेळके, महावितरणचे मुख्य अभियंता दिनेश पाटील, नगर परिषदेचे कार्यालयीन अधीक्षक अशोक स्वामी, उपनगराध्यक्ष अय्याज शेख, नगरसेवक ड. किशोर कोरे, नगरसेवक ड. निखिल कासनाळे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

यावेळी गणेश मंडळांच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते रमाकांत अरुणुरे, संतोष मजगे, मुकेश पाटील, उत्तम वाघमारे, मुजफ्फर देशमुख, गणेश कोदळे, मनोहर पाटील, ड. किशोर कोरे, ड. निखिल कासनाळे, बालासाहेब आगलावे तसेच मुख्य अभियंता दिनेश पाटील यांनी मनोगत व्यक्त करून विविध सूचना मांडल्या. सेवानिवृत्तीबद्दल पत्रकार राम तत्तापूरे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास कार्यकारी नगरसेवक डॉक्टर सिद्धार्थ कुमार सूर्यवंशी, एपीआय संतोष केदासे, धर्मराज चावरे, संतोष निटुरे, गौरव भुसारे, साईनाथ पाटील, एपीआय श्रीनिवास राठोड, पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष संग्राम बरूरे, पोलीस पाटील उषाताई पवार, विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी, पोलीस पाटील, गणेश भक्त आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपनगराध्यक्ष अय्याज शेख यांनी केले. सूत्रसंचालन राम तत्तापूरे यांनी केले, तर आभार सुकेश केंद्रे यांनी मानले. अध्यक्षीय समारोप तहसीलदार उज्वलाताई पांगरकर यांच्या मार्गदर्शनपर भाषणाने झाला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अहमदपूर पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये 'डिजिटल सेफ्टी कॅम्प' संपन्न

## सायबर सुरक्षेबाबत विद्यार्थ्यांना बहुमूल्य मार्गदर्शन




तभा वृत्तसेवा

निलंगा दि. ४ सप्टेंबर : आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात इंटरनेट आणि सोशल मीडियाचा वापर झपाट्याने वाढत असतानाच, सायबर गुन्हेगारी आणि ऑनलाइन फसवणुकीचे प्रमाणही चिंताजनकरीत्या वाढत आहे. या पार्श्र्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये ऑनलाइन सुरक्षिततेबाबत व्यापक जनजागृती निर्माण करण्यासाठी निलंगा येथील महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसी येथे 'डिजिटल सेफ्टी कॅम्प' (उ‌ळसळींरश्र ड्रषशीं उराा) चे अत्यंत यशस्वी आयोजन करण्यात आले. हा महत्त्वाचा उपक्रम क्विक हील फाऊंडेशन, पुणे यांच्या विशेष सहकार्याने आयोजित करण्यात आला होता. या शिबिरासाठी प्रमुख वक्ते म्हणून लातूर येथील राजर्षी शाहू कॉलेजच्या विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष जाधव साहिल उपस्थित होते. त्यांच्यासोबतच विद्यार्थी परिषदेचे सचिव यश मेंढेकर आणि सह-सचिव हर्ष कारंडे यांची देखील प्रमुख उपस्थिती होती. मुख्य वक्ते श्री. जाधव साहिल यांनी आपल्या अभ्यासपूर्ण मार्गदर्शनात विद्यार्थ्यांना सध्या घडणाऱ्या सायबर फसवणुकीचे प्रकार, फिशिंग लिंक्स, आणि सोशल मीडिया अकाउंट्स सुरक्षित ठेवण्याच्या तांत्रिक पद्धती सोप्या भाषेत समजावून सांगितल्या. ते म्हणाले, डिजिटल जगात वावरताना प्रत्येक युझरने सावध राहणे गरजेचे आहे. कोणत्याही अनोळखी लिंकवर क्लिक करण्यापूर्वी विचार करा. तर सचिव यश मेंढेकर आणि सह-सचिव हर्ष कारंडे यांनी तरुण पिढीने तंत्रज्ञानाचा वापर जबाबदारीने कसा करावा, यावर आपले विचार मांडले आणि इश ‍ुरीश । इश ड्शलीश । इश ड्रषश जपश्रळपश या त्रिसूत्रीचा अवलंब करण्याचे आवाहन केले. महाविद्यालयीन प्रशासनाच्या पुढाकाराणे संपूर्ण कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य तथा मुख्य समन्वयक डॉ. एस. एस. पाटील यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली आणि प्रेरणेने पार पडला. आजच्या काळाची गरज ओळखून विद्यार्थ्यांनी अशा तांत्रिक कार्यशाळांमध्ये सक्रिय सहभाग घेतला पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. प्रा. नंदा भालके यांनी सूत्र संचालन आणि उपस्थितांचे आभार मानले. तसेच कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी कार्यक्रम समन्वयक प्रा. नंदा भालके आणि आणि प्रा. एस. व्ही. पौळकर यांनी कार्य केले. महाविद्यालयाच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये आयोजित या शिबिराला बहुसंख्येने विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी एक सुरक्षित डिजिटल भविष्य घडवण्यासाठी आणि क्लिक करण्यापूर्वी विचार करून स्वतःचे व इतरांचे सायबर गुन्ह्यांपासून रक्षण करण्यासाठी सामूहिक संकल्प केला.

## बोरोळ प्रशालयाच्या शालेय समितीच्या अध्यक्षपदी सपकाळे तर उपाध्यक्ष पदी मुळखेडे

तभा वृत्तसेवा

देवणी दि. ४ सप्टेंबर : दिनांक ०१ सप्टेंबर २०२६ रोजी शाळा व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात आले. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांच्या पालकांच्या उपस्थितीत पालक सभा घेऊन सर्वानुमते अध्यक्ष म्हणून प्रशांत राजाराम सपकाळे तर उपाध्यक्ष म्हणून सौ काशीबाई ज्ञानोबा मुळखेडे यांची निवड करण्यात आली. सर्वानुमते सर्व सदस्य बिनविरोध निवडण्यात आले ही सभा अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक महेश तांदळे व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते या समितीमध्ये शिक्षक प्रतिनिधी म्हणून यादवराव मोहनराव बालूरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. शालेय समितीचे सदस्य म्हणून संतोष पंढरपुरे, श्रीकांत शेंडगे, दिपाली शेंडगे, मोहीनी भोसले, शाहु कासराळे, विजयकुमार धनाडे, सावित्रा मोहिते, शितल सुर्यवंशी, अजय मुळखेडे, अस्लम मणियार यांची निवड करण्यात आली.




यावेळी गावातील तंटामुक्ती अध्यक्ष काशिनाथ शेंडगे, उपाध्यक्ष माधव बालुरे, बीट अमलदार लामतुरे सर, पत्रकार प्रताप कोयले, ग्राम पंचायत सदस्य पंढरीनाथ खुळे, दयानंद चाफे, सामाजिक कार्यकर्ते निवृत्ती सुर्यवंशी, युवा उद्योजक दत्ता हुरुचनाळे सह अदिंची उपस्थिती होती. सुत्रसंचालन सुर्यवंशी सर यांनी केले तर आभार अलमाले सर यांनी केले.

### शाळा व्यवस्थापन समिती पुनर्गठीत अध्यक्षपदी सुरवसे, उपाध्यक्षपदी पद्मिनीताई शिंदे यांची सर्वानुमते निवड



तभा. वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. ३ सप्टेंबर : वांजरखेड शाळेच्या भौतिक व शैक्षणिक विकासाला चालना देण्यासाठी शासनाच्या निर्देशानुसार जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वांजरखेडा ता. अनंतपाळ येथे शाळा व्यवस्थापन समितीची पुनर्गठना करण्यात आली. यानिमित्त पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते.

शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष सतीश सुरवसे तसेच गावातील ज्येष्ठ नागरिक नसीर अहमद शेख यांच्या उपस्थितीत अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात समितीची पुनर्गठना करण्यात आली. यावेळी अध्यक्षपदी दिनकर सुभाषराव सुरवसे तर उपाध्यक्षपदी पद्मिनीताई सुधाकर शिंदे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

समितीमध्ये विजयाताई सुरवसे, शाहू सुरवसे, कल्पनाताई जाधव, सुजाता सूर्यवंशी, जीवन सुरवसे, सरोजा जाधव, दिपाली सुरवसे, उमाकांत सुरवसे व जनाबाई वाघ यांची पालक प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली. शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी समितीच्या माध्यमातून सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. शाळेच्या हितासाठी आम्ही सर्वजण कटिबद्ध राहून काम करू, असे आश्र्वासन नवनिर्वाचित समितीच्या वतीने पालकांना देण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्र्वर गवरे सर, महेश बिरादार, सचिन डेंगळे यांच्यासह सर्व पालक उपस्थित होते.

## विमुक्त जाती-भटक्या जमाती जनजागृतीपर शालेय उपक्रम उत्साहात



तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. ४ सप्टेंबर : प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा, रूपचंद नगर, रेणापूर येथे विमुक्त जाती-भटक्या जमाती समाजाच्या इतिहास, संस्कृती, परंपरा व सामाजिक परिस्थितीबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी विशेष शालेय उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांना विमुक्त जाती-भटक्या जमातींच्या सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी शासनाच्या विविध योजना, शिक्षणाचे महत्त्व, सामाजिक समानता, बंधुभाव व संविधानिक अधिकार याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी विमुक्त जाती-भटक्या जमातींचा इतिहास, त्यांच्या समस्या तसेच शिक्षणामुळे होणारा सामाजिक विकास याबाबत आपले विचार मांडले. विविध घोषवाक्ये, भाषणे व जनजागृतीपर उपक्रमातून विद्यार्थ्यांनी समाजजागृतीचा संदेश दिला.

कार्यक्रमास संस्थेच्या सचिव श्रीमती उषाताई राठोड, माध्यमिक व उच्च माध्यमिकचे प्राचार्य प्रदीप राठोड, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महसुली दावे-अपिले तडजोडीने निकाली काढण्यासाठी 'महसूल लोकअदालत अभियान'

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ सप्टेंबर -**
वर्षानुवर्षे प्रलंबित महसुली दावे व अपिलांमुळे त्रस्त शेतकरी आणि नागरिकांना वाद तडजोडीने कायमस्वरूपी मिटविण्याची संधी उपलब्ध झाली आहे. महसूल विभागातील अर्धन्यायिक प्रकरणे जलदगतीने निकाली काढण्यासाठी राज्य शासनाने 'महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान' राबविण्यास मान्यता दिली आहे. हे अभियान १ सप्टेंबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत राबविण्यात येणार आहे.

या अभियानांतर्गत मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, उपजिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांच्या स्तरावरील प्रलंबित महसुली दावे व अपिलांचा निपटारा केला जाणार आहे. ७ ऑक्टोबर आणि ९ डिसेंबर २०२६ रोजी संबंधित कार्यालयांमध्ये महसूल लोकअदालती आयोजित करण्यात येणार आहेत.

तडजोडीस इच्छुक दोन्ही पक्षकार किंवा त्यांचे वकील विहित 'प्रपत्र-अ'मध्ये संयुक्त अर्ज करू शकतील. संमतीनंतर कायदेशीर तडजोडनामा करून लोकअदालतीच्या दिवशी अंतिम आदेशाद्वारे प्रकरण निकाली काढण्यात येईल. यामुळे नागरिकांचा वेळ व पैसा वाचण्यास मदत होणार आहे.

महसुली दावे व अपिले तडजोडीने निकाली काढू इच्छिणाऱ्या नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे कार्यालयीन वेळेत त्वरित अर्ज दाखल करून अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील यांनी केले आहे.



# उजनीच्या पाण्याची तुळजापूरकरांना प्रतीक्षा?




**अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.४ सप्टेंबर -**
तुळजापूर शहराची वाढती लोकसंख्या, पावसाने दिलेला लांबलेला खंड आणि नळदुर्ग धरणातील झपाट्याने घटणारा पाणीसाठा यामुळे शहराचा पाणीप्रश्न पुन्हा गंभीर बनला आहे. तुळजापूरला पाणीपुरवठा करणाऱ्या नळदुर्ग धरणातील पाणीसाठा अवघा ९ टक्क्यांवर आला असून, उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्याची वेळ प्रशासनावर आली आहे. परिणामी शहरात आता तीन दिवसांआड पाणीपुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

ऐन शारदीय नवरात्र महोत्सवाच्या तोंडावर निर्माण झालेल्या या जलसंकटामुळे तुळजापूरकरांची चिंता वाढली आहे. सध्या नगरपालिका नळदुर्ग धरणासह पाचुंदा तलावाच्या माध्यमातून शहराचा पाणीपुरवठा करीत आहे. मात्र, नवरात्र काळात श्री तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी महाराष्ट्रासह देशभरातून लाखो भाविक तुळजापूरमध्ये दाखल होणार असल्याने पाण्याची मागणी मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. स्थानिक नागरिकांची दैनंदिन गरज भागविण्यासोबतच लाखो भाविकांसाठी पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, स्नानगृहे आणि अन्य सुविधांसाठी आवश्यक पाणी उपलब्ध करून देण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर आहे. सध्या जलसंकटासाठी परतीचा पाऊस हा मोठा आशेचा आधार ठरला आहे. दमदार पाऊस झाल्यास धरणातील पाणीसाठ्यात वाढ होऊन काही काळासाठी दिलासा मिळू शकतो. मात्र, परतीच्या पावसानेही दगा दिल्यास नवरात्रानंतर पाणीपुरवठ्याचे संकट आणखी गडद होण्याची शक्यता आहे. तीन दिवसांआड पाणीपुरवठा झाल्याने नागरिकांना घरगुती वापरासाठी पाण्याचा साठा करून ठेवावा लागत आहे. याचा विशेष फटका दैनंदिन मजुरी करणारे नागरिक, हॉटेल व्यावसायिक तसेच मोठ्या कुटुंबांना बसण्याची शक्यता आहे. नवरात्र महोत्सवात होणारी विक्रमी गर्दी लक्षात घेता प्रशासनाने आतापासूनच पाणीपुरवठ्याचे सूक्ष्म नियोजन करणे गरजेचे आहे. टँकर व्यवस्था, उपलब्ध जलसाठ्यांचे काटेकोर नियोजन, पिण्याच्या पाण्याची स्वतंत्र व्यवस्था आणि आपत्कालीन जलस्रोत सज्ज ठेवण्याची आवश्यकता आहे. नवरात्रापुरती तात्पुरती व्यवस्था करण्यापेक्षा तुळजापूरच्या कायमस्वरूपी जलसुरक्षेचा प्रश्न सोडविणे ही काळाची गरज आहे. उजनी-कृष्णा पाणी योजनेचे काम लवकर पूर्ण होऊन प्रत्यक्ष पाणी तुळजापूर परिसरात पोहोचले, तरच भविष्यातील जलसंकटावर कायमस्वरूपी तोडगा निघण्याची शक्यता आहे. नळदुर्ग धरणातील प्रत्येक घटणारा टक्का तुळजापूरकरांसाठी धोक्याची घंटा ठरत असताना आता उजनीच्या पाण्याकडे आशेने नजर लागली आहे. उजनीचे पाणी तुळजापूरपर्यंत नेमके कधी पोहोचणार आणि सध्याच्या जलसंकटात त्याचा प्रत्यक्ष दिलासा कधी मिळणार? हा प्रश्न दिवसेंदिवस अधिक गंभीर होत आहे.

### उजनीच्या पाण्याकडे आशेने नजरा !
तुळजापूरच्या पाणीप्रश्नावर दीर्घकालीन तोडगा काढण्यासाठी उजनीच्या पाण्याचा पर्याय महत्त्वाचा मानला जात आहे. त्यामुळे नळदुर्ग धरणातील साठा ९ टक्क्यांवर आल्यानंतर उजनीचे पाणी तुळजापूरपर्यंत कधी पोहोचणार, हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. उजनीच्या पाण्याची योजना पूर्णत्वाकडे जात असल्याचे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्ष पाणी तुळजापूरच्या जलसाठ्यांमध्ये कधी दाखल होणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. विशेषतः सध्याची पाणीटंचाई आणि दुष्काळसदृश परिस्थिती पाहता या कामाला अधिक गती देण्याची गरज व्यक्त होत आहे.

### नवरात्रानंतरही जलसंकटाची शक्यता...
नवरात्र महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर तुळजापूरच्या पाणीप्रश्नाची चर्चा होत असली, तरी खरी चिंता नवरात्रानंतरची आहे. परतीच्या पावसाने दमदार हजेरी लावली नाही, तर नवरात्र महोत्सव संपल्यानंतरही तीर्थक्षेत्र तुळजापूरकरांना जलसंकटाचा सामना करावा लागू शकतो. नवरात्रासाठी प्रशासनाकडून तात्पुरत्या स्वरूपात पाणीपुरवठ्याचे नियोजन केले जाईल; मात्र महोत्सव संपल्यानंतर शहराची नियमित पाणीगरज कायम राहणार आहे. वाढती पाण्याची मागणी लक्षात घेता केवळ नळदुर्ग धरणावर अवलंबून राहणे भविष्यासाठी धोकादायक ठरू शकते.

## पवित्र पोर्टल शिक्षक भरतीत साई अध्यापक महाविद्यालयाचे यश

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ सप्टेंबर -**
श्री साई जनविकास प्रतिष्ठान संचलित अध्यापक महाविद्यालय (इ.एव.), आळणी, धाराशिव येथील विद्यार्थ्यांनी पवित्र पोर्टलमार्फत झालेल्या शिक्षक भरती प्रक्रियेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाविद्यालयातील तब्बल १७ गुणवंत विद्यार्थ्यांची विविध जिल्हा परिषद, महानगरपालिका तसेच आदिवासी विकास विभागांतर्गत शिक्षक पदांसाठी निवड झाली आहे. या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

पवित्र पोर्टलच्या माध्यमातून शिक्षकपदी निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये रेश्मा गायकवाड शेलके, अनिता दत्तात्रय तांबारे, संतोष निळकंठ ढले, दरेबा बाबुराव मोटे, कृष्णा योगेश शिंगणापुरे, योगेश सुधाकर वाघमोडे, आकाश सुनील बोंदर, वैभव व्यंकट बोंदर, अस्मिता रमेश जाधव, राणाउदयदसिंग प्रमोद पवार, कुंभार रूपाली जगन्नाथ, देशमुख धनराज, ज्ञानेश्वर धनंजय भुतेकर, धोंगे मयूर नागनाथ, शुभम गिरीश जगताप, अमृता राजेश गुंजाळ आणि आदित्य राजाराम हुरे यांचा समावेश आहे.

**बी.एड.च्या १७ विद्यार्थ्यांची विविध जिल्ह्यांत शिक्षकपदी निवड**

निवड झालेल्या विद्यार्थ्यांना ठाणे महानगरपालिका, मुंबई महानगरपालिका, पुणे महानगरपालिका तसेच जिल्हा परिषद पालघर, पुणे, परभणी, रत्नागिरी, नागपूर, सातारा, अहिल्यानगर आदी ठिकाणी शिक्षक म्हणून सेवा करण्याची संधी मिळाली आहे. तसेच ठाणे आदिवासी विकास विभागांतर्गतही विद्यार्थ्यांची निवड झाल्याचे नमूद करण्यात आले आहे.

शिक्षक होण्याचे स्वप्न उराशी बाळगून बी.एड.चे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पवित्र पोर्टल ही महत्त्वपूर्ण संधी ठरली. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक निवड प्रक्रियेत यश मिळवत विविध शासकीय शैक्षणिक संस्थांमध्ये स्थान मिळविले आहे. त्यांच्या या यशातून महाविद्यालयाचे दर्जेदार शिक्षण, प्रभावी मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांची मेहनत अधोरेखित झाली आहे.

निवड झालेल्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील, संस्थेचे मार्गदर्शक करण पाटील तसेच व्ही. पी. शैक्षणिक संकुल, धाराशिव यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या भावी शैक्षणिक व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

## तुळजापुरात जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे उद्या उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ सप्टेंबर -**
तुळजापूर येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश न्यायालयाचे उद्घाटन रविवार, ६ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १२ वाजता होणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती शैलेश ब्रह्मे यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अभिश्री देव यांच्या अध्यक्षतेखाली समारंभ होईल.

या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन तुळजापूरचे जिल्हा न्यायाधीश-१ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश राजेश खोमणे आणि ॲड. जयवंत इंगळे यांनी केले आहे.

## शेतीसोबत पूरक व्यवसायांची जोड द्या : जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ सप्टेंबर -**
शेतीसोबत कुक्कुटपालन, शेळीपालन, मधुमक्षिकापालन यांसारख्या पूरक व्यवसायांची जोड दिल्यास शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊ शकते. त्यासाठी शाश्वत व सर्वसमावेशक कृषी पद्धतींचा स्वीकार करण्याबरोबरच आधुनिक तंत्रज्ञान, नवनवीन प्रयोग आणि यशस्वी शेती पद्धतींची माहिती शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. सकारात्मक व विकासाभिमुख पत्रकारितेतून शेतीतील यशकथा समाजासमोर आल्यास शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्यास मदत होईल. त्यामुळे धाराशिवसारख्या आकांक्षित जिल्ह्यांच्या विकास प्रक्रियेत माध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले.



केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयांतर्गत कार्यरत पत्र सूचना कार्यालय, मुंबई यांच्या वतीने मंगळवारी (दि.१) धाराशिव येथे पत्रकारांसाठी आयोजित 'वार्तालाप' माध्यम परिषदेत ते बोलत होते. 'आकांक्षित जिल्ह्यांसाठी शाश्वत शेतीचे सुलभीकरण' या संकल्पनेवर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे, झखइचे माहिती व संचार अधिकारी हर्षल आकुडे, माहिती सहायक एडगर कोएल्हो यांच्यासह पत्रकार उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात जिल्हाधिकारी पुजार यांनी 'वार्तालाप' कार्यशाळेच्या आयोजनाचे कौतुक केले. स्थानिक शेतकरी व ग्रामीण समुदायांच्या आर्थिक उन्नतीसाठी शाश्वत आणि सर्वसमावेशक कृषी पद्धती महत्त्वाच्या असल्याचे त्यांनी सांगितले.

## धाराशिवला कोरडा दुष्काळ जाहीर करा; अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ सप्टेंबर -**
पावसाने पाठ फिरवल्याने धाराशिव जिल्ह्यात खरीप पिके करपली असून आगामी रब्बी हंगामही धोक्यात आला आहे. विहिरी व कूपनलिका कोरड्या पडल्याने पिण्याचे पाणी आणि चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. त्यामुळे जिल्हा तत्काळ कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेने दिला.



मराठवाडा अध्यक्ष रविंद्र भिमाशंकर इंगळे यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री यांच्या नावे तहसीलदारांमार्फत निवेदन देण्यात आले. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना प्रति एकर ५० हजार रुपये सानुग्रह अनुदान, पीक विम्याची रक्कम तातडीने मंजूर करणे तसेच राष्ट्रीयीकृत व सहकारी बँकांमधील शेतकऱ्यांची १०० टक्के विनाअट कर्जमाफी करण्याची मागणी करण्यात आली.

पाणीसाठे आटत असल्याने गावोगावी पिण्याच्या पाण्याचे टँकर, जनावरांसाठी मोफत चारा छावण्या आणि दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे संपूर्ण शिक्षण शुल्क माफ करण्याची मागणीही करण्यात आली. आठ दिवसांत जिल्हा कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करून प्रत्यक्ष मदतकार्य सुरू करावे; अन्यथा जिल्हाभर आंदोलन छेडू, असा इशारा संघटनेने दिला.

यावेळी प्रदेशाध्यक्ष घनश्याम चौधरी, कल्याणभाऊ भोसले, राजाभाऊ लकडे, दुर्वास भोसले, मकबुल सुभानी, शहाजी सोमवंशी, धनाजी पेंदे, आबाजी नरवडे, बळीराम बाबर तसेच पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

## सीईओ यांचा परंडा तालुका दौरा; सोनारी आरोग्य केंद्र लवकर सुरु करण्याचे आश्वासन

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.४ सप्टेंबर -**
धाराशिव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवंदना महाडदळकर यांनी गुरुवारी (दि. ३ सप्टेंबर) परंडा तालुक्याचा दौरा केला. यावेळी जिल्हा परिषद डोंजा गटाचे सदस्य तथा महिला व बालविकास, पशुसंवर्धन सभापती भाऊसाहेब खरसडे, मलिक तात्या सय्यद, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गायकवाड यांच्यासह जिल्हा परिषद अधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

या दौऱ्यात महाडदळकर यांनी डोंजा गटातील सोनारी गावाला भेट देऊन विविध विकासकामे व शासकीय सुविधांची पाहणी केली. सर्वप्रथम त्यांनी सोनारी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची पाहणी करून तेथील आरोग्य सुविधांचा आढावा घेतला. प्राथमिक आरोग्य केंद्र लवकरात लवकर सुरू करण्यासाठी शासन स्तरावर आवश्यक ती कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. त्यानंतर त्यांनी सोनारी जिल्हा परिषद शाळेला भेट देऊन शाळेतील विविध समस्या व आवश्यक सुविधांची माहिती घेतली. शाळेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसमोर विविध मागण्या व समस्या मांडण्यात आल्या. सोनारी येथील श्री क्षेत्र काळभैरवनाथ मंदिरालाही महाडदळकर यांनी भेट देऊन दर्शन घेतले. सभापती भाऊसाहेब खरसडे यांच्यासह त्यांनी मंदिर परिसराची पाहणी केली. सोनारी हे धार्मिक व ऐतिहासिक महत्त्व असलेले क्षेत्र असून, महाराष्ट्र व कर्नाटकातील विविध भागांतून मोठ्या संख्येने भाविक येथे दर्शनासाठी येतात. या पार्श्वभूमीवर भाविकांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधांबाबत मंदिर समिती व पुजाऱ्यांशी चर्चा करण्यात आली.



मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवंदना महाडदळकर यांच्या सोनारी भेटीमुळे रखडलेले प्राथमिक आरोग्य केंद्र लवकर सुरू होण्याच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. तसेच जिल्हा परिषद शाळेच्या विविध समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले गेले आहे.

# आठवरून २३ पटसंख्या; शिक्षक दाम्पत्याने बोरीच्या शाळेला दिली नवसंजीवनी!

नवीन रूप...

▶▶ ग्रामस्थांच्या सहकार्याने लोकवर्गणीतून भौतिक सुविधा... ▶▶ विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने शाळा पुन्हा गजबजली...






अधीची शाळा...

**सुधीर लोमटे**
**येरमाळा, दि.४ सप्टेंबर -**
विद्यार्थी संख्येअभावी अस्तित्वाच्या संकटात सापडलेल्या वाशी तालुक्यातील बोरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला शिक्षक दाम्पत्य आणि ग्रामस्थांच्या एकत्रित प्रयत्नांतून नवसंजीवनी मिळाली आहे.

शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांनी केलेल्या प्रयत्नांमुळे शाळेची पटसंख्या अवघ्या आठवरून २३ वर पोहोचली असून, लोकवर्गणीतून शाळेत विविध भौतिक सुविधाही उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे एकेकाळी ओस पडण्याच्या मार्गावर असलेली ही शाळा आता विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने पुन्हा गजबजू लागली आहे.

धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गापासून अवघ्या एक किलोमीटर अंतरावर बोरी गाव आहे. कमी लोकसंख्या असलेल्या या गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात केवळ आठ विद्यार्थी शिक्षण घेत होते. शाळा सुरू ठेवण्यासाठी किमान २१ विद्यार्थ्यांची आवश्यकता असल्याने शाळेचे अस्तित्व टिकविण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले होते.

दरम्यान, सप्टेंबर २०२५ मध्ये कळंब तालुक्यातील नाथवाडी येथून श्रीमती शितल सोळुंके आणि दिवाणे शेलगाव येथून सुधीर देशमुख या शिक्षक दाम्पत्याने बोरी जिल्हा परिषद शाळेचा पदभार स्वीकारला. यापूर्वीच्या शैक्षणिक कार्याची दखल घेत जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षणाधिकारी यांच्याकडून कौतुक झालेल्या या शिक्षकांनी बोरीच्या शाळेचा कायापालट करण्याचा निर्धार केला. पदभार स्वीकारल्यानंतर शिक्षक दाम्पत्याने पालक आणि ग्रामस्थांशी संवाद साधत जिल्हा परिषद शाळेचे महत्त्व पटवून दिले. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासोबतच शाळेतील वातावरण आनंददायी आणि विद्यार्थीकेंद्रित करण्यावर भर देण्यात आला. पालक, ग्रामस्थ व शिक्षणप्रेमी नागरिकांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना शाळेत दाखल करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात आले. या प्रयत्नांना यश मिळून आठ विद्यार्थ्यांची पटसंख्या आता २३ वर पोहोचली आहे.

### लोकवर्गणीतून शाळेचा कायापालट
पटसंख्या वाढविण्याबरोबरच शाळेतील भौतिक सुविधांकडेही लक्ष देण्यात आले. शिक्षणप्रेमी ग्रामस्थांनी एकत्र येत लोकवर्गणी जमा करून विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या. प्रत्येक वर्गात लाईट व पंखे बसविण्यात आले. शाळेसमोरील प्रांगणातील खड्डे बुजवून परिसराची दुरुस्ती करण्यात आली.

रोटरी क्लबच्या माध्यमातून पिण्याच्या पाण्यासाठी पाण्याची टाकी उपलब्ध करून देण्यात आली असून, ग्रामस्थांच्या मालकीच्या बोअरवेलमधून या टाकीत पाणीपुरवठा केला जात आहे.

तसेच लोकवर्गणीतून शाळेसमोर पेव्हर ब्लॉक बसविण्यात आले असून, संपूर्ण शाळेची रंगरंगोटी करण्यात आली. त्यामुळे शाळेचे रूपडेच पालटले आहे.

विद्यार्थ्यांच्या आरोग्याचीही काळजी घेत शिक्षक दाम्पत्याकडून स्वखर्चाने पूरक आहार म्हणून विद्यार्थ्यांना अंडी देण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांमध्ये नियमित उपस्थितीची सवय निर्माण व्हावी, यासाठी 'माझी उपस्थिती-माझी जबाबदारी' हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. महिनाभर दररोज शाळेत उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दर महिन्याला शिक्षकांकडून स्वखर्चाने वस्तुरूप बक्षीस देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

शिक्षक दाम्पत्य, पालक आणि ग्रामस्थ यांच्या एकत्रित प्रयत्नांतून बोरी येथील जिल्हा परिषद शाळेचा शैक्षणिक व भौतिक कायापालट होत आहे. 'आपली शाळा, आपली जबाबदारी' या भावनेतून ग्रामस्थांनी उचललेले हे पाऊल ग्रामीण भागातील इतर शाळांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.

CMYK

धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## कै.रा.गे. शिंदे गुरुजींच्या जयंतीनिमित्त परंड्यात विविध उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.४ सप्टेंबर -**

शिक्षण महर्षी गुरुवर्य रा. गे. शिंदे महाविद्यालयात श्री भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष कै. रा. गे. शिंदे गुरुजी यांच्या १०२व्या जयंतीनिमित्त (७ सप्टेंबर) विविध सामाजिक, शैक्षणिक व बौद्धिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

जयंती सप्ताहात ३ सप्टेंबर रोजी रक्तदान शिबिर, ४ सप्टेंबर रोजी विज्ञान प्रदर्शन, ५ सप्टेंबर रोजी 'अंधश्रद्धा निर्मूलन व वैज्ञानिक जाणीव' विषयावर माधव बावगे यांचे व्याख्यान आणि ६ सप्टेंबर रोजी बुद्धिबळ स्पर्धा होणार आहे. ७ सप्टेंबर रोजी जयंतीचा मुख्य समारंभ होणार असून, यावेळी कै. रा. गे. शिंदे गुरुजी यांच्या पुतळ्याचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात येणार आहे

ग्रामीण व वंचित विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या माध्यमातून ज्ञानाची दारे खुली करण्यासाठी शिंदे गुरुजींनी दिलेल्या योगदानाच्या स्मरणार्थ हे उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी, माजी विद्यार्थी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष सुनील शिंदे, सचिव संजय निंबाळकर व प्राचार्य डॉ. सुनील जाधव यांनी केले आहे.



### संक्षिप्त वृत्त...



#### जिल्हा युवक महोत्सवात नळदुर्ग महाविद्यालयाचे दुहेरी यश

**नळदुर्ग, दि.४ सप्टेंबर -**

बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हा युवक महोत्सवात नळदुर्ग येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दोन कला प्रकारांत उल्लेखनीय यश मिळविले. व्यंगचित्र प्रदर्शनात सपना शिंदे हिने प्रथम क्रमांक, तर कोळी लोक आदिवासी सांघिक नृत्य प्रकारात वैष्णवी सुतार, वैष्णवी गायकवाड, सुप्रिया हळदे, दिशा सलगर, अंजली काळे, सपना शिंदे, वैष्णवी राठोड, ऋषिकेश नाईक, परमेश्वर राठोड, राहुल राठोड, सिद्धेश्वर मुळे व योगेश चव्हाण यांच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्यांना सिनेअभिनेते डॉ. दिलीप घारे यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. या यशाबद्दल बालाघाट शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, सचिव उल्हास बोरगांवकर, कार्याध्यक्ष रामचंद्र आलुरे, संचालक बाबुराव चव्हाण यांच्यासह संचालक मंडळाने अभिनंदन केले. प्राचार्य डॉ. सुभाष राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभागातील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून परिश्रम घेतले.



#### परंड्यात बाळूमामांचा संजीवन समाधी सोहळा वातावरणात संपन्न

**परंडा, दि.४ सप्टेंबर -**

शहरातील संत बाळूमामा मंदिरात ब्रह्मांडनायक देव बाळूमामा यांच्या ६०व्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडले. ३१ ऑगस्ट रोजी श्रींचा अभिषेक व आरती, तसेच ३१ ऑगस्ट ते १ सप्टेंबरदरम्यान श्री सद्गुरू बाळूमामा विजय ग्रंथ पारायणाचे आयोजन करण्यात आले होते. पंचक्रोशीतील महिला व पुरुष भजनी मंडळांनी भजन व हरिजागर सादर केला. १ सप्टेंबर रोजी महाअभिषेक व आरतीनंतर कंठभूषण ह.भ.प. हनुमंत महाराज मारकड (कात्रज) यांचे कीर्तन झाले. यावेळी त्यांनी संत बाळूमामा यांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकला. विविध कीर्तनकार, गायक व वादकांची उपस्थिती कार्यक्रमाचे आकर्षण ठरली. कीर्तनानंतर महाआरती करून महानैवेद्य दाखविण्यात आला व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन केशरताई वैरागे-मदणे यांच्या वतीने करण्यात आले.



#### जिल्हा युवक महोत्सवात यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचा डंका

**तुळजापूर, दि.४ सप्टेंबर -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व शिक्षणमहर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित धाराशिव जिल्हा युवक महोत्सवामध्ये तुळजापूर येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाने घवघवीत यश संपादन केले. विविध कलाप्रकारांतील उत्कृष्ट कामगिरीमुळे महाविद्यालयाला संगीत विभागातील सर्वोत्कृष्ट संघाचा मान मिळाला. महाविद्यालयाने इन्स्टॉलेशन, समूहगायन व पोस्टर या प्रकारांत प्रथम क्रमांक, तर मूकअभिनयात तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्या संघाचा बालाघाट शिक्षण संस्थेचे सचिव उल्हास बोरगांवकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा.डॉ. अशोक मर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी हे यश मिळविले. प्राचार्य डॉ. श्रीरंग लोखंडे, उपप्राचार्य डॉ. प्रवीण भाले तसेच संस्थेचे अध्यक्ष मधुकरराव चव्हाण, सचिव उल्हास बोरगांवकर व संचालकांनी यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शकांचे अभिनंदन केले.

# वाशी तालुक्यात ४२ हजार ६५३ हेक्टरवरील सोयाबीन संकटात

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.४ सप्टेंबर -**

मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या नशिबी संकटांची मालिका काही केल्या संपताना दिसत नाही. कधी अतिवृष्टी, कधी दुष्काळ तर कधी पावसाची ओढ, अशा निसर्गाच्या लहरीपणाचा फटका दरवर्षी शेतकऱ्यांनाच सहन करावा लागत आहे. यंदाही खरीप हंगामात पावसाने अपेक्षित साथ न दिल्याने वाशी तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांसमोर सोयाबीन पीक वाचविण्याचे मोठे संकट उभे राहिले आहे.

वाशी तालुक्यात यंदा तब्बल ४२ हजार ६५३ हेक्टर क्षेत्रावर सोयाबीनची पेरणी करण्यात आली आहे. पुढील काळात चांगला पाऊस होईल, या आशेवर शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने पेरणी केली. जून आणि जुलै महिन्यात झालेल्या रिमझिम व तुरळक पावसावर कसेबसे पीक उभे राहिले. मात्र ऑगस्ट महिना संपून सप्टेंबर सुरू झाला तरी समाधानकारक पाऊस झालेला नाही. त्यामुळे डोळ्यांसमोर उभे असलेले सोयाबीन पीक आता करपण्याच्या मार्गावर आहे.

पावसाअभावी जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत असून अनेक भागांत सोयाबीनची वाढ खुंटली आहे.

काही ठिकाणी पिकाची पाने पिवळी पडत असून उत्पादनावरही परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पिकाला पाणी देण्यासाठी विहिरी, बोअरवेल आणि तलावांमध्येही पुरेसा पाणीसाठा उपलब्ध नाही. .त्यामुळे पाणी असूनही पिकाला देता येत नाही आणि पाऊस नसल्याने पीक वाचवता येत नाही, अशी दुहेरी कोंडी शेतकऱ्यांची झाली आहे.

ज्या शेतकऱ्यांकडे थोडाफार पाणीसाठा उपलब्ध आहे, ते स्प्रिंकलरच्या साह्याने पाणी देत पीक वाचविण्याची धडपड करीत आहेत.

मात्र उपलब्ध पाणीसाठा मर्यादित असल्याने हा आधार किती दिवस पुरणार, हा प्रश्न कायम आहे. दुसरीकडे आभाळाकडे डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्यांना आता दमदार पावसाची प्रतीक्षा लागली आहे.

वर्षभर कष्ट करून शेतकरी पिकासाठी पैसा खर्च करतो. बियाणे, खते, औषधे, मशागत आणि मजुरीवर मोठा खर्च झालेला असतो. मात्र शेवटी संपूर्ण शेतीचे गणित पावसावरच अवलंबून राहते. यंदा पावसाने वाशी तालुका परिसरात ओढ दिल्याने शेतकऱ्यांच्या कष्टावर पुन्हा पाणी फिरण्याची भीती निर्माण झाली असून, आता आठवडा भरात तरी दमदार पाऊसच सोयाबीन उत्पादकांना मोठा दिलासा देऊ शकतो.

**दमदार पावसाची आस...**
येत्या आठवडाभरात समाधानकारक पाऊस झाला नाही, तर तालुक्यातील अनेक भागांतील सोयाबीन पीक करपण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे हातातोंडाशी आलेला खरीप हंगाम पुन्हा एकदा संकटात सापडण्याची भीती शेतकऱ्यांमध्ये आहे.

**पावसाची ओढ कायम; दमदार पाऊस न झाल्यास पीक करपण्याची भीती**



## महाराष्ट्रात अश्लील डीजे लावणीला लगाम; राष्ट्रवादीच्या मागणीला मोठे यश

### प्रदेश सरचिटणीस विशाल शिंगाडे यांनी मानले आभार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ सप्टेंबर -**

महाराष्ट्रातील लावणी, लोककला व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या नावाखाली होणाऱ्या अश्लील डीजे लावणीसह आक्षेपार्ह सादरीकरणांना आळा घालण्यासाठी राष्ट्रवादी चित्रपट व सांस्कृतिक विभागाने केलेल्या मागणीची शासनाने दखल घेतली आहे. सांस्कृतिक कार्य विभाग व रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाने याबाबत आवश्यक निर्देश जारी केले आहेत.



नव्या निर्देशांनुसार सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या नाटक, एकांकिका, लोकनाट्य, तमाशा, लावणी, लोकसंगीत, वग व मेळे आदी कार्यक्रमांची संहिता, निवेदन व सादरीकरण तपासले जाणार असून, संबंधित कार्यक्रमांसाठी मंडळाचे Suitability Certificate आवश्यक राहणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कार्यक्रमांवर कार्यवाही करण्याबाबत पोलिस अधिकाऱ्यांनाही सूचना देण्यात येणार आहेत.

प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब पाटील, प्रदेश सरचिटणीस विशाल शिंगाडे व जिल्हाध्यक्ष सुगत सोनवणे यांनी याबाबत स्वतंत्र यंत्रणा व नियमांची मागणी केली होती. मागणीची दखल घेतल्याबद्दल प्रदेश सरचिटणीस विशाल शिंगाडे यांनी राज्य सरकारचे आभार मानले. महाराष्ट्राची समृद्ध लावणी व लोककलेचे पावित्र्य जपण्यासाठी हा निर्णय महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले.

## अल्पवयीन मुलीचा बालविवाह; अपत्य जन्मल्यानंतर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ सप्टेंबर -**

तालुक्यातील एका गावातील १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचा तिच्या आई-वडिलांनी एका तरुणासोबत बालविवाह लावून दिल्याचा प्रकार समोर आला आहे. विवाहानंतर संबंधित तरुणाने अल्पवयीन मुलीशी शारीरिक संबंध ठेवल्याने ती गर्भवती झाली आणि सध्या तिने एका मुलाला जन्म दिला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अल्पवयीन असतानाच संबंधित मुलीचा विवाह लावून देण्यात आला. त्यानंतर संबंधित तरुणाने तिच्याशी शारीरिक संबंध ठेवल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

याप्रकरणी पीडितेने ३ सप्टेंबर रोजी दिलेल्या फिर्यादीवरून भूम पोलिस ठाण्यात संबंधित तरुणासह आई-वडिलांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नळदुर्ग किल्ल्यातील दुर्दैवी घटनेला सासरचा छळ कारणीभूत; पतीसह चौघांविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.४ सप्टेंबर -**

नळदुर्गच्या ऐतिहासिक किल्ल्यातील उपली बुरुजावरून आपल्या तीन मुलांसह उडी मारून आत्महत्या केल्याच्या दुर्दैवी घटनेला आता वेगळे वळण मिळाले आहे. सासरच्या मंडळींकडून होणाऱ्या कथित शारीरिक व मानसिक छळाला कंटाळून अश्विनी मनोहर पौळ यांनी मुलांसह टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप असून, याप्रकरणी त्यांच्या पतीसह सासू, सासरे आणि आत्यासासू अशा चौघांविरुद्ध नळदुर्ग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि.३ सप्टेंबर रोजी अंबुलगा, ता. निलंगा, जि. लातूर येथील अश्विनी मनोहर पौळ यांनी आपल्या तीन मुलांसह नळदुर्ग किल्ल्यातील उपली बुरुजावरून उडी मारली. या घटनेत अश्विनी आणि त्यांचा



साडेपाच वर्षांचा मुलगा अजिंक्य यांचा जागीच मृत्यू झाला होता. तर दोन जुळ्या मुली वीरा आणि क्रांती गंभीर जखमी झाल्या होत्या. उपचारादरम्यान क्रांतीचाही मृत्यू झाला असून, वीरा हिच्यावर उपचार सुरू आहेत. त्यामुळे या घटनेतील मृतांची संख्या तीन झाली आहे. दरम्यान, अश्विनीचे वडील तानाजी शिवाजी मोहिते यांनी नळदुर्ग पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार, अश्विनीला तिचे पती मनोहर अंकुश पौळ, सासरे अंकुश पंढरीनाथ पौळ, सासू कालिंदा अंकुश पौळ आणि आत्यासासू विमलबाई (सर्व रा. अंबुलगा, ता. निलंगा) यांच्याकडून वारंवार त्रास दिला जात होता.

अश्विनीला दोन जुळ्या मुली झाल्याने तसेच लग्नावेळी माहेरच्यांनी हुंडा दिला नसल्याचे सांगून सोन्याच्या पाटल्या आणि रिक्षा घेण्यासाठी माहेरहून पैसे आणावेत, अशी मागणी केली जात होती. यासाठी तिला वारंवार मारहाण करून शारीरिक व मानसिक त्रास दिल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या छळाला कंटाळूनच अश्विनीने आपल्या मुलांसह आत्महत्येचा निर्णय घेतल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या फिर्यादीवरून नळदुर्ग पोलिसांनी मनोहर अंकुश पौळ, अंकुश पंढरीनाथ पौळ, कालिंदा अंकुश पौळ आणि विमलबाई यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक रविंद्र गायकवाड करीत आहेत.

## शेतकऱ्यांच्या बांधावरूनच ओमराजेंचा जिल्हाधिकाऱ्यांना फोन!



**सरसकट पंचनाम्याचे दिले आदेश**

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.४ सप्टेंबर -**

तुळजापूर तालुक्यात पावसाने मोठी उघडीप दिल्याने करपून गेलेल्या खरीप पिकांची धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केली. सलगरा दिवटी येथे पाहणीदरम्यान त्यांनी शेतकऱ्यांच्या नुकसानीची माहिती घेतली आणि शेताच्या बांधावरूनच थेट जिल्हाधिकाऱ्यांना फोन करून पिकांच्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करण्याचे आदेश दिले.

तुळजापूर तालुक्यात पावसाने दडी मारल्याने खरीप हंगाम संकटात सापडला आहे. विशेषतः सोयाबीन पिकाला पावसाअभावी मोठा फटका बसला असून अनेक ठिकाणी पिके करपून गेली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे.

खासदार ओमराजे निंबाळकर यांनी सलगरा दिवटी येथे प्रत्यक्ष शेतात जाऊन करपलेल्या सोयाबीन पिकाची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून नुकसानीची माहिती घेतली. पाहणी केल्यानंतर त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधत तालुक्यातील पिकांच्या नुकसानीची वस्तुस्थिती निदर्शनास आणून दिली. तसेच नुकसानग्रस्त पिकांचे सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत मिळण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी तहसीलदार अरविंद बोळंगे, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी भिंगारदिवे, तालुका कृषी अधिकारी, मंडळ अधिकारी पवार, ग्रामसेवक पारे, तलाठी कोरडे यांच्यासह ऋषी मगर, गोपाळ सुरवसे, प्रतीक रोचकरी, शाम माळी, सर्जेराव लोमटे, रणजित माढेकर, महेश मोरे, महेश केदार, राजेंद्र भरगंडे, अल्लाबक्ष शेख तसेच शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पावसाअभावी खरीप हंगाम हातातून जाण्याची परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई मिळावी, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

## जरांगे पाटील यांच्या उपोषणाच्या सहाव्या दिवशी डॉ. प्रतापसिंह पाटील यांची भेट

### प्रकृतीची केली विचारपूस; समाजाच्या लढ्याला पाठिंबा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ सप्टेंबर -**

मराठा समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी उपोषण करणारे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाच्या पाचव्या दिवशी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. उपोषणामुळे जरांगे पाटील यांची प्रकृती खालावली असून शरीर अशक्त झाले असले, तरी समाजाच्या प्रश्नांसाठी लढण्याची त्यांची जिद्द आणि निर्धार कायम असल्याचे यावेळी दिसून आले.

जरांगे पाटील यांची प्रकृती पाहून उपस्थितांमध्ये भावनिक वातावरण निर्माण झाले. मराठा समाजाच्या प्रश्नांबाबतची त्यांची तळमळ आणि समाजातील असंख्य कुटुंबांच्या भविष्याची चिंता त्यांच्या बोलण्यातून जाणवत असल्याचे डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी नमूद केले. यावेळी डॉ. पाटील यांनी, दादा, तुम्ही समाजासाठी लढत आहात. या लढ्यात समाजाची ताकद, प्रेम आणि सदिच्छा सदैव तुमच्या पाठीशी आहेत, अशा शब्दांत जरांगे पाटील यांना धीर दिला. तसेच आंदोलनासोबतच स्वतःच्या प्रकृतीची काळजी घेण्याचे आवाहन केले.

मराठा समाजातील मुला-मुलींच्या शिक्षण, रोजगार आणि उज्ज्वल भविष्यासाठी जरांगे पाटील संघर्ष करीत आहेत. त्यांच्या आंदोलनामागे समाजाच्या विविध प्रश्नांची वेदना आणि न्याय्य हक्क मिळवून देण्याची भूमिका असल्याचे यावेळी सांगण्यात आले.



उपोषणाच्या पाचव्या दिवशी प्रकृती खालावलेली असतानाही जरांगे पाटील यांच्या चेहऱ्यावर संघर्षाची जिद्द कायम असल्याचे पाहायला मिळाले. एक व्यक्ती उपाशी आहे. कारण त्याच्या काळजात लाखो कुटुंबांच्या भविष्याची चिंता आहे, या भावनेने त्यांच्या संघर्षाकडे पाहिले जात असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती लवकर सुधारावी, त्यांच्या संघर्षाला यश मिळावे आणि मराठा समाजाच्या न्याय्य मागण्यांवर सकारात्मक व सर्वमान्य तोडगा निघावा, अशी अपेक्षा डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी व्यक्त केली.

## एकोंडी लोच्या जिल्हा परिषद शाळेचा गुणवत्तेचा डंका; गुणवंत विद्यार्थ्यांचा उत्साहात सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.४ सप्टेंबर -**

लोहारा तालुक्यातील एकोंडी लो येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने गुणवत्तापूर्ण शिक्षण व विविध नवकल्पनांच्या माध्यमातून उल्लेखनीय कायापालट घडवून आणला आहे. शाळेत आयोजित 'गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा' उत्साहात पार पडला.

शाळेतील डिजिटल क्लासरूम, अत्याधुनिक संगणक कक्ष, इंटरक्टिव्ह बोर्ड, ओपन व इनडोअर जीम, सेंद्रिय परसबाग, आकर्षक रंगरंगोटी आणि दर्जेदार पोषण आहाराची मान्यवरांनी पाहणी करून मुख्याध्यापक व शिक्षकांचे कौतुक केले.



यावेळी विद्यार्थ्यांनी शाळेचे मुख्याध्यापक आयलाने सरांची बदली थांबविण्याची मागणी केली. त्यांच्या भावनिक आग्रहावर अधिकाऱ्यांनी बदली थांबविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

एनएस सहलीसाठी पात्र ठरलेला रुद्रा सूर्यवंशी, धनुर्विद्येतील सुवर्णपदक विजेता स्वरांश राठोड, शिष्यवृत्तीधारक राणा जगजितसिंग पाटील व स्वराज पाटील तसेच मंथन परीक्षेतील आरोही पाटील, सान्वी सूर्यवंशी, विराज सूर्यवंशी, रणवीर पाटील, वंशिका सूर्यवंशी व हर्षवर्धन जाधव या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास पं.स. सभापती पल्लवी जानकर, जि.प. सदस्या रोहिणी कोकणे, तहसीलदार रणजितसिंग कोळेकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय पवार, गटविकास अधिकारी ओमकार गायकवाड यांच्यासह शिक्षक, पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.